सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ५ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक २९ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, ५ डिसेंबर २०२४
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# देवाभाऊ पुन्हा येणार, आज शपथ घेणार

## भाजपा विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड

◆ **मुंबई, ४ डिसेंबर**

भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी बुधवारी एकमताने देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली. आता देवाभाऊ पुन्हा येणार, गुरुवारी शपथ घेणार असल्याचे या माध्यमातून स्पष्ट झाले.

केंद्रीय निरीक्षक व अर्थमंत्री निर्मला सीतारामन् आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्या उपस्थितीत विधिमंडळाच्या सेन्ट्रल हॉलमध्ये झालेल्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत सर्व आमदारांनी एकमुखाने नेतेपदी देवेंद्र फडणवीस यांना निवडले.

निर्मला सीतारामन् आणि विजय रुपाणी या दोन्ही नेत्यांच्या उपस्थितीत भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. कोअर कमिटीच्या बैठकीनंतर भाजपच्या आमदारांची बैठक झाली. त्यात केंद्रीय निरीक्षकांच्या समोर सुधीर मुनगंटीवार आणि चंद्रकांत पाटील यांनी नेतेपदाचा प्रस्ताव मांडला. आशिष शेलार आणि रवींद्र चव्हाण यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिले. त्यामुळे सत्तेची सूत्रे आता देवेंद्र फडणवीसांकडेच असतील हे स्पष्ट झाले आहे.

### नरेंद्र मोदी राहणार उपस्थित



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या शेवटच्या सभेत 'अब शपथविधी की औपचारिकता बाकी रह गई है, मै शपथविधी को आऊंगा और मै आपको शपथविधीका निमंत्रण देने आया हू,' असे म्हटले होते. म्हटल्याप्रमाणे पंतप्रधान महाराष्ट्राच्या सत्तास्थानेच्या या प्रमुख शाही सोहळ्याला हजेरी लावत आहे. पंतप्रधानांच्या उपस्थितीत शपथविधी समारंभ पार पडणार आहे.

**आझाद मैदानावर शपथविधी**

भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. ते गुरुवारी राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. आझाद मैदानावर शाही शपथविधी सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी देशभरातून विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते मिळून जवळपास २० आमदार मंत्रिपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*



## आघाडी सरकारने महाराष्ट्राच्या विकासात खोडा घातला : निर्मला सीतारामन्

◆ **मुंबई, ४ डिसेंबर**

मधल्या काळात सत्तेवर आलेल्या काँग्रेसच्या नेतृत्वातील आघाडी सरकारने महाराष्ट्राच्या विकासकामांत खोडा घातला होता. महाराष्ट्राला मागे नेण्याचे एकमेव काम त्यांनी केल्याचे लक्षात आल्यानंतर वैतागलेल्या जनतेने यांना धडा शिकवला, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सांगितले.



देवेंद्र फडणवीस यांची गटनेतेपदी निवड झाल्यानंतर निरीक्षक निर्मला सीतारामन उपस्थितांना संबोधित करीत होत्या. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंच्या सरकारवर पर्यायाने उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्ला चढवला. मात्र, त्यांचे नाव घेण्याचे टाळले.

सीतारामन् म्हणाल्या की, महाराष्ट्रातील जनतेने दिलेला हा कौल संपूर्ण देशासाठी एकप्रकारे संदेशच ठरला आहे. खऱ्या अर्थाने ही नियमित विधानसभा निवडणूक नव्हती. लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील ही निवडणूक त्याआधी हरयाणाची निवडणूक यातून जनतेने स्पष्ट संकेत दिले आहेत. हे अभूतपूर्व यश हा विकसित भारतासाठी आहे. महाराष्ट्रातील जनतेने दिलेला हा कौल ओळखून तुम्ही योग्य पद्धतीने पुढे जाल. दुहेरी इंजिनचे सरकार मोदींच्या नेतृत्वात महाराष्ट्राच्या भविष्यासाठी कार्य कराल. निवडणुकीत दिलेल्या वचनांची पूर्ती कराल आणि जनतेने टाकलेल्या विश्वासास पात्र ठराल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यातील काँग्रेसच्या काळातील सरकारमध्ये जनतेचे कसे नुकसान झाले हे लोकांना दाखवून आपल्याला पुढे जायचे आहे. शेतकरी, उद्योग आणि कोणत्याही क्षेत्रातील कामे असतील, ती पुढे न्यायची आहे. एआयमध्ये आपले तरुण स्टार्टअपसाठी मोठे योगदान देत आहेत. त्यांना महाराष्ट्रात आणखी प्रोत्साहन मिळाले पाहिजे असेही सीतारामन् यांनी नमूद केले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

## २०१९ मध्ये जनतेसोबत बेईमानी : फडणवीस

◆ **मुंबई, ४ डिसेंबर**


२०१९ मध्ये जनतेचा कौल आपल्याला मिळाला होता. दुर्दैवाने तो कौल हिसकावून जनतेसोबत एक प्रकारे बेईमानी करण्यात आली. मला इतिहासात जायचे नाही. आता आपण नवीन सुरुवात करीत आहोत. अडीच वर्षे मागे टाकलेल्या महाराष्ट्राला पुढे नेण्याचा संकल्प करू, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्र भाजपाच्या विधिमंडळ नेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी निवड करण्यात आली. निवड झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित आमदारांशी संवाद साधला.

विधिमंडळ गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल आणि या प्रक्रियेसाठी आलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणीजी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन् यांचे त्यांनी आभार मानले. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पूर्णपणे आपल्यासोबत असलेले एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही आभार मानले.

प्रचंड मोठी जबाबदारीची जाणीव करून देणारा जनादेश जनतेने दिलेला आहे. विशेषतः लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडके युवा असतील या सर्वांनी आणि समाजातल्या दलित, वंचित, ओबीसी, आदिवासी सर्वांनी दिलेल्या जनादेशाचा सन्मान राखण्याचे काम करावे लागणार आहे.

आपण सुरू केलेल्या योजना आणि आपण दिलेली आश्वासने पूर्ण करणे यासाठी प्राथमिकता असेलच, सोबत महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी, सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी आपल्या सर्वांना कार्यरत राहायचे आहे. आपल्याला महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर न्यायचा आहे, असे फडणवीस म्हणाले. ◀*(तभा वृत्तसेवा)*



महाराष्ट्र भाजपाच्या विधिमंडळ नेतेपदी निवड झाल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आपल्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विकासाला नवी गती मिळेल, असा मला विश्वास आहे.

**नितीन गडकरी,** केंद्रीय मंत्री

### 'एक है तो सेफ है' आणि 'मोदी है तो मुमकिन है'!

यावेळेची निवडणूक ऐतिहासिक राहिलेली आहे. या निवडणुकीचे विश्लेषण करायचे झाले तर मी असे म्हणेन की या निवडणुकीने एक गोष्ट आपल्यासमोर निश्चितपणे ठेवली ती म्हणजे 'एक है तो सेफ है' आणि 'मोदी है तो मुमकिन है'! मोदीजींच्या नेतृत्वामध्ये देशात विजयाची मालिका ही लोकसभेनंतर पुन्हा एकदा हरयाणापासून सुरू झाली, असे फडणवीस म्हणाले.



## मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्र्यांचा आज शपथविधी

◆ **मुंबई, ४ डिसेंबर**

गुरुवारी महायुती सरकारचा महाशपथविधी सोहळा मुंबईतील आझाद मैदानावर सायंकाळी साडे पाच वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात मुख्यमंत्री आणि दोन मुख्यमंत्री शपथ घेतील.

देवेंद्र फडणवीस यांची भाजपा विधिमंडळ पक्षनेतेपदी झालेली निवड, त्यानंतर महायुतीतील घटक पक्षांनी राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापन करण्यासाठी केलेला दावा आणि राज्यपालांनी संख्याबळ विचारात घेऊन महायुतीला दिलेले सत्तेचे निमंत्रण या दरम्यान देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची बैठक घेतली. या बैठकीनंतर एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ज्या प्रमाणे अडीच वर्षांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी संख्याबळ असूनही मुख्यमंत्रिपदाचा त्याग केला, त्याच प्रमाणे आता एकनाथ शिंदे यांनी भाजपाच्या संख्याबळाचा विचार करून उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावे, अशी उदय सामंत यांच्यासह अन्य नेत्यांनी केलेली विनंती शिंदे यांनी मान्य केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे गुरुवारी सायंकाळी फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाच शपथविधी होणार असल्याची खात्रीलायक माहिती समोर आली आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

## महायुतीचा सत्तास्थापनेचा दावा

◆ **मुंबई, ४ डिसेंबर**

भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाल्यानंतर बुधवारी सायंकाळी महायुतीचे तिनही नेते भाजपाचे देवेंद्र फडणवीस, शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार यांनी एकत्रितपणे जाऊन राज्यपालांकडे जाऊन रीतसर सत्ता स्थापनेचा दावा केला. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमांशी संवाद साधत तिनही नेत्यांनी दिली.

महायुतीने दावा सादर केल्यानंतर राज्यपालांनी गुरुवारी महायुतीला सत्ता स्थापनेचे निमंत्रण दिले. आझाद मैदानात सायंकाळी साडेपाच वाजता महायुतीचा शपथविधी होणार आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. तर, अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील.

### आपण तर शपथ घेणार : अजित पवार

आपण मंत्रिमंडळात सहभागी होणार का, याबद्दल एकनाथ शिंदे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्याचवेळी शिंदेंऐवजी मध्येच अजित पवार यांनी, 'मैं तो शपथ लेने वाला हूँ, रूकने वाला नही,' असे म्हणताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. यावेळी शिंदेंनी देखील अजितदादांना सकाळी शपथ घेण्याचा अनुभव असल्याची मिश्कील टिप्पणी केली. त्यावर परत अजित पवारांनी सकाळचा अनुभव आहे, सायंकाळचा नाही, तो घ्यायचा असल्याचे म्हणत पुन्हा सगळे खळखळून हसले.

एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घ्यावी, अशी इच्छा शिवसेनेसोबतच महायुतीतील बहुतांश नेत्यांची आहे. एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळात सहभागी व्हावे, अशी मी त्यांना विनंती केली आहे, असे फडणवीस म्हणाले. ते माझ्या विनंतीला नक्कीच मान देतील. त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्रिपद ही एक केवळ तांत्रिक व्यवस्था आहे. सरकार आम्ही तिघे मिळवून चालवू. आम्ही एकत्रित चांगले सरकार देऊ, असे ते म्हणाले. मी मंत्रिमंडळात असावे, असे वाटते, अशी त्यांनी माझ्याकडे विनंती केली आहे. मी सर्वांचा मान राखतो आणि आदर करतो, असे शिंदे यांनी स्पष्ट केले होते. नंतर मात्र, शिवसेनेतील उच्चस्तरीय सूत्रांनी, शिंदे गुरुवारी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार असल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. ◀*(तभा वृत्तसेवा)*

## सुखबीरसिंग बादल यांच्यावर सुवर्ण मंदिरात हल्ला

### हल्लेखोर बब्बर खालसाचा अतिरेकी

◆ **अमृतसर, ४ डिसेंबर**

शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंग बादल यांच्यावर पंजाबमधील अमृतसरमध्ये हल्ला झाला. सुवर्ण मंदिरात त्यांच्यावर गोळी झाडण्यात आली आहे. श्री अकाल तख्त साहिबने दिलेल्या धार्मिक शिक्षेसाठी ते श्री हरमंदिर साहिबला दरबारामध्ये आहेत. वेळेवर संशयिताला पकडल्याने बादल बचावले. यानंतर पोलिसांनी संशयित आरोपीला अटक केली.

सेवादाराच्या भूमिकेसाठी सुखबीरसिंग बादल मुख्य गेटवर तैनात असताना सकाळी नऊ वाजल्याननंतर ही घटना घडली. दरबार साहिबमध्ये गोळीबाराच्या आवाजाने मंडळींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नारायणसिंग चौरा असे संशयित आरोपीचे नाव आहे. आरोपी डेरा बाबा नानकचा असून, बब्बर खालसाशी संबंधित असल्याचे सांगण्यात येत आहे. ◀*(वृत्तसंस्था)*



## राजभवनात रंगली शिंदे-अजित पवार यांच्यात कोपरखळी!

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.४ डिसेंबर :**

महायुती-२ सरकारचे कॅप्टन हे देवेंद्र फडणवीसच असणार व मावळते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री पद स्वीकारणार असल्याचे सरकारच्या शपथविधी पूर्वसंध्येला स्पष्ट झाले.

मात्र फडणवीस यांनी अन्य नेत्यांसमवेत राज्यपालांकडे जाऊन सत्ता स्थापनेचा दावा केल्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पद स्वीकारण्याबाबत शिंदे व अजित पवार यांच्यामध्ये गंमतीगंमतीत झालेली कोपरखळी चर्चेचा विषय ठरली. त्यांचे माहित नाही पण मी मात्र शपथ घेणार आहे ,असे पवारांनी सांगितल्यावर शिंदेनी दादांना शपथ घेण्याचा अनुभव आहे. सकाळी घेतली होती. आता संध्याकाळी घेतील ,असे प्रत्युत्तर दिले, त्यावर उपस्थितांमध्ये एकच हास्यकल्लोळ निर्माण झाला. भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांनी विधिमंडळ नेता म्हणून देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड केली. पक्षाचे निरीक्षक म्हणून आलेल्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन व गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपांनी यांनी त्यांची घोषणा केली. त्यानंतर महायुतीच्या प्रमुख नेत्यांसमवेत राजभवनात जाऊन सरकार स्थापनेचा दावा केला. राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांनी गुरुवारी शपथविधीसाठी निमंत्रित केले त्यानंतर राजभवनातच तिन्ही नेत्यांनी पत्रकार परिषदेत घेत आपली भूमिका स्पष्ट केली. फडणवीस

यांनी एकनाथ शिंदे यांनी सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घ्यावी, अशी इच्छा शिवसेने बरोबरच म हायुतीतल्या नेत्यांची आहे. आपणही त्यांना त्यासाठी विनंती केली असून ते सकारात्मक प्रतिसाद देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. मुख्यमंत्रिपद हे एक टेक्निकल अरेंजमेंट आहे. आम्ही तिघे मिळवून एकत्रित चांगले सरकार देवू असेही त्यांनी सांगितले . त्यावर पत्रकारांनी शिंदे यांना मंत्रिमंडळात सहभागी होणार का?, अशी विचारणा केल्यावर थेट उत्तर न देता तुम्ही जरा दम काढा. जे काही आहे ते सध्याकाळपर्यंत स्पष्ट होईल. कोण शपथ घेणार कोण शपथ घेणार नाही हे सर्व काही सांगितलं जाईल , असे म्हणाले त्याचवेळी अजित पवारांनी त्यांचे माहीत नाही आपण मात्र शपथ घेणार आहोत. आपण थांबणार नाही असे सांगितल्यावर उपस्थित होते एकच हशा पिकला त्यावर शिंदे यांनी त्यांना थांबवत दादांना संकाळच्या शपथविधीचा अनुभव आहे. आता ते संध्याकाळच्या शपथविधीचा अनुभव घेतील अशी कोपरखळी मारल्यावर आणखी हास्यकल्लोळ वाढला. तर पवार लगेच म्हणाले ,मागच्या वेळी आम्ही सकाळी एकत्रित शपथ घेतली होती पण आता पुन्हा घेणार असून पाच वर्षे नेटाने ती पूर्ण करू , असे स्पष्ट केले.

### फडणवीसांना माझा पूर्ण पाठिंबा: शिंदे

आम्ही राज्यपालांची भेट घेऊन महायुतीचं सरकार स्थापन करण्याची परवानगी मागितली. उद्या आझाद मैदानात शपथविधी आहे. अडीच वर्षांपूर्वी इथेच देवेंद्रजींनी मी मुख्यमंत्री व्हावे म्हणून माझ्या नावाची शिफारस केली. आणि आज फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत यासाठी पाठिंब्याचं पत्र राज्यपालांकडे दिले आहे, ते सांगून एकनाथ शिंदे म्हणाले की,नरेंद्र मोदीजी, अमित शाह किंवा नड्डाजी यांच्या निर्णयाला पूर्ण समर्थन असल्याचे मी आधीच सांगितले होते. खेळमेळीच्या वातावरणात सरकार स्थापन होत आहे. इतिहासात महायुतीला इतके बहुमत कधीच मिळालं नव्हतं. या राज्यातील मतदारांनी महायुतीवर मतांचा वर्षाव केला. यामागे गेल्या अडीच वर्षांचं काम कारणीभूत आहे. असेही त्यांनी सांगितले.

## तेलंगणात दशकातील सर्वांत मोठा भूकंप

### चंद्रपूर, गडचिरोली, भंडाऱ्यातही सौम्य धक्के

◆ **चंद्रपूर, ४ डिसेंबर**

तेलंगणात बुधवारी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास मुलुगा जिल्ह्यातील गोदावरी नदीच्या काठावर इटूरणागरम् वन्यजीव अभयारण्य क्षेत्रात ५.३ रिश्टर स्केलचा भूकंप झाला. गोदावरी नदीजवळ १० किमीच्या आत या भूकंपाचे केंद्र होते. भूकंपाचे सौम्य धक्के महाराष्ट्रातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, यवतमाळ आणि नागपूरपर्यंत जाणवले. भूकंपाचे केंद्र चंद्रपूरपासून सरळ २१७ किमी अंतरावर आहे. गेल्या दशकातील हा सर्वांत मोठा भूकंप होता.

तेलंगणा राज्यात 'गोदावरी रिफट व्हॅली' आणि पूर्व तेलंगणातून 'कदंब फॉल्ट' जात असून, हे भूकंप प्रवण क्षेत्र-३ मध्ये येते. या भागात 'हायड्रो सिस्मिसिटी' प्रकारामुळे भूकंप होतात. भूशास्त्राच्या भाषेत अशा भूकंपांना गोदावरी फॉल्ट भूकंप म्हणतात. असे ३ ते ४ रिश्टर स्केलचे भूकंप अधूनमधून येत असतात. परंतु, बुधवारी आलेला भूकंप हा दशकातील मोठा होता.

जिल्ह्यातील नागभीड, सिंदेवाही, चंद्रपूर, राजुरा, मूल आदी तालुक्यांत या भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. नागभीड तालुक्यात तळोधी येथील अनसूयानगरातील सोनू नुरानी यांच्या घरातील वस्तू हलल्याचे त्यांनी सांगितले, तर अनेक ठिकाणी घरातील भांडी खाली पडली. अशा प्रकारचे धक्के पुन्हा जाणवल्यास नागरिकांनी दक्षता घ्यावी व घाबरून न जाता इमारतीबाहेर मोकळ्या जागेत सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा, असे आवाहन चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

### दक्षिण विदर्भ भूकंप क्षेत्र, मात्र मोठी शक्यता नाही : चोपणे



चंद्रपूर जिल्ह्यातील मूल-गोंडपिंपरी, तर गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा हा भूभाग 'निओ टेकटोनिक' म्हणून गणला जात असून तो भूकंप प्रवण क्षेत्र-३ मध्ये मोडतो. येथे २ ते ३ रिश्टर स्केलचे भूकंप पूर्वी आले होते आणि पुढेही येऊ शकतात. तसेच 'कदम फॉल्ट'मुळे वणी, मुकुटबन क्षेत्र हे अल्प प्रमाणात भूकंपप्रवण क्षेत्र आहे. परंतु, भविष्यात चंद्रपूर आणि विदर्भात मोठ्या भूकंपाची शक्यता नाही, असे मत भूशास्त्र अभ्यासक सुरेश चोपणे यांनी व्यक्त केले.

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ५ डिसेंबर २०२४ | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

स्थिरता
विश्वास
विकास

# फसव्या/पार्सल स्कॅमपासुन सावध रहा!



आरबीआय/बँक/सरकारी एजन्सी/कुरियर कंपन्यांच्या अधिकाऱ्यांच्या नावे येणाऱ्या **सायबर गुन्हेगारांच्या** ऑडिओ/विडिओ कॉलपासुन सावध रहा, जे कायदेशीर कारवाई करण्याची **धमकी देतात** किंवा **तात्काळ पैशांची मागणी** करतात किंवा तुमचे बँक खाते किंवा डेबीट/क्रेडिट कार्ड **गोठवण्याची किंवा बंद** करण्याची भीती दाखवतात.

## काय करु नये

- **घाबरु नका -** धोकेबाज तुम्हाला फसवु शकतात
- कोणतीही वैयक्तिक/आर्थिक माहिती **देऊ नका**
- पैसे देण्यासाठी कोणत्याही अज्ञात लिंकवर **क्लिक करु नका**

## काय करावे

- नेहमी कॉल करणाऱ्याची/पैशाच्या मागणीची **सत्यता तपासा**
- cybercrime.gov.in वर **त्वरित रिपोर्ट करा** किंवा 1930 वर मदतीसाठी कॉल करा




अधिक माहितीसाठी, **https://rbikehtahai.rbi.org.in/fraud** वर जा
फीडबॅक देण्यासाठी, **rbikehtahai@rbi.org.in** ला लिहा

सार्वजनिक हितार्थ जारी
**भारतीय रिझर्व्ह बँक**
**RESERVE BANK OF INDIA**
www.rbi.org.in

## अग्रलेख...

# जनतेच्या हृदयस्थानीचा मुख्यमंत्री

विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला लागला आणि महायुतीने बहुमत मिळवल्यापासून राज्याचे मुख्यमंत्री कोण हा पडलेला पेच आज सुटला. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् या केंद्रीय निरीक्षकांच्या प्रमुख उपस्थितीत देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांची भारतीय जनता पक्षाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाली. भाजपा नेते चंद्रकांतदादा पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला तर पंकजा मुंडे, प्रवीण दरेकर, रवींद्र चव्हाण, संजय कुटे, संजय सावकारे यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी ठरावाला अनुमती दिली. या निवडीमुळे राज्याच्या मुख्यमंत्रिपदासाठी सुरू असलेली चढाओढही संपली अन् माध्यमांसह महाविकास आघाडीच्या नेत्यांची पोपटपंची बंद झाली. राजी-नाराजीमुळे मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित होत नसल्याच्या अफवांनाही पूर्णविराम मिळाला. शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना मुख्यमंत्रिपद न मिळाल्याने बंडखोरी करणार असल्याचा काही माध्यमकर्मींनी काढलेला निष्कर्षही पुरता केराच्या टोपलीत गेला. देवेंद्र फडणवीस नकोत, यासाठी देव पाण्यात घालून बसलेल्या नेत्यांची पंचाईत झाली. खरे तर १३२ आमदारांसह जिंकून आलेले देवेंद्र फडणवीस हेच जनतेच्या मनातील मुख्यमंत्री होते, यावर आजच्या निर्णयामुळे शिक्कामोर्तब झाले. देवेंद्र फडणवीस यांनी आज दुपारीच राज्यपालांची भेट घेऊन, एकनाथ शिंदे आणि अजित पवार या सहकाऱ्यांसह सरकार स्थापनेचा दावा पेश केला. या निवडीनंतर मत व्यक्त करताना त्यांनी अतिशय कृतज्ञपणे महाराष्ट्राच्या जनतेला साष्टांग दंडवत घालतो, अशी प्रतिक्रिया दिली. महायुतीच्या विजयाचे श्रेय जसे मोदींच्या लोकप्रियतेला दिले जाते तसेच त्यांनी दिलेल्या 'एक है तो सेफ है' या घोषणेलाही दिले जायला हवे, असे ते म्हणाले. असाच विजयाचा कौल २०१९ साली राज्यातील जनतेने शिवसेना आणि भाजपाच्या युतीला दिला होता. पण दुर्दैवाने उद्धव सेनेने मुख्यमंत्रिपदाच्या लोभापायी युतीला मिळालेल्या कौलाचा अनादर करून, भाजपाची साथ सोडली आणि महाविकास आघाडीचा सपशेल फसलेल्या नाटकाचा प्रयोग केला. त्या काळात देवेंद्र फडणवीस यांना पराकोटीचा त्रास देण्यात आला. पूर्वीच्या कार्यकाळात सुरू केलेल्या प्रकल्पांची आणि योजनांची कामे थांबविली गेली. भाजपाचे आमदार फोडण्याचेही प्रयत्न झाले. अंडरवर्ल्डच्या सहकार्याने उद्योगपतींच्या मागे भयगंड उभा केला गेला. राज्यात अविश्वासाचे वातावरण निर्माण केले गेले. याच काळात समाजमाध्यमांवर व्यक्त होणाऱ्या अनेक सामान्य लोकांच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, त्यांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लावत हिरावून घेतले गेले, त्यांची मुस्कटदाबी केली गेली. 'मी पुन्हा येणार' या देवेंद्र फडणवीसांच्या वक्तव्याची खिल्ली उडवण्यात आली. आमचे सरकार 'शेंडी जानव्याचे नाही' या शब्दांत त्यांना जातीवरून हिणवले गेले. त्यांच्या पत्नीच्या सार्वजनिक जीवनात हस्तक्षेप करून, प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला गेला आणि 'टरबुज्या' म्हणत त्यांचे वैयक्तिक चारित्र्यहननही केले गेले. पण देवेंद्र फडणवीस यांनी न डगमगता 'अहर्निशं सेवामहे' म्हणत आपल्या कामाचा झपाटा सुरूच ठेवला. कोरोना काळात त्यांच्या कामाची लगबग या राज्याच्या जनतेने अनुभवली. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री जीवाच्या भीतीने मंत्रालयात येण्यास कचरत असताना लोकांच्या मनात निर्माण झालेला भयगंड घालवण्यासाठी हा नेता रात्रीचा दिवस करून साऱ्या महाराष्ट्रातील जनतेच्या मदतीसाठी धावून गेला. कुठे अन्नछत्रे सुरू केली तर कुठे पीपीई किटचा पुरवठा सुकर केला. कुठे ऑक्सिजन सिलेंडर पुरविले तर कुठे औषधांचा तुटवडा दूर करण्यासाठी पावले टाकली. त्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रिपदी असते तर महाराष्ट्राची कोरोनाने अशी वाट लागली नसती, भ्रष्टाचाराचे रान माजले नसते आणि रुग्णसंख्याही नियंत्रणात राहिली असती, ही लोकांची प्रतिक्रिया अतिशय बोलकी ठरली. २०२२ मध्ये संधी मिळताच देवेंद्र फडणवीसांनी उद्धव सेनेची शकले पाडली. त्यानंतर पुन्हा संधी साधून त्यांनी काकांच्या हातून राष्ट्रवादीची मगरमिठी ढिली करीत अजित पवारांसाठी सत्तेचा सोपान सहजसुलभ केला. २०२४ च्या निवडणुकीत मिळालेल्या विजयाने त्यांची खेळी किती सयुक्तिक होती हे सिद्ध झाले आणि नव्या मित्रपक्षांबद्दल घेण्यात आलेले आक्षेपही हळूहळू गळून पडले.

तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची धुरा सोपविली जाण्याचा त्यांचा मार्ग निष्कंटक मुळीच नव्हता. त्यासाठी त्यांनी मोठी किंमत मोजली आहे. यापूर्वीच्या सरकारमध्ये तर त्यांनी शंभरावर आमदार पाठीशी असताना राज्याचे उपमुख्यमंत्रिपद स्वीकारून केलेला त्याग सर्वांच्याच ध्यानात आहे. म्हणूनच देशाच्या राजकारणात भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठीही त्यांचे नाव चर्चिले गेले. आपल्या रणनीतिक कौशल्याने त्यांनी महाविकास आघाडी सरकार तर उलथवून लावलेच पण पुन्हा एकदा महायुती सरकारच्या स्थापनेची मुहूर्तमेढही रोवली. देशात विविध ठिकाणी झालेल्या विधानसभांच्या आणि लोकसभेच्या निवडणुकांमध्ये त्यांनी त्यांच्यातील संभाषण शैलीचा प्रभाव टाकला आहे. त्यामुळे देवेंद्र हे निवळ राज्याचे नव्हे तर देशाचे नेते आहेत हे सिद्ध झालेले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात राज्यातील जनतेने जशी उद्धव ठाकरे यांची अकर्मण्यता अनुभवली तसाच अनुभव त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या तत्परतेचा ठायीठायी घेतला. या काळात त्यांनी राज्य सरकारला अक्षरशः कोंडीत पकडले. कोविड काळात देवेंद्र फडणवीस यांनी ज्या गतीने, आत्मीयतेने कामे केली, त्यावरून राज्याचा खरा मुख्यमंत्री कोण असा प्रश्न जनतेला पडला. पायाला भिंगरी लावल्यासारखा हा माणूस राज्यात ठिकठिकाणी फिरत होता, लोकांना मदत करीत होता.

देवेंद्र फडणवीस यांच्या काळात राज्याने विकसित महाराष्ट्राच्या दिशेने घेतलेली झेप सर्वांना अवगत आहे. त्यांच्याच कार्यकाळात राज्यात अनेक कल्याणकारी योजनांचा शुभारंभ झाला. जलयुक्त शिवार अभियान राबविले गेले आणि अनेक दुष्काळी भागांत बारमाही पाण्याची सोय झाली. त्यांच्याच सत्ताकाळात विजेचा लपंडाव कायमचा बंद झाला. विजेच्या भारनियमनावर पडदा पडला. पीकविम्याची समस्या मार्गी लावण्यासाठी त्यांच्या सरकारने केलेल्या प्रयत्नांची नेहेमीच चर्चा होती. मुंबईचा वरळी सी लिंक आणि अटल सेतूचे प्रणेते म्हणून त्यांचेच नाव पुढे येते. मुंबई, पुणे आणि नागपूर शहरांमध्ये मेट्रो सुरू व्हाव्या यासाठी त्यांनी नेहमीच अनुकूलता दर्शविली. मुंबईत मुक्काम वाढला म्हणून त्यांनी आपल्या नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघाकडे दुर्लक्ष केले नाही. 'घार उडे आकाशी, तिचे लक्ष पिलांपाशी' ही म्हण सार्थ ठरवत त्यांनी आपल्या मतदारसंघातही रस्त्यांचे जाळे विणले, क्रीडा संकुलांची उभारणी केली, मैदानांचा विकास केला आणि बगिच्यांमध्ये ग्रीन जिमची सोय केली. यासाठीच ज्येष्ठांनी त्यांच्या राजयज्ञात मतांच्या समिधा टाकल्या. झोपडपट्टीवासीयांना जमिनीचे पट्टे मिळाल्याने, त्यांचे आशीर्वाद कायम त्यांच्या पाठीशी राहिले. गतकाळात त्यांनी ओबीसी आरक्षणासाठी दिलेला लढा सर्वांना ज्ञात आहे. मराठा आरक्षण टिकवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न प्रशंसनीयच म्हणावे लागतील. आपल्या कामाची अमिट छाप त्यांनी जनतेवर पाडली असून, केव्हाही आणि कधीही अप्रोचेबल असणारा नेता आणि जनतेच्या समस्या सोडविण्यास अग्रक्रम देणारा म्हणून त्यांची ख्याती राहिली आहे. त्यांनी आखलेल्या गाळमुक्त तलाव योजनेमुळे तलावांमधील पाणीसाठ्यात वाढ झाली. राज्यातील सिंचन प्रकल्प केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या मदतीने मार्गी लावण्यातही त्यांनी मोठी भूमिका निभावली. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग ही तर त्यांचीच कल्पना. याच मार्गामुळे नागपूर-मुंबई अंतर आठ तासांत कापले जाईल. त्यांच्यासारखा बहुआयामी नेता भव्यदिव्य समारंभात तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहे. त्यांना त्यांच्या कार्यात यश मिळावे, हीच ईशचरणी प्रार्थना!

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# धर्म आणि देश

'देश की धर्म' हा एक वादाचा विषय बांगलादेशातील घडामोडींमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. या विषयासाठी ताजा संदर्भ अर्थातच आपले शेजारी असलेल्या देशांचे द्यावे लागतील. मध्यंतरी संविधान दिनाच्या कार्यक्रमात बोलताना उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी या विषयावर भाष्य केले. यांच्या बोलण्याचा अन्वयार्थ असा की, जो देश संविधानाच्या आधारे चालतो, त्या देशाने धर्मापेक्षा संपूर्ण देश म्हणजे या देशातील विविध समाज गट, धार्मिक वा सांस्कृतिक गट यांना महत्त्व न देता, सगळ्याच समाज घटकांचा एकजिनसी विचार प्राधान्याने केला पाहिजे. वरवर बोलताना वा लिहिताना हा विचार आकर्षक वाटतो. पण खोलवर विचार केल्यास लक्षात येते की, सगळ्याच विचारांच्या मुळाशी निःसंशयपणे धर्म आहे. त्यामुळेच या विषयाला संदर्भ विविध देश, त्यातही आपले शेजारी असलेल्या देशांचा घेणे आजच्या काळात जास्त योग्य ठरेल. हे चार देश म्हणजे पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार आणि श्रीलंका हे होत. आज जगातील चार प्रमुख धर्म म्हणजे म्हणजे अर्थातच ख्रिश्चन, इस्लाम, बौद्ध आणि हिंदू हेच होत. यातील दोन धर्मांचे उगमस्थान भारत असून, इस्लाम आणि ख्रिस्ती धर्म हे मध्य पूर्वेतून उगम पावलेले आहेत. आज आपल्या शेजारी देशात काय घडते आहे, हे सर्वप्रथम पाहिले पाहिजे.

सध्या आपला शेजारी देश बांगलादेश जगभरातील बातम्यांमध्ये वारंवार झळकताना दिसतो. या देशाच्या पंतप्रधान शेख हसीना आपले एक बेट (सेंट मार्टिन) वापरण्यास अमेरिकेला मज्जाव करतात. त्यानंतर त्या देशात आरक्षणविरोधी विद्यार्थी आंदोलन होते. हे आंदोलन चिघळत जाते. त्याची परिणती एका हिंसक आंदोलनात होते. जवळजवळ ३०० विद्यार्थी मारले गेल्याचा सरकारवर आरोप होतो. पोलिस आणि सैन्य दल बघ्याची भूमिका घेत लोकशाही मार्गाने निवडून आलेले शेख हसीना यांचे सरकार उलथून पडू देतात. पंतप्रधान असलेल्या शेख हसीनांना शेजारी भारतात आश्रय घ्यावा लागतो. आपल्या देशातून परागंदा होऊन अमेरिकेत जाऊन बसलेले तथाकथित अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वात एक काळजीवाहू सरकार अस्तित्वात येते. पण त्या देशातील हिंसाचार थांबत नाही. हसीनांच्या राजवटीत किंबहुना अगदी देश म्हणून बांगलादेश अस्तित्वात येण्याअगोदरपासून सुरू असलेला हिंदुविरोधी हिंसाचार आता टोकाला जातो. (१९७० च्या दशकातील बांगलादेश आंदोलनाच्या वेळीदेखील पाकिस्तानी सैन्याने बांगलादेशी हिंदूंनाच लक्ष्य केले होते, हे इथे लक्षात ठेवले पाहिजे.) हिंदू मंदिरांवर हिंसक हल्ले केले गेले. जगभरात पसरलेल्या इस्कॉन संप्रदायाच्या बांगलादेशातील मंदिरावर हल्ला केला जातो आणि इस्कॉनला आतंकवादी संघटना म्हणून जाहीर करण्यात यावे म्हणून मागणी होते. चिन्मय कृष्ण दास यांनी ढाक्यात काढलेल्या मोर्चात बांगलादेशच्या झेंड्यापेक्षा भगवा ध्वज उंच फडकत होता, असा ठपका ठेवून त्यांना अटक केली जाते. अमेरिकेचे प्यादे असलेला मोहम्मद युनूस तोंडाने बोलण्याव्यतिरिक्त काही करू शकत नाही. त्या देशातील हिंदूंचे अस्तित्व धोक्यात येते. बांगलादेशातील हिंदू विरोधी हिंसाचाराचा इतिहास सोडून दिला तरी वर्तमानात घडणाऱ्या हिंदूंच्या कत्तलींचे काय? या कत्तली बांगलादेशचा अंतर्गत मामला आहे, असे म्हणून जगभरातील हिंदू त्याकडे दुर्लक्ष करणार का, करू शकेल का आणि हिंदूंनी असे दुर्लक्ष करावे का हे कळीचे मुद्दे आहेत. धर्मनिरपेक्षतेच्या आवरणाखाली बांगलादेशात मागील ५० वर्षे सातत्याने हिंदूंची कत्तल सुरू आहे. १९७५ मध्ये बांगलादेशात एकूण लोकसंख्येच्या १३.५ टक्के असलेल्या हिंदू लोकसंख्येत घट होऊन २०११ मध्ये फक्त तेथे हिंदू लोकसंख्या ८.५ टक्के उरलेली आहे. मागील ५० वर्षांत त्या देशाच्या एकूण लोकसंख्येत दुपटीने वाढ झालेली असली, तरी हिंदूंची लोकसंख्या मात्र ७५ लाखांनी कमी झाली, असे त्याच देशाचा जनगणना अहवाल सांगतो. हाच प्रकार दुसरे शेजारी राष्ट्र (?) पाकिस्तानच्या बाबतीत घडताना दिसतो आहे. फाळणीच्या वेळी अनन्वित अत्याचार करून पाकिस्तानातून हिंदूंना पळवून लावले गेले. १९४७ मध्ये २० टक्के असलेली हिंदू लोकसंख्या आज तेथे फक्त १.६ टक्के उरलेली आहे.

म्यानमारमध्ये बहुसंख्य असलेल्या बौद्ध धर्मीयांनी तेथील रोहिंग्या मुस्लिम यांच्यावर हिंसक हल्ले करून त्यांना त्या देशातून पलायन करण्यास भाग पाडले. अर्थात ते सगळे रोहिंगे मुसलमान म्यानमारमधून पळून शेजारी असलेल्या बांगलादेश आणि भारत या देशांमध्ये आश्रयार्थ शिरले. म्यानमारमधील सरकार त्या मुसलमानांना परत आपल्या देशात घेण्यास तयार नाही. भारतासारख्या देशाने त्यांना आपल्या जमिनीवर का राहू द्यावे, हा एक प्रश्नच आहे. श्रीलंकेतही १९८० च्या दशकात उठलेला धार्मिक हिंसाचार आता जरी शांत झालेला दिसत असला, तरी तेथील सिंहली आणि तमिळ समुदायांच्या मनात अजूनही एकमेकांप्रति संशय आहे हे निश्चित. येथे लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे बहुसंख्य असलेल्या सिंहली लोकांत ख्रिश्चन आणि बौद्ध धर्माचे प्राबल्य असून एकूण लोकसंख्येत १० ते १२ टक्के असलेल्या तामिळ लोकांमध्ये बहुसंख्य हिंदू आहेत. मग देश की धर्म हा प्रश्न उभा राहिल्यास निःसंशयपणे धर्मालाच प्राधान्य द्यावे लागते. जगातील बहुतेक भूभागावर कब्जा असलेले दोन धर्म हेच सांगतात. ख्रिश्चन देश किंवा इस्लामिक देश संख्येने अनेक आहेत. त्यांच्यात आपापसात संघर्ष सुरूच असले, तरी त्या देशांच्या निर्मितीला असलेल्या अनेक कारणांमध्ये एक महत्त्वाचे कारण म्हणजे धर्म होय. एखाद्या भूभागावर राहणारे लोक आपल्या स्वतःच्या जीवनपद्धतीला निसर्गाशी जवळीक साधत आकार देतात. या जीवनपद्धतीला एक स्थिरता प्राप्त होण्याच्या प्रक्रियेत मानवी मनाला शांती मिळविण्यासाठी मग धर्म म्हणजे एक नियमबद्ध समाज जीवन आकाराला येते. मग ही जीवनपद्धती वा धर्म त्या क्षेत्रातील संस्कृतीला आकार देत असतो. त्याचवेळी संस्कृती आणि जीवनपद्धती विचार स्वातंत्र्य, उपासना पद्धती, दैवतं, दैवतं निवडीचे स्वातंत्र्य अशा विविध गोष्टींना आकार देत असते. जसजशी ही संस्कृती, जीवनपद्धती प्रगल्भ होत जाते, तसातसा त्याचा आजूबाजूच्या प्रदेशात प्रसार होत जातो. नैसर्गिकरीत्या धर्म, विचार, उपासना पद्धती यांचा प्रसार असाच होत असतो. हीच प्रसारपद्धती हिंदू धर्माला, हिंदू परंपरेला अभिप्रेत आहे किंवा हिंदू धर्म व परंपरांमध्ये अनुस्यूत होती. पण नंतर मध्य पूर्वेत उगम पावलेल्या ख्रिश्चन आणि इस्लाम धर्माने आपला धर्म प्रसार काढण्यासाठी तलवारीचा आणि सत्तेचा वापर करण्याचा निर्देश दिला. कदाचित शांतिपूर्ण मार्गाने आपला धर्मविचारांचा प्रसार होणार नाही, असे या धर्मांच्या अध्वर्यूंना वाटल्याने बळाचा वापर धर्मप्रसारासाठी आधी केला गेला असावा व नंतर या धर्मांच्या तत्त्वज्ञानात त्याचा समावेश केला गेला असावा. हिंदू धर्मात पूर्वापार स्वातंत्र्य ही संकल्पना असल्याने बळाचा वापर धर्मप्रसारासाठी करण्याचा विचार किंवा कृती दोन्ही नव्हते वा सांस्कृतिक आक्रमणाद्वारे इतर संस्कृती गिळंकृत करण्याचा विचार कधीही नव्हता. आजच्या काळात अनाक्रमक वृत्ती ही एखाद्या जनसमूहाचे अथवा धर्माचे वैगुण्य समजण्यात येते. त्यामुळे धर्म आणि संस्कृतीच्या अस्तित्वासाठी, प्रसारासाठी भूभागाच्या सीमांच्या पुढे जाऊन देश आणि धर्मासाठी आक्रमक होणे अनिवार्य आहे आणि त्यामुळेच देशाच्या तुलनेत धर्माला मोठा आयाम प्राप्त होताना दिसतो.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# पवित्र गंगाजल!

हिंदू धर्मामध्ये गंगेच्या पाण्याला अतिशय पवित्र मानले जाते. म्हणूनच गंगेचे पाणी सर्व पवित्र कार्यासाठी वापरले जाते. हिंदू धर्मात गंगाजलाला विशेष महत्त्व आहे. वर्षानुवर्षे गंगेचे पाणी खराब होत नाही, असे सांगितले जात होते. गेल्या काही वर्षांपासून गंगेचे पाणी पिण्यायोग्य आहे काय? असा सवालही उपस्थित केला जात होता. मात्र, आजही गंगेचे पाणी तितकेच पवित्र असल्याचे आता वैज्ञानिकांनी मान्य केले आहे. वर्षानुवर्षे गंगेचे पाणी तसेच ठेवले तरी खराब होत नाही. गंगाजलाच्या या शुद्धतेमागे अनेक वैज्ञानिक कारणे दडली आहेत. गंगाजलामध्ये असलेल्या बॅक्टेरियोफेजमुळे हे पाणी कधीच खराब होत नाही. गंगा नदीतून लोकांना मिळणारे पवित्र पाणी जगभरातील हिंदूंसाठी अतिशय आध्यात्मिक, शुद्ध, आदरणीय आणि महत्त्वाचे आहे असे म्हटले जाते आणि हे काही अभ्यासकांनी सिद्धही केले आहे. गंगाजलामध्ये जी शुद्धीकरण क्षमता आहे, ती सामान्य जलस्रोतामध्ये नाही, हे देखील स्पष्ट झाले आहे. त्यामुळे गंगेच्या पाण्यावरून उलटसुलट चर्चा करणाऱ्यांना आता चांगलीच चपराक बसली आहे. गंगाजलाची शुद्धता टिकवून ठेवण्यात बॅक्टेरियोफेज महत्त्वाची भूमिका बजावते. राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (नीरी) गंगाजलाच्या शुद्धतेबाबत संशोधन केले आहे. या संशोधनानुसार, गंगा नदीच्या पाण्यात आढळणारे 'बॅक्टेरियोफेजेस' हे विशेष प्रकारचे विषाणू आहेत. ते पाण्यात आलेले हानिकारक जीवाणू नष्ट करतात. याचाच अर्थ बॅक्टेरियोफेज गंगेच्या पाण्यात नैसर्गिक फिल्टर म्हणून कार्य करतात आणि यामुळे गंगेचे पाणी नेहमी शुद्ध राहायला मदत करते. गंगेला मोक्षदायिनी नदी असे म्हटले जाते. एखाद्याचा जीव शरीर सोडताना तडफडत असेल तर त्याच्या डोक्यावर गंगाजल सोडल्यास ती व्यक्ती समाधानाने शरीर सोडते, असेही हिंदू धर्मात सांगितले जाते. याशिवाय आपल्या देशात गंगेला मातेचा दर्जा दिला जातो. गंगेला मातेचा दर्जा देऊन तिचे पाणी अमृत म्हणूनही मानले जाते. म्हणूनच गंगा मातेला मोक्षदाता असे म्हणतात. त्यामुळेच मृत्यनंतर मृत व्यक्तीच्या तोंडात गंगाजल टाकण्याची परंपरा आहे. हिंदू धर्मात बहुतेक सर्वांच्याच घरांमध्ये गंगाजल नक्कीच असते. कोणत्याही शुभकार्यात गंगेचे पाणी शुभ आणि पवित्र मानले जाते. घरात गंगाजल ठेवण्याचे अनेक फायदे हिंदू धर्मात सांगितलेले आहेत. इतर नद्यांच्या तुलनेत गंगा नदीच्या पाण्यात प्राणवायूचे प्रमाण जास्त असल्याचा अहवाल केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिला आहे. मोठ्या प्रमाणात प्राणवायू असल्याने गंगेच्या पाण्याची गुणवत्ता दीर्घकाळ टिकून राहते. यामुळे गंगेचे पाणी खराब होत नाही किंवा गंगेच्या पाण्याला दुर्गंधीसुद्धा येत नाही. गंगा नदीचे उगमस्थान असलेल्या हरिद्वार आणि हृषीकेशसारख्या ठिकाणी प्राणवायू मोठ्या प्रमाणात असतो. यामुळेच अगदी पुराणकाळापासून आजपर्यंत गंगेचे पाणी सर्वांत पवित्र मानले जाते. गंगेचे पाणी हे नैसर्गिकरीत्या शुद्ध असल्यामुळे त्यात बॅक्टेरिया किंवा इतर सूक्ष्म जीव वाढू शकत नाही. त्यामुळे हे पाणी शरीरासाठी अतिशय शक्तिवर्धक असते. हिंदू धर्मात घरातील शांती कायम ठेवण्यासाठी व प्रसन्न वातावरणासाठी घरात गंगाजल ठेवणे फायदेशीर मानले जाते. गंगाजलाचा नियमित वापर केल्यास आरोग्याच्या अनेक समस्या दूर सारल्या जातात. पोटासंबंधित विकारावर गंगाजल प्रभावी औषध मानले जाते. म्हणूनच गंगेच्या पाण्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गंगेशी पुराणकाळात अनेक कथा जोडल्या गेल्या आहेत. भगीरथाच्या प्रयत्नामुळे या नदीला 'भगीरथी' म्हणतात. तिला 'त्रिपथागा' म्हणूनही ओळखले जाते. कारण ती स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळात वाहते. गंगा ज्या नावाने ओळखली जाते ती जान्हवी आहे. भगीरथाच्या नेतृत्वाखाली तिने जान्हू ऋषींच्या आश्रमात पूर आणला होता. गंगा नदीचा उगम हिमालय पर्वतावर गोमुख येथे होतो. गंगोत्री म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या या नदीतील बर्फ वितळतो तेव्हा त्यातून भागीरथी नदीचे स्वच्छ पाणी तयार होते. गंगा नदीच्या बाबतीत अनेक दंतकथा आहेत. त्या अनेकांना माहिती आहेत. मात्र गंगेचे पाणी वर्षानुवर्षे पवित्र, शुद्ध आणि आरोग्यास अतिशय पोषक असल्याचे वैज्ञानिकरीत्या पुढे आले आहे. गंगेचे हे पवित्र पाणी उत्साहवर्धक, शक्तिवर्धक आहे, म्हणूनच ते आजही पवित्र आहे. म्हणूनच त्याला 'गंगाजल' म्हटले जाते.



९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# ...आणि काँग्रेसच एकटी पडली

हरयाणा आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतरही काँग्रेसला शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. या दोन्ही निवडणुकांतील काँग्रेसच्या नुसत्या पराभवाने नाही तर अपमानास्पद पराभवाने काँग्रेसचेच नाही तर इंडिया आघाडीचे भवितव्यही धोक्यात आले आहे. काँग्रेसने आपल्या भूमिकेत बदल केला नाही तर लवकरच इंडिया आघाडी फुटल्याशिवाय राहणार नाही. याचे संकेत संसदेच्या सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनातून मिळाले आहे.

काँग्रेसने संसदेच्या हिवाळी अधिवेशनात अदानी मुद्यावरून गोंधळ घालून संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज पहिल्या आठवड्यात बंद पाडले. मात्र चुकीच्या मुद्यावरून आपण काँग्रेससोबत फरफटत जात आहे, याची जाणीव झाल्यानंतर समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने या मुद्यावर काँग्रेसची साथ सोडली आहे. डावे पक्षही काँग्रेसच्या या भूमिकेशी सहमत नाही. सपा आणि तृणमूल काँग्रेसला आलेल्या या राजकीय शहाणपणामुळेच संसदेच्या हिवाळी अधिवेशनातील दुसऱ्या आठवड्यापासून कामकाज सुरळीत सुरू झाले.

अदानी मुद्यावरून मोदी सरकारला 'आयसोलेट' करण्याच्या प्रयत्नात काँग्रेसच इंडिया आघाडीपासून 'आयसोलेट' होण्याची स्थिती उद्भवली होती. दुसऱ्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात स्वतः पडावे, तसे या मुद्यावर काँग्रेसचे झाले. त्यामुळे मोदी सरकारविरुद्ध काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी संसदभवन परिसरात मंगळवारी केलेल्या निदर्शनापासून सपा आणि तृणमूल काँग्रेसने स्वतःला दूर ठेवले होते. अदानीचा मुद्दा लोकांच्या जीवनमरणाचा नाही, तर काँग्रेस नॉनइश्यूला इश्यू करत आहे, याउलट जे खरे इश्यू आहे, म्हणजे जनतेच्या जिव्हाळ्याचे जे मुद्दे आहे, त्यावर संसदेत चर्चा करत नाही, असा इंडिया आघाडीतील पक्षांचा समज झाला आहे, तो खोटा कसा म्हणता येईल.

राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत, विरोधी पक्षांतील सगळ्या नेत्यांना सोबत घेऊन चालणे ही विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची जबाबदारी आहे. राहुल गांधींना कधी आपल्या पक्षातील नेत्यांना सोबत तसेच विश्वासात घेऊन चालता आले नाही, ते राहुल गांधी विरोधी पक्षांतील नेत्यांना सोबत घेऊन चालतील, वा त्यांच्यात विश्वास निर्माण करतील, हा प्रश्नच उद्भवत नाही. कधीकाळी राहुल गांधींचे विश्वासू म्हणून जे नेते ओळखले जात होते, त्या सर्वांनी काँग्रेस सोडली आहे. विशेष म्हणजे काँग्रेस सोडताना या सर्वांनी राहुल गांधींवरच टीका केली.

संसदेत मणिपूरचा हिंसाचार, महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा व्हावी, अशी तृणमूल काँग्रेसची भूमिका आहे, तर संभलमधील हिंसाचाराच्या मुद्यावर संसदेत चर्चा करावी, अशी समाजवादी पक्षाची मागणी आहे. मात्र काँग्रेसला अदानी मुद्याशिवाय दुसरा कोणताही मुद्दा दिसत नाही. त्यामुळे काँग्रेसपासून दूर जाण्याची भूमिका सपा आणि तृणमूल काँग्रेसला घ्यावी लागली. सपाच्या सदस्यांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांची भेट घेत संभलच्या मुद्यावर चर्चेची मागणी केली. आमच्यासाठी अदानीपेक्षा संभलचा, शेतकऱ्यांचा मुद्दा महत्त्वाचा आहे, असा घरचा अहेर सपाचे धर्मेंद्र यादव यांनी केला.

राहुल गांधी २०१४ पासून अदानीचा मुद्दा धरून बसले आहेत. असे करत राहुल गांधी यांनी स्वतःचे व काँग्रेस पक्षाचेही नुकसान केले आहे. पण राहुल गांधी यांना शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. मुळात आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार? इंडिया आघाडीतील खासदार सोडा पण काँग्रेस पक्षातील खासदारांनाही राहुल गांधी आणि मूठभर काँग्रेस नेत्यांची ही भूमिका मान्य नाही. पण त्यांना उघडपणे बोलता येत नाही, आपली नाराजी दर्शवता येत नाही. आमच्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्यासाठी जनतेने आम्हाला निवडून दिले आहे, त्यामुळे संसदेत जनतेचे प्रश्न आम्हाला मांडता येत नसतील, तर खासदार म्हणून आमचा उपयोग काय, अशी टोकाची भावना हे खासदार व्यक्त करत आहेत.

२०१४ तसेच २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपद मिळू शकले नव्हते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षनेते पद मिळतील, एवढ्या जागा काँग्रेसने जिंकल्या. राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्षनेते झाले. पण त्यांना विरोधी पक्षनेता म्हणून आपला प्रभाव पाडता आला नाही. विरोधी पक्षनेता कसा असावा, हे लोकसभेत सुषमा स्वराज, तर राज्यसभेत अरुण जेटली यांनी दाखवून दिले आहे. विरोधी पक्षनेता बोलायला उभा राहिला तर सत्ताधारी पक्षाला घाम फुटला पाहिजे. तो काय बोलतो, हे संपूर्ण सभागृह गंभीरपणे ऐकत असते. पण राहुल गांधी जेव्हा लोकसभेत बोलायला उभे होतात, तेव्हा घाम फुटणे तर सोडा पण सत्ताधारी बाजूला हसे फुटते. राहुल गांधींचे आतापर्यंतचे लोकसभेतील एकही भाषण प्रभावी म्हणता येणारे नाही. सगळ्याच नेत्यांना वक्तृत्वाची देणगी मिळाली नसते, पण अनेक नेते अभ्यास करून आपले भाषण प्रभावी करण्याचा प्रयत्न करत असतात, पण तेही राहुल गांधींना कधी करता आले नाही. संसदभवनात राजकीय नेत्यांनी विशिष्ट कपडे परिधान केलेच पाहिजे, असा दंडक नाही. मात्र स्वतःच्या वयाला आणि पदाला शोभेल, असे कपडे त्यांनी घालणे अभिप्रेत असते. संसदेत सगळ्याच राजकीय पक्षांचे नेते कुर्ता, पायजामा वा चुडीदार आणि त्यावर जॅकेट या वेषात असतात. पण राहुल गांधी नेहमीच टी-शर्ट आणि पॅन्ट घालून असतात. त्यामुळे राहुल गांधी राजकीय नेते आहेत, की कॉलेजचे विद्यार्थी, ते समजत नाही. आपल्या निवासस्थानी त्यांनी काय घालावे, हा त्याचा प्रश्न आहे. पण संसदभवनात येताना त्यांनी राजशिष्टाचाराचे पालन केले पाहिजे. आपण आता फक्त काँग्रेसचे खासदार नाही तर विरोधी पक्षनेते आहोत, याचे भान राहुल गांधींनी ठेवले पाहिजे. माणसाला नसली तरी प्रत्येक पदाला प्रतिष्ठा आणि मर्यादा असते, त्याची जाणीव त्यांनी ठेवली पाहिजे.

राहुल गांधींकडे काँग्रेसचे नेतृत्व आल्यापासून ते आतापर्यंत एकही निवडणूक मग ती विधानसभेची असो की लोकसभेची, काँग्रेसला जिंकून देऊ शकले नाही. पण याची कोणतीही खंत आणि खेद त्यांच्या वागण्यात दिसत नाही. भाजपात अमित शाह यांचा उल्लेख पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच आमचे यशस्वी अध्यक्ष असा करत होते. त्याचप्रमाणे राहुल गांधी यांचा उल्लेख ते काँग्रेसचे अध्यक्ष असताना काँग्रेस पक्षातील नेते आमचे सर्वांत अपयशी अध्यक्ष आणि नेते असा करत होते. काँग्रेस पक्षाने विशेषतः राहुल गांधी यांनी आपल्या भूमिकेत बदल केला नाही, तर आता इंडिया आघाडीतील काही पक्ष त्यांना सोडून गेले, कालांतराने आघाडीतील अन्य पक्षही सोडून गेले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. एखादा मुद्दा किती ताणायचा याचे राजकीय भान राहुल गांधींनी ठेवले पाहिजे. अन्यथा राहुल गांधींची स्थिती एका गाजलेल्या चित्रपटातील संवादाप्रमाणे 'आधे इधर आधे उधर और मेरे पिछे कोई नहीं' अशी झाल्याशिवाय राहणार नाही.

९८८१७१७८१७

### देवाभाऊ पुन्हा आले हो....

भारतीय जनता पार्टीच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाली आणि महाराष्ट्र ज्या आतुरतेने त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या शपथविधी सोहळ्यासाठी वाट बघत होता तो दिवस अखेर आज आला. खरं तर देवेंद्र फडणवीस आज तिसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. परंतु आजचा शपथविधी हा ऐतिहासिक ठरणार आहे. राज्यातील जनतेने ऐतिहासिक जनादेश भाजपा व मित्रपक्षास दिला. त्याचे प्रतिबिंब आजच्या शपथविधी सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्र अनुभवेल. फडणवीसांच्या 'मी पुन्हा येईन' या वाक्यावरून विरोधकांनी जी खिल्ली उडवली त्याचं प्रत्युत्तर आजच्या शपथविधी सोहळ्याच्या निमित्ताने आणि लोकशाही मार्गाने विरोधक अनुभवतीलच.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेस हे डबल इंजिनचे सरकार अधिक शक्ती देईल यात शंका नाही. खरं तर मुख्यमंत्रिपदापेक्षा मोठी जबाबदारी या ऐतिहासिक जनादेशाने फडणवीसांवर आली आहे त्यात ते महायुतीच्या सुयोग्य संगमातून नक्कीच यशस्वी होतील हा विश्वास आहे. देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून अभिनंदन व भावी वाटचालीस खूप खूप शुभेच्छा.

**अखिल देशपांडे**/अकोला

## वाचक पत्रे

### लाडक्या बहिणींची परत भेट

लोकसभा निवडणुकीत भाजपाने ४०० पारचा दिलेला नारा आणि त्यावर काँग्रेसने ४०० च्या वर जागा मिळाल्यास भाजपा संविधान बदलणार अशी उठवलेली आवई, त्यामुळे लोकसभा निवडणुकीवर थोडाफार परिणाम होऊन भाजपाला २४० जागा मिळाल्या तर काँग्रेसला ९९ जागांसह इंडिया आघाडीला ११९ जागा मिळाल्या. यामुळे काँग्रेस व आघाडीचे नेते उत्तेजित झाले की भाजपाला ४०० जागा न मिळू शकल्याने त्यांचा पराभव झाला असून त्यांनी राजीनामा द्यावा अशी ही मागणी करू लागले. इंडिया आघाडीला सत्ता मिळाली नाही तरी शंभरीच्या वर मिळालेल्या जागामुळे जणू आपण सत्तेतच आलो अशा प्रकारच्या एका धुंदीत आघाडीचे नेते वावरू लागले. लोकसभा निवडणुकीतील इंडिया आघाडीच्या अशा प्रकारच्या फेक नेरेटिव्हमुळे तयार झालेल्या वातावरणाचा हाच प्रभाव कायम राहिल्यास विधानसभा निवडणुकीतही युतीला जड जाणार असे वातावरण निर्माण झाले होते. मात्र परिस्थितीमुळे दडपून न जाता महायुतीने महिला उन्नती व विकासासाठी योजनांचा भडीमार केला. त्यात मध्य प्रदेशच्या धर्तीवर लाडकी बहीण योजना सुरू केली. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री मोफत तीर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, लेक लाडकी योजना राबविण्यात आली.

यावर महाविकास आघाडीने लाडकी बहीण योजनेवर पैसे कोठून आणणार अशा प्रकारची टीका करत असतानाच आम्ही निवडून आले २१०० रुपये देऊ असे जाहीर करून आपणच या योजनेबाबत द्विधा मनःस्थितीत असल्याचे दर्शविले. तसेच या योजनेला प्रभावी उत्तर अथवा प्रभावी तोड शेवटपर्यंत आघाडीला सापडली नाही. यामुळेच लोकसभा निवडणुकीनंतर कमजोर वाटत असलेली महायुतीची बाजू सक्षम झाली आणि एकहाती विजय मिळाला.

**भालचंद्र ठोंबरे**/९८३४३५०८९५

### तोंडात खडीसाखर हवी

कुटुंब प्रमुख, सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, मंत्री वगैरेंना नेहमी तोंडात साखर व चेहऱ्यावर हास्य ठेवावे लागते. निवडणूक पार पडली. भाजपाचे कमळ फुलले. विरोधकांचा थयथयाट झाला. यात प्रथमच राजकारणात प्रवेश करणारे राज ठाकरेंचे पुत्र अमित यांनी संयम, नम्रतेने अपयश स्वीकारले. त्यांचे कौतुक व अभिनंदन. संजय राऊत यांनी ईव्हीएमसंशय वर्तविला. जिथे आपले लोक जिंकले तेथील मशीन काय वेगळी होती. सर्व मतदानाच्या गोष्टी, मशीन वगैरे सर्व पक्षाच्या लोकांच्या समोर असतात. त्यावेळी तुमचे कार्यकर्ते काय करीत होते. हिंदुत्वाचे प्रखर पुरस्कर्ते बाळासाहेब ठाकरे यांचे चिरंजीव उद्धव ठाकरे यांनी मुसलमान मुख्यमंत्री म्हटले त्याच वेळी अपयशाचे द्वार त्यांचे उघडले गेले होते. हा भारत हिंदुस्थान हिंदूंचा आहे. शिंदे साहेबांनी भगिनींना अर्थात आर्थिक कमजोर महिलांना १५०० रुपये महिना दिला. त्याला तुम्ही लाच म्हणता. हा सर्व महिलांचा, भगिनींचा अपमान आहे. भावाकडून लाच स्वीकारणं ही भारतीय संस्कृती नाही. 'पाठचा भाऊ सुखी राहू' दे ही आमची भावना आहे. हे धर्मयुद्ध असून धर्माचा विजय आहे. विरुद्ध पक्षाकडे घाणेरडे बोलण्याचा खजिना आहे. भाजपा संयमी, धर्माप्रमाणे वागणारा आहे. देवेंद्र फडणवीसांना शेंडीवाला, टरबूज फुटेल असे म्हटले, पण ते शांत. कारण परस्त्री मातेसमान म्हणणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे आम्ही पुरस्कर्ते आहोत. पुरुषांच्या पाठीशी असणारी थोर शक्ती स्त्री आहे. तेव्हा बोलताना भान ठेवावे. आपण हिंदू संस्कृतीत वाढले आहो, सत्तेसाठी तिला झिडकारू नका. मनात नसेल तरी समाजाचे, स्त्रीचे, धर्माचा अवमान होईल असे वागू नका. हिंदू संस्कृती स्वार्थासाठी तुडवू नका.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## संक्षिप्त वृत्त




### सोलापूर बार असोसिएशनच्यावतीने वकील दिन उत्साहाने साजरा

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

सोलापूर बार असोसिएशनच्या वतीने वकील दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. ३ डिसेंबर डॉ. राजेंद्र प्रसाद यांची जयंती तथा वकील दिन सोलापूर बार असोसिएशन मध्ये जोमाने साजरा करण्यात आला. यावेळी वकिल दिनाच्या प्रित्यर्थाने वकिलांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार समारंभात बारचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. बापूसाहेब देशमुख, ॲड. खतीब वकील, ॲड. एस. एस. सदाफुले, ॲड. राजेंद्र फताटे, ॲड. वसंत साखरे, ॲड. हरिभाऊ पवार, ॲड. बन्सीसिंग मन्सावले, ॲड. संतोष म्हमाणे, ॲड. अनिरुद्ध सोनवणे, ॲड. म्हाळस, ॲड. ज्योती अल्ली, ॲड. मीरा सिंग, ॲड. पल्लवी साका आदी वकिलांचा सोलापूर बारचे पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्व वकिलांना गुलाब पुष्प देऊन बारच्या पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी युवा सदस्य ॲड. बापूसाहेब देशमुख, ॲड. खतीब वकील, ॲड. एस. एस. सदाफुले, ॲड. राजेंद्र फताटे, ॲड. संदीप शेंडगे, ॲड. मैत्रेयी सोलनकर, ॲड. स्नेहा पसनुर, ॲड. मीरा सिंग यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करून प्रत्येकाच्या जीवनात वकील किती महत्त्वाचा असतो आणि त्यांच्याविना नागरिकांवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडणे व त्यांना न्याय देणे शक्य नसल्याचे सांगितले. या कार्यक्रमावेळी सोलापूर बार असो अध्यक्ष ॲड. अमित आळंगे, उपाध्यक्ष ॲड. व्ही. पी. शिंदे, सचिव ॲड. मनोज पामूल, सहसचिव ॲड. निदा सैफन, खजिनदार ॲड. विनयकुमार कटारे सह सोलापूर बार असोसिएशन बहुसंख्य विधिज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव ॲड मनोज पामुल व आभार प्रदर्शन उपाध्यक्ष ॲड. विजय शिंदे यांनी केले.

### मुख्यमंत्री शपथविधी सोहळ्यासाठी श्री गहिनीनाथ महाराज औसेकर मुंबईस रवाना

**पंढरपूर, दि.४ डिसेंबर -**



देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी , गृहमंत्री अमितजी शहा यांच्या मुख्य उपस्थितीत गुरुवारी ५ डिसेंबर रोजी मुंबईत आझाद महिना मैदानावर संपन्न होणाऱ्या नवीन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या शपथविधीचे खास निमंत्रण नाथ संस्थानचे सद्गुरु व श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थान समितीचे सहअध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांना मिळालेले असून या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी महाराज आज मुंबई साठी रवाना झाले आहेत देशाचे पंतप्रधान गृहमंत्री व केंद्रीय मंत्रिमंडळातील मान्यवर मंत्री गण व अन्य मान्यवरांसोबत महाराष्ट्रातील ख्यातनाम संत महंताना ही या विशेष शपथविधी सोहळ्याकरता सन्मानाने निमंत्रित केले आहे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष या नात्याने महाराज या सोहळ्यास निमंत्रणावरून उपस्थित राहत आहेत. आपल्या गुरु गादीचे सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ शपथविधी करिता हजर राहणार यामुळे शिष्य व भक्त वर्गात आनंद व उत्साहाचे वातावरण आहे.

## निधन वृत्त...

### श्रीपती गरड



**सोलापूर,दि. ४ डिसेंबर-**

मुरारजी पेठ जुनी पोलीस लाईन येथील निवृत्त अभियंता श्रीपती भीमराव गरड (वय ७१) यांचे अल्प आजाराने सातारा येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मेकनिक दिनेश गरड यांचे ते चुलते होत.

### निरंजना उमाटे



**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

सलगरवस्ती येथील रहिवाशी निरंजना प्रवीण उमाटे (वय ३५) यांचे नुकतेच हृदय विकाराने अकस्मात निधन झाले. त्यांच्या पश्चात पती दोन मुले, सासू, दीर, नणंद पुतणे असा परिवार आहे.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील भुमापन गट नं. ५३०/२ पैकी लक्ष्मी नगर मधील प्लॉट नं.१० याचे क्षेत्र ३१५ चौ. मीटर अथवा ३३९० चौ. फुट इतकी आहे.

यासी चतुःसीमा :- पुर्वेस :- रस्ता, पश्चिमेस : स.नं.२६१/१, दक्षिणेस :- रस्ता,

उत्तरेस :- प्लॉट नं. ९. येणेप्रमाणे चतुः सीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह. ही मिळकत १. श्री. मनोहर मार्कंडेय जडल, २. सौ. गितांजली मनोहर जडल, दोघे रा. ३४/२/८५, न्यु पाच्छापेठ, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी ही मिळकत आमचे अशिलास खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती करारनामा लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही नमूद प्लॉट जागेच्या संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ०४/१२/२०२४

**अशिल नितीन मल्लिनाथ अंटद यांचे तर्फे**
**सही/-**
**ॲड. राजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर,**
**सोलापूर मो.नं. ९८८१२४०५१६**

# गुटखा, मावा विक्री राजरोस

## बंदी असूनही परराज्यांतून आवक; अन्न-औषध तसेच पोलिसांचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

सुंगधी तंबाखूसारखे आरोग्यास हानीकारक असलेले पदार्थ विक्रीस व बाळगण्यास बंदी असतानाही, सोलापूर शहर-जिल्ह्यात परराज्यातून गुटखा, सुंगधी तैवाखूसारखे पदार्थ हुप्या पद्धतीने येत असल्याचे दिसून येत आहे. पोलिसांकडून तसेच औषध प्रशासनाकडून गुटखा कारवाई करून त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा जप्त केला जात असला, तरी शहरातील पान पन्यांवर मावा-गुटखा सहजच उपलब्ध होत आहे.

तंबाखूजन्य पदार्थ आरोग्यास हानिकारक असून त्यामुळे जीवघेणे आजारही उद्भवतात. त्यामुळे तरूणांना व्यसनापासून दूर ठेऊन सदृढ समाजाच्या निर्मितीसाठी राज्यात हातभट्टी दारू, गुटखा, मावा आदींच्या विक्रिवर कडक निर्बंध आहेत. मात्र सरकारी यंत्रणाच्या दुर्लक्षामुळे आणि काही सरकारी लोकांच्या आश्रयाने हे अवैध व्यवसाय चालत असतात. गुटखाबंदी नसलेल्या अन्य राज्यातून तस्करी करून विविध वाहनांतून गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ महाराष्ट्रात



विक्रिसाठी आणले जात असल्याचे पोलिस व अन्न-औषध प्रशासनाच्या कारवायांवरून दिसून आले आहे.

परराज्यातून तस्करी करून आणलेला गुटखा, सुगंधी तंबाखूची दरवर्षीची उलाढाल कोट्यवधीच्या घरात असल्याचे बोलले जाते. शहरात अंमली पदार्थ खरेदी-विक्रीमध्ये वाढ होत असल्याने शहर या व्यसनांपासून मुक्त कधी होणार असा प्रश्न नागरीकांमधून विचारला जात आहे. राज्याच्या सीमेवर पोलिसांचे तपासणी नाके असतनाही गुटखा राज्यात येतोच कसा असा प्रश्न नागरीकांमधून उपस्थित केला जात आहे.

### शहरातील अनेक चौकांमध्ये खास माव्यांसाठींच्या टपऱ्या...

सोलापूर शहरातील अनेक परिसरातील पान टपऱ्यांमध्ये गुटखा, मावा खुलेआम पणे विकला जात आहे. शहरातील मोदी पोलिस चौकी, बेगम पेठ पोलिस चौकी, किडवाई चौक, कुंभार वेस, जोडबसवण्णा चौक, ७० फुट रोड, अशोक चौक अशा ठिकाणी तर केवळ मावा विक्रिची ठिकाणे प्रसिध्द आहेत. याठिकाणी मावा खरेदीसाठी अक्षरशः शौकीनांची मोठी गर्दी पहावयास मिळते. ठराविक ठिकाणीच घेतलेला मावा खाल्याशिवाय किक्च बसत नाही, असे अनेकांचे म्हणणे असल्यामुळे ही गर्दी पडत असल्याचे बोलले जाते. त्यामुळे प्रशासनाकडून या मावा विक्रिच्या ठिकाणांवर कारवाई करून यातील पदार्थांची तपासणी करावी, अशी मागणी नागरीकांमधून होत आहे.

# विशेष स्वच्छता मोहिमेंतर्गत ४ ठिकाणी रस्त्यावरचे अतिक्रमण हटविले

**कारवाईनंतर रस्त्याने घेतला मोकळा श्वास**

**लोखंडी खोक्यांसह इतर साहित्य केले जप्त**

**महापालिका अतिक्रमण विभागाची कारवाई**




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

विशेष स्वच्छता मोहिमे अंतर्गत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील ४ ठिकाणच्या रस्त्यावरील फूटपाथ वरील अतिक्रमण हटविण्यात आले. कारवाईमुळे रस्ता प्रशस्त झाला. येथील रस्त्याने मोकळा श्वास घेतल्याचे चित्र पाहायला मिळाले. या मोहिमेत लोखंडी खोक्यांसह इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने दि. २ ते १३ डिसेंबर दरम्यान विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रस्ते, फुटपाथ तसेच दुभाजकाची नेटक्या पद्धतीने स्वच्छता करण्यात येत आहे.

रस्त्यावरील तसेच फुटपाथवरील अतिक्रमणही काढण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आज सकाळच्या सत्रात डफरीन चौक ते डी. आर.एम ऑफिस तसेच सात रस्ता ते विजापूर नाका रस्त्यावरील व फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले.

या कारवाईत ६ लोखंडी खोके व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तर दुपारच्या सत्रात सात रस्ता परिसरातील अतिक्रमण काढण्यात आले. यावेळी तीनशे नारळ , हार व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.



सोलापूर : मार्गशीर्ष गुरुवारनिमित्त महिलांनी बुधवारी मधला मारुती चौकात खरेदीसाठी गर्दी केली होती. (छायाः केवल तिवारी)

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मानेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे मानेगांव हद्दीतील गट नं. २१७ या जमीनपैकी दक्षिणेकडील बाजूची शेतजमीन क्षेत्र ० हे.१० आर, आकार ० रु.१२ पैसे यासी चतुः सिमाः पुर्वेस बार्शी-सोलापूर रस्ता, दक्षिणेस समीर पठाण यांची जमीन, पश्चिमेस गट नं. २१८ व २९६, उत्तरेस गट नं. २१७ पैकी विनोद वाघमारे यांची जमीन. येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक शेतजमिन आतील सर्व झाडझुडूपे वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही दत्तात्रय शत्रुघ्न गडसिंग यांचे स्वतंत्रखरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर शेतजमीनी मिळकतीबाबत खरेदी घेणेबाबत बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा शेतजमीन मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेतजमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता.०४/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. लक्ष्मीकांत सिध्देश्वर झाडे**
**२२०९/३८, सिध्देश्वर निवास, गणेश नगर,**
**माढा रोड, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

### लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ

**(मल्टिस्टेट को-ऑप सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)**

जा. ५००७ क. दि. २९/११/२४

रेणूका भवन
रेणूका भवन, २ मजला सर्वे नं ३५/२अ+२ब पुष्पक हॉटेल जवळ
पाईप लाईन रोड सावेडी अ.नगर अहमदनगर ४१४ ००१

**जाहीर नोटीस**

**श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहमदनगर** --- **अर्जदार**

**विरुध्द**

| लवाद अर्ज | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ४०१२/२०२४ | | **अर्जदार - श्री रोहित विष्णू ढेरे** रा. अलीपूर रोड बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर **जामीनदार - श्री प्रसाद सुरेश माने** रा. मु. व्हनकळस प्लॉट अलीपूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर **जामीनदार - श्री भैरु नागनाथ माने** रा. ८४०/३४१/१६ व्हनकळस प्लॉट, अलीपूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |

सदर नोटीसद्वारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की अर्जदार यांनी तुमचेविरुध्द वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कमी आपण दिनांक ०७/१२/२०२४ रोजी ठिक सकळी ११.०० वा. लवाद कार्यलयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी / एकतर्फी हुकुम करण्यात येईल याची नोद घ्या सदर नोटीस माझ्या सही व शिक्यानीशी दिले असे.

शिक्का

**सही/-**
**ॲड. तनपुरे गोविंद दशरथ,**
**लवाद अधिकारी**




# भूमि अभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यांवर कारवाई करा

**जनशक्ती शेतकरी संघटनेचे उपोषण सुरु**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

एका जमीन प्रकरणात अधिकार नसताना बेकायदेशीरित्या केलेली पोट हिश्याची मोजणी रद्द करावी तसेच भूमी अभिलेख कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशीअंती कारवाई करावी या मागणीसाठी जनहित शेतकरी संघटनेच्यावतीने बुधवारपासून पूनम गेट येथे बेमुदत उपोषण सुरु करण्यात आले आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यातील मौजे बाळे येथील सोलापूर ते उस्मानाबाद रेल्वे मार्गात जाणाऱ्या एका जमीन प्रकरणात अधिकार नसताना बेकायदेशीरित्या पोट हिश्याची मोजणी करण्यात आली आहे. पोट हिश्यात बदल करून नव्याने स्वतंत्र सातबारा उतारा करण्यात आला. गैरमार्गाचा अवलंब करून रेल्वे मार्गात जाणाऱ्या क्षेत्रफळात नकाशा मध्ये बदल करून सोयीनुसार दाखविण्यात आले, असा आरोप जनशक्ती शेतकरी संघटनेचे सोलापूर शहर प्रमुख निखिल नागणे यांनी केला आहे. उत्तर सोलापूर भूमी अभिलेख उपअधीक्षक यांच्या विरोधात तत्काळ चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी यावेळी नागणे यांनी केली. यावेळी रवी काळे, शितल काळे आदी उपस्थित होते.

# कमलापूर येथून पिकअप गेली चोरीला

**सांगोला,दि.४ डिसेंबर-**

सांगोला तालुक्यातील कमलापुर येथून बोलेरो पिकअप चोरीला गेल्याची घटना दि.२ डिसेंबर रात्री बारा ते दि.३ डिसेंबर सकाळी सहाच्या दरम्यान घडली आहे. याबाबत फिर्यादी राहुल भाऊसाहेब पवार वय-२७, व्यवसाय-ड्रायव्हर रा.निळवंडी ता.संगमनेर जि.अहमदनगर यांनी अज्ञात आरोपी विरूद्ध सांगोला पोलिस ठाणे येथे तक्रार दिली आहे. याबाबत अधिक माहिती अशी, दि.२ डिसेंबर रोजी रात्री बारा ते दि.३ डिसेंबर रोजी सकाळी सहाच्या सुमारास कमलापुर ता.सांगोला येथील फिर्यादीचे रहाते खोलीचे समोरुन फिर्यादीचे ताब्यातील एक पांढ-या रंगाचे महिंद्रा कंपनीचे बोलेरो पिकअप त्याचा आर.टी.ओ.नंबर एम.एच.१४.इ एम.३०२२ हे कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे संमतीवाचुन मुद्दाम लबाडीने त्यांचे आर्थीक फायद्याकरता चोरुन नेले आहे अशी अज्ञात चोरट्याविरूध्द तक्रार दिली आहे. पुढील तपास पोहेकॉ.व्हरे करत आहेत.

## CENTRAL RAILWAY

**सोलापूर विभाग**

**कोटेशन सूचना क्रमांक SUR/C/14/स्वच्छता/वाडी/कोटेशन-02/2024.**
**तारीखः 02.12.2024**

वाडी रेल्वे स्थानकावरील निकषांनुसार नामनिर्देशित ठिकाणी रॅग उचलणे आणि कचरा विल्हेवाट लावण्यासह स्टेशनच्या साफसफाईच्या कामासाठी कोटेशन मागवणे परिणाम/क्रियाकलाप आधारावर 90 दिवसांच्या कालावधीसाठी किंवा नवीन साफसफाईच्या कराराचा LOA अंतिम होईपर्यंत यापैकी जे आधी असेल. कृपया तुमची ऑफर सीलबंद कव्हरमध्ये खाली स्वाक्षरी केलेल्या (म्हणजे वरिष्ठ विभागीय व्यावसायिक व्यवस्थापक/सोलापूर) यांना 09/12/2024 रोजी किंवा त्यापूर्वी 15:00 वाजता व्यावसायिक शाखा, DRM कार्यालय, सोलापूर येथे सबमिट करा.

कोटेशन उघडण्याची तारीख 15:30 तास आहे. 09/12/2024 रोजी.

कोटेशनची अंदाजे किंमतः रु.7,77,938.32/- (शब्दात सात लाख सत्याहत्तर हजार नऊशे अडोतीस आणि बत्तीस पैसे फक्त 18% जीएसटीसह. ईएमडी रु. 15,600 (फक्त पंधरा हजार सहाशे) सोबत सादर करणे आवश्यक आहे ऑफरसह आणि 5% कार्यप्रदर्शन हमी कराराच्या कामाचे वाटप केल्यानंतर सादर केले पाहिजे ऑर्डर

**विषय अवतरण कार्यासाठी तपशीलवार अंदाजः**

**क्रियाकलाप आधारावर ९० दिवसांच्या कालावधीसाठी वाडी रेल्वे स्थानकावरील स्वच्छता उपक्रम पार पाडण्यासाठी अवतरण कार्याचा अंदाज.**

| अं. क्र. | क्रियाकलाप | साफसफाईच्या कामाचे शेड्यूल | | | | दर/चौरसमीटर/ (मागील कोटेशनचा शेवटचा स्वीकारलेला LAR) रु 0.1221/- चौ.मी. | एकूण अंदाजे रक्कम (रु. मध्ये) | ऑफर दर (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्रफळ (sq.m) | वारंवारता | प्रमाण | एकूण | | | |
| 1 | **धूळ साफ करणे / साफ करणे** | | | | | | | |
| | i) दिवसातून दोनदा | 26661 | 2 | 90 | 4798980 | 0.1221 | 585955.458 | |
| | II) दिवसातून एकदा आणि | 134 | 1 | 90 | 12060 | 0.1221 | 1472.526 | |
| 2 | **ओले पुसणे** | | | | | | | |
| | 1) दिवसातून एकदा | 1592 | 1 | 90 | 143280 | 0.1221 | 17494.488 | |
| | | | | | | Total Sr (1) & (2) | **604922.472** | |
| 3 | **धुणे** | | | | | | | |
| | i) आठवड्यातून दोनदा | 12789 | 2 | 12 | 306936 | 0.1221 | 37476.8856 | |
| | II) आठवड्यातून एकदा | 17143 | 1 | 12 | 205716 | 0.1221 | 25117.9236 | |
| | II) दिवसातून एकदा | 198 | 1 | 90 | 17820 | 0.1221 | 2175.822 | |
| | | | | | | Total of Sr (3) | **64770.6312** | |
| 4 | **रॅग पिकिंग** | | | | | | | |
| | आठवड्यातून दोनदा | 25874 | 2 | 12 | 620976 | 0.1221 | **75821.1696** | |
| 5 | **कचरा विल्हेवाट** (पर्यायी दिवस) | | 1 | 45 | 45 | 283.05 | **12737.25** | |
| 6 | **कीटक आणि उंदीर नियंत्रण** क्रियाकलाप (महिन्यातून एकदा) | 47921 | 1 | 3 | 143763 | 0.1221 | **17553.4623** | |
| 7 | **विविध** | | | | | | | |
| | महिन्यातून एकदा | 5824 | 1 | 3 | 17472 | 0.1221 | **2133.3312** | |
| | | | | | | **Gross Total Round off** | **777938.3163 777938.32** | |

90 दिवसांच्या कालावधीसाठी वाडी स्थानकावरील कोटेशन साफ करण्यासाठी एकूण अंदाज रु. 7,77,938.32/- (शब्दांत- सात लाख सत्याहत्तर हजार नऊशे अडतीस रुपये आणि बत्तीस पैसे) क्रियाकलाप आधारावर 18% GST सह.

**टीपः-**

1. **एकाधिक सर्वात कमी ऑफरच्या बाबतीत, खालील निकषांचे निरीक्षण केल्यानंतर कोटेशन अंतिम केले जाईलः-**
   **अ) कामाचा अनुभवः** जर बोली क्षमता सारखीच असेल तर ऑफरर्स समानतेचे अधिक मूल्य पूर्ण करून समाधानकारकपणे पूर्ण केले पाहिजे मागील तीन आर्थिक वर्ष आणि चालू आर्थिक वर्षातील काम कोटेशन उघडण्याच्या तारखेपर्यंतचे वर्ष.
   **अ) आर्थिक स्थायी वार्षिक उलाढालः** मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये आणि चालू आर्थिक वर्षात कोटेशन उघडण्याच्या तारखेपर्यंतची आर्थिक उलाढाल (कंत्राटदाराची उच्च करार रक्कम), चार्टर्ड अकाउंटंटद्वारे रीतसर प्रमाणित
2. कोणत्याही कलमाचा अर्थ लावण्याबाबत कोणताही वाद असल्यास. रेल्वे प्रशासनाचा निर्णय अंतिम असेल. याद्वारे कळविण्यात येते की इच्छुक पक्षांनी सीनियर विभागीय वाणिज्य शाखेतून कोटेशन फॉर्म जमा करावेत. DRM कार्यालय कार्यालय, सोलापूर-413001. सीलबंद लिफाफ्यात सीनियर डीसीएम/सोलापूर यांना उद्देशून खाली स्वाक्षरी केलेले कोटेशन लिफाफा भरा. 09/12/2024 पूर्वी 15.00 वाजेपर्यंत जेणेकरुन वेळेत कामाची पुढील प्रक्रिया करता येईल.

**सीनियर डीसीएम/सोलापूर** 34

**अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# नगरसेवक ते मुख्यमंत्री...

## देवेंद्र फडणवीस यांची झंझावाती राजकीय कारकीर्द!

देवेंद्र फडणवीस यांचा राजकीय प्रवास अचंबित करणारा राहिला आहे. फडणवीस यांचा जन्म २२ जुलै १९७० रोजी नागपूर येथे झाला. देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात नव्वदच्या दशकात झाली व अत्यंत थोड्या कालावधीत जनमानसातील नेते म्हणून त्यांचे नेतृत्व उदयास आले.

फडणवीस यांनी नागपूर विद्यापीठातून कायद्यातील पदवीचे शिक्षण पूर्ण केले असून, व्यवसाय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी व कायदा, अर्थ, तंत्रज्ञान या क्षेत्रातील ज्ञानाचा उपयोग करून डीएसई बर्लिन येथून प्रकल्प व्यवस्थापन तंत्रातील डिप्लोमाचे शिक्षण पूर्ण केले.

देवेंद्र फडणवीसांच्या मागे त्यांच्या वडिलांची आणि काकूंची पुण्याई आहेच. पण, देवेंद्र फडणवीस यांचे स्वतःचे कष्टही महत्त्वाचे आहेत. ते १७ वर्षांचे असताना वडिलांचे निधन झाले. त्यानंतर वडिलांचे राजकीय वारसदार म्हणून पुढे येत त्यांनी वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी नागपूर महानगरपालिकेची निवडणूक जिंकत नगरसेवक म्हणून पालिकेत पाऊल टाकले.

पाच वर्षांत आपल्या कामाची चुणूक दाखवत आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पाठिंबा मिळवत वयाच्या २७ व्या वर्षी नागपूर महापालिकेचे महापौर म्हणून मान मिळवला.

महापौर झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मागे वळून पाहिलेच नाही. पुढे त्यांनी विधानसभेकडे आपला मोर्चा वळवला. नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा निवडून येण्याचा करिष्मा केला.

मतदारसंघ पुनर्रचनेनंतर नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून त्यांनी २००९ साली तिसऱ्यांदा विजय संपादन केला. २००४ मधील निवडणुकीत देवेंद्र यांनी काँग्रेसचे दिग्गज नेते रणजित देशमुख यांचा पराभव करून विधानसभेतील आणि पक्षातील आपले वजन वाढवले.

वयाच्या ४४ व्या वर्षी ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी त्यांनी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर पहिल्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. ते दुसरे सर्वांत तरुण मुख्यमंत्री ठरले होते.

२०१९ मधील विधानसभा निवडणुकीनंतरही त्यांनी अजित पवार यांच्या साथीने मुख्यमंत्रिपदाची दुसऱ्यांदा शपथ घेतली होती. मात्र, ते सरकार अवघ्या काही तासांत कोसळले. आता उद्या मुंबईतील आझाद मैदानावर नव्या सरकारचा शपथविधी होणार असून देवेंद्र फडणवीस हे तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील, हे निश्चित झाले आहे. ■

### इंदिरा गांधींच्या नावाची शाळा नको!

देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे शालेय शिक्षण तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नावावर असलेल्या इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये केले. आणिबाणीच्या काळात फडणवीस यांच्या वडिलांना, जनसंघाचे सदस्य असताना, सरकारविरोधी आंदोलनात भाग घेतल्याबद्दल तुरुंगवास भोगावा लागला होता. फडणवीस यांनी नंतर इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये त्यांचे शालेय शिक्षण सुरू असल्याने नकार दिला. त्यांना पंतप्रधानांच्या नावाच्या शाळेत जायचे नव्हते, कारण त्यांनी वडिलांना तुरुंगात टाकले होते. त्यानंतर त्यांची बदली नागपूरच्या सरस्वती विद्यालय शाळेत करण्यात आली, जिथे त्यांनी त्यांचे बहुतांश शालेय शिक्षण घेतले. फडणवीस यांनी धरमपेठ कनिष्ठ महाविद्यालयात उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. ■

### विधिमंडळातील अभ्यासू सदस्य

अंदाज समितीसह नियम, सार्वजनिक उपक्रम, नगरविकास आणि गृहनिर्माण समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, स्वयंनिधी शाळा संयुक्त समिती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संयुक्त निवड अशा विविध समित्यांवर सदस्य म्हणून कामकाज. ■





### सामाजिक योगदान

- भारतातील कृषी क्षेत्रात परिवर्तनासाठी नीती आयोगाच्या मुख्यमंत्र्यांच्या उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष.
- सचिव, आशिया प्रदेशासाठी निवासस्थानावरील जागतिक संसद सदस्य मंच.
- उपाध्यक्ष, सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक (भोसला मिलिटरी स्कूल).
- अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन.
- सिनेट सदस्य, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ. ■

### भाजपामधील प्रवास

१९८९ : नागपुरात वॉर्ड संयोजक म्हणून राजकीय कारकिर्दीला सुरुवात.
१९९० : नागपूर पश्चिम विधानसभा क्षेत्रात कार्यकारिणी सदस्य.
१९९२ : भारतीय जनता युवा मोर्चा, नागपूर शहर उपाध्यक्ष.
१९९४ : भारतीय जनता युवा मोर्चा, प्रदेश उपाध्यक्ष.
२००१ : भारतीय जनता मोर्चा, राष्ट्रीय उपाध्यक्ष.
२०१० : सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश भाजपा सरचिटणीस.
२०१३ : भाजप प्रदेशाध्यक्ष. विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर महाराष्ट्र पिंजून काढला.
२०२० : बिहार राज्यासाठी भाजपा निवडणूक प्रभारी.
२०२२ : गोवा राज्यासाठी भाजपा निवडणूक प्रभारी.

### आंतरराष्ट्रीय सहभाग

१९९९ : आंतरराष्ट्रीय पर्यावरण शिखर परिषद, अमेरिका.
२००५ : राज्य विधिमंडळाची अमेरिकेतील राष्ट्रीय परिषद.
२००६ : स्वित्झर्लंडमधील दावोस येथील आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेत भारतातील आपत्ती निवारण आणि व्यवस्थापनावर सादरीकरण.
२००६ : चीनची राजधानी बीजिंग येथील परिषदेत नैसर्गिक आपत्ती निवारणावर प्रबंध सादरीकरण.
२००७ : कोपनहेगन, डेन्मार्क येथे आशिया आणि युरोपमधील तरुण राजकीय नेत्यांच्या बैठकीत भारताचे प्रतिनिधित्व केले. ■

# फडणवीस यांनी मागवला महाकालचा प्रसाद-भस्म

◆ **उज्जैन, ४ डिसेंबर**

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार हे निश्चित झाले आहे. शपथविधीपूर्वी फडणवीस यांनी महाकाल मंदिराच्या पुजाऱ्याला निमंत्रण देत भस्म आणि प्रसाद घेऊन बोलावले आहे.

पंडित आशिष पुजारी यांनी सांगितले की, फडणवीस यांनी स्वतः फोन करून शपथविधीसाठी आमंत्रित केले आहे. त्यांच्या मुंबईला येण्यासाठी तसेच जाण्यासाठी विमान तिकीट, निवास आणि वाहनाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. आपण शपथविधीसाठी जाणार असल्याचे आशिष पुजारी यांनी सांगितले. सोबत महाकाल प्रसाद, दुपट्टा आणि रुद्राक्ष जपमाळ घेतली आहे.

फडणवीस हे भगवान महाकालचे निस्सीम भक्त आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतरही ते पहिल्यांदाच महाकालचे आशीर्वाद घेण्यासाठी उज्जैनला आले होते. त्यानंतर ते सतत येथे येऊन पूजा करत आहेत. (वृत्तसंस्था)

### मंदिराच्या पुजाऱ्यांना शपथविधीचे निमंत्रण



# फडणवीसांच्या फेट्याने दिले संकेत

◆ **मुंबई, ४ डिसेंबर**

भाजपाचे संपूर्ण १३२ आमदार बुधवारी विधिमंडळाच्या सेंट्रल हॉलमध्ये जमले होते. तिथेच ही बैठक पार पडली, जिथे चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीसांच्या गटनेतेपदाचा प्रस्ताव मांडला. याला सर्व आमदारांनी अनुमोदन दिले आणि फडणवीसांची एकमुखाने गटनेतेपदी निवड करण्यात आली. मात्र, फडणवीस यांचीच निवड होणार याचे संकेत या बैठकीपूर्वीच मिळाले होते.

विधिमंडळाच्या सेंट्रल हॉलमध्ये या महत्त्वाच्या बैठकीपूर्वी सर्व १३२ आमदारांना भगवे फेटे बांधण्यात आले. सर्व आमदारांना एकसारखे फेटे बांधण्यात आले होते. भगव्या रंगाचा हा फेटा होता, ज्याला सोनेरी रंगाची बारीक काठ होती. तुऱ्यालाही सोनेरी रंगाची बारीक काठ होती. हे सर्व आमदार सेंट्रल हॉलमध्ये बसून वरिष्ठ नेत्यांच्या येण्याची प्रतीक्षा करत होते. भाजपाच्या कोअर कमिटीची बैठक संपल्यावर जेव्हा इतर नेत्यांसोबत देवेंद्र फडणवीस विधिमंडळाच्या सेंट्रल हॉलकडे निघाले त्यांच्याही डोक्यावर फेटा बांधलेला होता. पण, हा फेटा इतर आमदारांच्या फेट्यापेक्षा खूप वेगळा होता.

फडणवीसांना बांधण्यात आलेला फेटा अतिशय आकर्षक होता. रंग सारखा असला तरी तो फेटा इतरांपेक्षा वेगळा होता. इतर आमदारांचे फेटे हे भगव्या रंगाचे आणि बारीक सोनेरी काठाचे होते. फडणवीसांच्या फेट्याला मात्र मोठी सुवर्ण काठ आणि हिरव्या रंगाची बारीक काठ होती. त्यामुळे ते इतरांपेक्षा खूप वेगळे दिसत होते. फडणवीसांनी प्रवेश घेताच तेच मुख्यमंत्री होणार याचे संकेत त्यांच्या या शानदार फेट्याने दिले होते. (वृत्तसंस्था)



भाजपाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत केंद्रीय निरीक्षक निर्मला सीतारामन् यांचे स्वागत करताना भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, देवेंद्र फडणवीस व राधाकृष्ण विखे पाटील

### ईश्वरसाक्ष शपथ घेतो, की...

#### कसा होतो मुख्यमंत्र्यांचा शपथविधी? काय असतात नियम?

केंद्र आणि राज्यांतील निवडणुकांचे उत्कंठा वाढवणारे निकाल लागले की सुरू होते मंत्रिमंडळ शपथविधीची धावपळ. जनतेचा सेवक या नात्याने जबाबदारी निभावणाऱ्या मंत्र्यांसाठी शपथविधी हा अत्यंत महत्त्वाचा आणि घटनात्मकदृष्ट्या आवश्यक क्षण असतो.

#### सरकार स्थापनेचे निमंत्रण

- बहुमत मिळालेल्या पक्षाला सरकार स्थापनेचे निमंत्रण केंद्रात राष्ट्रपती आणि राज्यात राज्यपाल देतात.
- बहुमत असलेल्या पक्षाचा किंवा आघाडीचा नेता राष्ट्रपती किंवा राज्यपालांना मंत्रिसदस्यांची यादी सादर करतो.
- केंद्रात राष्ट्रपती तर राज्यात राज्यपाल मंत्रिमंडळाला शपथ देतात.
- शपथ दोन भागांत विभागलेली असते. पहिली पदाची आणि दुसरी गोपनीयतेची.

#### कुठे होतो शपथविधी?

- केंद्रातील शपथविधी सामन्यातः राष्ट्रपती भवनात, तर राज्यातला राजभवनात होतो.
- जागेची उपलब्धता पाहून निमंत्रितांची संख्या ठरवली जाते.
- लोकप्रियतेचा निकष लावून काही शपथविधी खुल्या मैदानांवरही झाले आहेत.
- आसामात प्रफुल्ल मोहंती यांच्या नेतृत्वात विद्यार्थी संघटना सत्तेत आल्या तेव्हा खुल्या मैदानात शपथविधी आयोजित झाला.
- दिल्लीतील राजघाटावरही एकदा शपथसमारंभाचे आयोजन झाले होते.

#### निमंत्रण

- सत्तापक्षाचा नेता, मावळता नेता, मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, न्यायाधीश तसेच त्या-त्या राज्यातील संरक्षण दलाच्या विभागप्रमुखांना समारंभाचे निमंत्रण असते.

#### प्रत्यक्ष शपथविधी

- राष्ट्रगीतवादनाने समारंभाला प्रारंभ होतो.
- राजशिष्टाचार अधिकारी राष्ट्रपतींच्या किंवा राज्यपालांच्या परवानगीने मंत्र्यांची नावे पुकारतात. सर्वप्रथम पंतप्रधानांचे किंवा मुख्यमंत्र्यांचे नाव पुकारले जाते.
- मंत्रिमंडळाचा प्रमुख या नात्याने पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री सहकाऱ्यांची नावे पुकारण्याची परवानगी राष्ट्रपती किंवा राज्यपालाला मागतात.

#### शपथ घेताना

- ईश्वराला साक्ष ठेवून किंवा सदसद्विवेकबुद्धीला स्मरून शपथ. (कुठला प्रकार स्वीकारावा, याबाबत निश्चित नियम नाही.)
- शपथविधीच्या काही काळ अगोदर मंत्र्यांना मसुदा सोपवला जातो. आपणास शपथ ईश्वराला स्मरून घ्यायची आहे किंवा कसे ते विचारले जाते.
- शपथविधीचे जाहीर वाचन झाल्यानंतर संबंधित मंत्री मसुद्यावर स्वाक्षरी करतो. हे पत्र त्यानंतर सरकारी दस्तावेज होते. त्याची मूळ प्रत राजभवनात ठेवलेली असते.

#### कुणाला शपथ देतो...

राष्ट्रपती - सरन्यायाधीश
उपराष्ट्रपती - राष्ट्रपती
सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश : राष्ट्रपती
पंतप्रधान : राष्ट्रपती
केंद्रीय मंत्रिमंडळ : राष्ट्रपती
लोकसभेचे सदस्य : राष्ट्रपती (पान ३३)
राज्यसभेचे सदस्य : राष्ट्रपती (उपराष्ट्रपती)
राज्यपाल : उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश
राज्य मंत्रिमंडळ : राज्यपाल
विधानसभा सदस्य : राज्यपाल
विधान परिषद सदस्य : राज्यपाल ■

# वयाच्या २७ व्या वर्षी नागपूरचे सर्वांत तरुण महापौर

१९९७ मध्ये वयाच्या २७ व्या वर्षी देवेंद्र फडणवीस हे नागपूरचे सर्वांत तरुण महापौर झाले. १९८७ मध्ये देवेंद्र फडणवीस १७ वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. १९८९ मध्ये महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषद म्हणजेच अभाविपचे सक्रिय सदस्य बनले. १९९२ मध्ये नागपूर महानगर पालिकेत फडणवीस नगरसेवक झाले.

१९९७ मध्ये वयाच्या २७ व्या वर्षी ते नागपूरचे सर्वात तरुण महापौर झाले. महापौर झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षांनी देवेंद्र फडणवीस १९९९ मध्ये नागपूर पश्चिम मतदारसंघातून निवडणूक जिंकून पहिल्यांदा विधानसभेत पोहोचले. २००४ मध्ये ते त्याच मतदारसंघातून पुन्हा आमदार झाले. २००९ ते २०१९ पर्यंत सलग तीन वेळा नागपूर दक्षिण पश्चिममधून आमदार म्हणून निवडून आले. ■





# चारचाकी नाही, कशात गुंतवणूकही नाही

### देवेंद्र फडणवीसांची संपत्ती किती?

◆ **मुंबई, ४ डिसेंबर**

निवडणूक आयोगासमोर देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीच्यावेळी त्यांच्या संपत्तीची माहिती सादर केली होती. त्यानुसार फडणवीस यांची एकूण १३.२७ कोटी रुपयांची संपत्ती आहे. याचसोबत त्यांच्यावर ६२ लाख रुपयांचे देणे देखील आहे. २०२३-२४ या कालावधीत देवेंद्र फडणवीस यांचे उत्पन्न एकूण ७९.३ लाख रुपये होती. याच्या एक वर्षापूर्वी त्यांचे उत्पन्न जवळपास ९२.४८ लाख रुपये इतके होते.

निवडणूक आयोगासमोर सादर करण्यात आलेल्या उत्पन्न दाखल्यानुसार देवेंद्र फडणवीस आणि त्यांची पत्नी अमृता फडणवीस यांच्या बँक खात्यात पाच लाखांहून अधिक डिपॉझिट आहे.

- देवेंद्र फडणवीस यांनी शेअर बाजार, बॉण्ड इत्यादीमध्ये गुंतवणूक केलेली नाही. मात्र, पत्नी अमृता फडणवीस यांनी जवळपास ५.६३ कोटी रुपयांचे बॉण्ड, शेअर आणि म्युचअल फंडमध्ये गुंतवणूक केली आहे.
- फडणवीस यांच्या एनएसएस पोस्टल सेव्हिंग खात्यात १७ लाख रुपये जमा आहेत.
- त्यांच्याकडे तीन लाख रुपयांची एलआयसी पॉलिसी देखील आहे.
- देवेंद्र फडणवीस यांच्या इतर संपत्तीबद्दल बोलायचे झाले, तर त्यांच्याकडे ४५० ग्रॅम सोने आहे व त्यांची पत्नी अमृता यांच्याकडे ९०० ग्राम सोने आहे. याची किंमत जवळपास ९८ लाख रुपये एवढी सांगितली जाते.
- विशेष म्हणजे, देवेंद्र फडणवीस तसेच त्यांच्या पत्नीकडे कुठलेही चारचाकी वाहन नाही.
- देवेंद्र फडणवीस यांच्यावर दोन कर्ज आहेत, जे त्यांच्या पत्नीकडून घेण्यात आले आहे, जवळपास ६२ लाख रुपयांचे कर्ज त्यांच्यावर आहे.
- देवेंद्र फडणवीस यांच्याकडे स्थावर मालमत्ता बघितली, तर पती-पत्नी दोघांकडे मिळून १.२७ कोटी रुपयांची शेतजमीन आहे.
- फडणवीस यांच्या नावावर ३ कोटींचे एक घर आणि ४७ लाख रुपयांचे दुसरे घर आहे. या व्यतिरिक्त त्यांची पत्नी अमृता फडणवीस यांच्या नावावर देखील ३६ लाखांची रेसिडेन्शियल प्रॉपर्टी आहे.

(वृत्तसंस्था)



# शपथविधीसाठी ५ तारीखच का?

◆ **मुंबई, ४ डिसेंबर**

देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी राजभवनावर जाऊन राज्यपालांची भेट घेतली आणि सत्ता स्थापनेचा दावा केला. यानंतर आता ५ डिसेंबर २०२४ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर भव्य शपथविधी सोहळा होणार आहे. शपथविधी सोहळ्यासाठी अनेक मुहूर्त ठरवण्यात आले होते. परंतु, ५ डिसेंबर २०२४ हीच तारीख निश्चित करण्यात आली.

भगवद्गीतेच्या दहाव्या अध्यायात मार्गशीर्ष मास हा माझा अत्यंत आवडता आहे, असे भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे. तत्त्ववेत्त्यांच्या भगवान श्रीकृष्ण यांची जी भूमिका आहे, तीच भूमिका देवेंद्र फडणवीस संपूर्ण महाराष्ट्रात बजावत आहेत. ५ डिसेंबर रोजी गुरुवार, पंचमीचा मुहूर्त आहे. चंद्र मकर राशीत आहे, सूर्य वृश्चिक राशीत आहे, गुरु ग्रह वृषभ राशीत आहे. ५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजून ५७ मिनिटांनंतर श्रवण नक्षत्र लागत आहे. याचे वृषभ नावाचे जे स्थिर लग्न आहे आणि ध्रुव नावाचा अढळ योग आहे. जसा ध्रुव तारा हा अढळ आहे, तसे पाच वर्षे हे सरकार अढळ राहील, कुठल्या पद्धतीचे वादविवाद किंवा कोणती क्लेषात्मक भूमिका कुठली मांडली जाणार नाही.

**धर्मशास्त्रांत अत्यंत महत्त्वाचा योग**

निर्विघ्नपणे हे सरकार चालेल. असे ५ वाजून ५७ मिनिटांच्या कुंडलीचे वैशिष्ट्य आहे. देवेंद्र फडणवीस सूचना पोहोचवण्यात आली आहे की, तुम्ही ५ वाजून ५७ मिनिटांनंतर शपथ ग्रहण करावी. तसेच ६ वाजून ५० मिनिटांपर्यंत हा योग आहे. त्यावेळात हा सर्व विधी व्हावा, अशी धर्मशास्त्रीय रचना सांगते, अशी माहिती नाशिकचे महंत सुधीरदास पुजारी यांनी दिली.

**पक्ष, सरकार आणि सर्वांचे हित लक्षात घेऊन शुभ मुहूर्त**

सर्व एकादशीच्या एक अनुष्ठान अजित पवारांसाठी नाशिकच्या काळाराम मंदिरात ठेवण्यात आले होते. एकनाथ शिंदे तीनवेळा काळाराम मंदिरात येऊन गेले. सर्वांचे एकंदरीत हित लक्षात घेऊन, सरकारचे हित लक्षात घेऊन, सर्व पक्षांचे हित लक्षात घेऊन हा अत्यंत शुभ मुहूर्त काढलेला आहे, असेही सुधीर दास महंत यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# कपड्याच्या दुकानासाठी मॉडेलिंग

देवेंद्र फडणवीस यांच्या बाबतीत एक किस्सा चांगलाच प्रसिद्ध आहे. २००६ मध्ये देवेंद्र फडणवीस आमदार होते. नागपूर शहरातील एका कपड्याच्या दुकानासाठी त्यांनी मॉडेलिंग केले. नागपूर शहरातील प्रत्येक चौकात कपड्याच्या दुकानाच्या जाहिरातीत फडणवीसांचे मोठमोठे होर्डिंग लावण्यात आले. ही बातमी भाजपाचे तत्कालीन सर्वांत मोठे नेते अटलबिहारी वाजपेयींपर्यंत पोहोचली. काही दिवसांनी त्यांनी फडणवीस यांना भेटण्यासाठी दिल्लीला बोलावले. वाजपेयींनी त्यांचे स्वागत केले होते आणि म्हणाले या, मॉडेल आमदार या, फडणवीसांच्या बाबतीतला अनेक किस्स्यांपैकी हा किस्सा कायच चर्चेत राहिला. ■



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### पंढरपूरच्या अंधशाळेत दिव्यांग दिन साजरा

**पंढरपूर, दि. ४ डिसेंबर-**

लायन्स क्लब पंढरपूर यांची अंधविकास संस्था संचलित शहीद मेजर कुणाल गोसावी निवासी अंधशाळा पंढरपूर येथे जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वेळापूर (ता.माळशिरस) येथील व्यापारी नंदकुमार होडगे व त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.हेलन केलर व लुई ब्रेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत स्वागत गीताने करण्यात आले. दिव्यांग दिनाच्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.त्यामध्ये धावणे, उभे राहून लांब उडी, पासिंग द बॉल, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. आभार उमा कुलकर्णी व नितीन कटप यांनी मानले. सूत्रसंचालन महेश म्हेत्रे यांनी केले.



### पाश्चात्य संस्कृतीच्या अनुकरणामुळे भारतीयांचे आरोग्य धोक्यात : डॉ. कुलकर्णी

**श्रीपूर, दि. ४ डिसेंबर-**

दिवसेंदिवस मधुमेह व हृदयविकार या विकारांचे प्रमाण नागरिकांमध्ये वाढताना दिसत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आपण आपली संस्कृती विसरून पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करत असल्याने या समस्या निर्माण होत आहेत, असे प्रतिपादन कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी केले. श्रीपूर येथे डॉ. सुधीर पोकळे यांचे हॉस्पीटलमध्ये हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर अकलूज येथिल प्रसिद्ध फिजीशिएन डॉ. निनाद फडे, हृदयरोग तज्ञ डॉ. सचिन शिर्के, डॉ. सौरभ गांधी मधुमेह तज्ञ नितिन आर्वे, श्रीपूरचे डॉ. प्रमोद पवार, डॉ. गायकवाड, डॉ. आरती पोफळे, डॉ. विनोद शिंदे, डॉ. सचिन पाटील, पांडुरंगचे ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, चिफ इंजिनिअर अमोल बारटक्के, युनियनचे विजय पाटील, अनंत जाधव उपस्थित होते. विजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी रोहन वडशिंगकर, हेमंत दिक्षित , प्रमोद गाडे , निसार ईनामदार, वैभव कांबळे, जगदिश अग्निहोगी, दशरथ हिवराळे, समाधान साठे, सोमनाथ चव्हाण , मनीषा खरात, रोहीणी लोंढे, लक्ष्मी नाईकनवरे, इश्वर नवले, बाला गाडे यांनी परिश्रम घेतले शिबीराचा सुमारे दीडशे जणांनी लाभ घेतला.



### ओंकार कारखान्याचा नवीन प्रकल्प कार्यान्वित : बोत्रे-पाटील

**पिलीव, दि. ४ डिसेंबर-**

ओंकार साखर कारखाना चांदापुरी (ता. माळशिरस) या कारखान्याची गाळप क्षमता कमी होती त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाचे गाळप करण्यात मर्यादा होत्या हे ओळखून परिवाराचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील संचालिका रेखाताई बोत्रे संचालक प्रशांत बोत्रे पाटील यांनी प्रतिदिन गाळप क्षमतेत वाढ करण्याचे काटेकोर पणे नियोजन करून २०२४-२५ या सिझनसाठी चार हजार टन गाळप क्षमतेचा नवीन प्रकल्प मंगळवारी पहाटे ३ वाजता प्रशांत बोत्रे पाटील यांच्या हस्ते पूजा करून सुरू करण्यात आला. यावेळी प्रशांत बोत्रे-पाटील म्हणाले, आपल्या जुन्या कारखान्याची गाळप क्षमता कमी असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संपूर्ण ऊसाचे गाळप करू शकत नव्हतो ही अडचण लक्षात घेऊन चेरअमन बाबुराव बोत्रे-पाटील यांनी प्रतिदिन गाळप क्षमतेत वाढ व उपपदार्थ निर्मित प्रकल्प हाती घेऊन पूर्णत्वास नेले त्याचा प्रत्यक्ष शुभारंभ करण्यात आला भविष्यात ऊस गाळपाची वाहतुकदारांच्या व ऊस दराची समस्या राहणार नाही तरी शेतकऱ्यांत ओंकार ला ऊस घालावा असे आवाहन बोत्रे-पाटील यांनी केले या वेळी जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे कन्सल्टंट सुरेशतावरे चीफ इंजिनिअर तानाजीराव देवकते डिसलरी मॅनेजर पी.डी.पाटील, धनाजी पवार, धन्यकुमार जामदाडे, अमोल तरंगे उपस्थित होते.



### सांगली अर्बन बँक कुर्डुवाडी शाखेचा वर्धापन


**कुर्डूवाडी, दि. ४ डिसेंबर-**

सांगली अर्बन बँक, कुर्डुवाडी शाखेचा ३९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विभागीय अधिकारी विश्राम भरणे हे प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी शाखाधिकारी प्रवीण बुडुख यांनी बँकेची वाटचाल कशाप्रकारे वृद्धींगत होत आहे हे सांगितले. विविध खातेदार, सभासद, हितचिंतक यांनी शाखेस भेट देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. भरणे यांनी उपस्थितांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. यावेळी शाखा सल्लागार राजकुमार धोका, अमोल कुलकर्णी, वसुली अधिकारी बोतेकर, चंद्रशेखर झांबरे, श्रीपाद क्षीरसागर, तुषार शिंदे, सत्यवान माळी उपस्थित होते.

# आ. जानकरासह ८८ ग्रामस्थांवर गुन्हा दाखल

## मारकडवाडी मतदान प्रकरण भोवले

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ४ डिसेंबर-**



विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतमोजणीवर शंका घेत मारकडवाडी गावातील काही ग्रामस्थांनी आपल्या गावापुरते फेर मतदान घेण्याचा घाट घातला होता. त्या अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग यांनी दि. २ डिसेंबर ते ५ डिसेंबर २०२४ या दरम्यान भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मौजे मारकडवाडी या गावात जमावबंदी करण्यात आली होती. परंतु सदर गावातील ग्रामस्त यांनी मारकडवाडी गावात सकाळी ७ वाजलेपासून सुमारे २५० ते ३०० अंदाजे लोकांचा बेकायदेशीर जमाव जमवुन बैलेट पेपरवर मतदान करण्याची प्रक्रीया राबवण्याची तयारी केली होती.

या गावात उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलूज यांचे आदेशान्वये कायदा व सुव्यवस्था कामी महसुल नायब तहसिलदार सिद्धिनाथ विठठल जावीर यांची नेमणुक करण्यात आली होती. त्यांचे फिर्यादीवरून आमदार उत्तमराव शिवदास जानकर, गौतम आबा माने, बाबा माने, मारुती देशमुख, युवराज झंजे, विष्णू नारणवर, शामराव बंडगर, कालिदास रुपनवर, भानुदास सालगुडे, तुकाराम ठवरे, बाजी माने, दादा माने, हनुमंत सरगर, पांडुरंग वाघमोडे, सोमनाथ पिसे, माणिक एकनाथ वाघमोडे, हनुमंत ठवरे, तुकाराम देशमुख, जावेद मुलाणी, अजय सकट, आनंदा विष्णु मारकड, रणजित सरवदे, रजनिश बनसोडे, साजन माने देशमुख, संतोष माने, अभिजीत साठे, हनुमंत वायदंडे, हनुमंत शेंडगे, बापु मुंगुसकर, स्वप्निल पवार, स्वप्निल दत्तात्रय वाघमारे, रामा शेंडगे, बाबा तुपे, जब्बार मुलाणी, मामा पांढरे, नाथा रुपनवर, नाना शिंदे, प्रकाश कदम, सुनिल पाटील, बंडु पाटील, संतोष सोपान वाघमोडे, माऊली पाटील, भिमराव नरुटे, विक्रम पाटील, मनोज दडस, आप्पासाहेब देशमुख, सचिन सावंत, सर्जेराव जानकर, संतोष देशमुख, संतोष बंडगर, पिनु पाटील, रोहिदास रणदिवे, किसन ढोबळे, रामा रणदिवे, दादा लाळगे, वैभव रणदिवे, दिपक रणदिवे, दिपक रामा रणदिवे, अशोक बंडगर, मोहण बापुराव झंजे, आप्पासाहेब पंढरीनाथ वाघमोडे, सागर तानाजी मारकड, रामदास शिवाजी काळे, समादान भोसले, जिवन बाळासाहेब देवकाते, आण्णा मारुती हाक्के, नाथा सुरेश देवकाते, काकासाहेब पांडुरंग घुले, राम आण्णा शेंडगे, बाजी पंढरीनाथ वाघमोडे, हनुमंत ज्ञानेश्वर लाळगे, राहुल बाबासो बंडगर, पोपट बाबुराव विर, शशिकांत मेघराम दिक्षीत, प्रविण रमेश बागल, संतोष बाबुराव वाघमोडे, योगेश नारायण ढोबळे, संतोष लक्ष्मण वाघमोडे, सचिन मधुकर जाधव, दादा ज्ञानदेव चव्हाण, राजेश विष्णु चव्हाण, गणेश विजय मारकड, सागर बिचुकले, प्रेम देवकाते, राजाभाऊ रुपनवर, रणजित मारकड, तेजस पाटील, शहाजी बाळु वाघमोडे व इतर काही लोक यांचेविरूध्द बेकायदेशीर जमाव जमवुन आदेशाचा भंग केला आहे म्हणुन नातेपुते पोलीस ठाणे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सांगोल्यातील मिरज रोड रेल्वे भुयारी मार्ग येथे अपघाताची मालिका सुरूच



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.४ डिसेंबर -**

सांगोला शहरातील मिरज रोडवरील भुयारी मार्ग सुरु झाल्यापासून रेल्वे पुलाखालून सातत्याने होत असलेली पाण्याच्या गळतीमुळे या ठिकाणी सतत लहान-मोठे अपघात दररोज घडत आहेत. मिरज रोड परिसरात एम आयडीसी, सूतगिरणी, अनेक मोठे उद्योग समूह, शाळा कॉलेजेस आहेत. येथे जाणाऱ्या-येणाऱ्या नागरिकांना फार मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सांगोला शहरातील मिरज रेल्वे गेटवरील भुयारी मार्गाची नेहमीच्या पाणी गळतीमुळे अत्यंत दुरावस्था झालेली आहे. भुयारी मार्गावरील रस्त्यावर खड्डे पडले असून रस्त्यावर नेहमीचे पाणी साचून राहते. मोठ्या प्रमाणावर गाळ असतो. गाळामुळे ये-जा करणाऱ्या वाहनांना अपघातास सामोर जावे लागत.

रेल्वे पुलाखाली पाण्याचा व चिखलाचा राडाच मोठ्या प्रमाणात झाला असल्यामुळे अनेक नागरिक घसरुन पडत असून गंभीर प्रकारच्या इजा झाल्या आहेत. भुयारी मार्गामधून प्रवास करत असताना सांगोला शहर व परिसरातील नागरिकांना मरणयातना सोसाव्या लागत आहेत.

> गेल्या आठवड्यापासून अनेक लोकांनी माझ्याकडे याबाबत तक्रारी केल्या आहेत या गंभीर प्रश्नाकडे रेल्वे अधिकारी व माढा लोकसभा मतदार संघाचे खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांच्याशी चर्चा झाली असून लवकरात लवकर या गंभीर प्रश्नावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यात येईल.
>
> **-आ.डॉ.बाबासाहेब देशमुख**

> याठिकाणी अपघात होऊन जीवितहानी झाली तर याला पूर्णपणे रेल्वे प्रशासन जबाबदार राहील. येत्या ४ दिवसात येथील समस्येवर उपाय योजना न केल्यास शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटने तर्फे रेल रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याची संपूर्ण जबाबदारी रेल्वे प्रशासनाची राहील.
>
> **-निलकंठ शिंदे**

# म्हैसगावच्या तरुणाचा अभिजीत पाटलांसाठी चप्पल न घालण्याचा निर्णय



## अभिजीत पाटील आमदार होताच टेंभुर्णी येथे घातली चप्पल

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ४ डिसेंबर-**

माढा विधानसभा मतदारसंघात यावेळेस निवडणूकीचे वातावरण चांगलेच तापले होते आमदार कोण होणार यासाठी मतदारसंघासह जिल्ह्यात शर्यती व नवस बोलले जात होते. ज्याच्या त्याच्या समर्थकांकडून आपला उमेदवार निवडून यावा म्हणून काही पन केले जात होते. त्याचाच एक भाग म्हणून विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील हे आमदार व्हावे म्हणून त्यांच्या म्हैसगावच्या आप्पासाहेब राऊत या समर्थकाने अभिजीत पाटील आमदार होत नाहीत तोपर्यंत चप्पल न घालण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी केलेला हा निर्धार यशस्वी होऊन अभिजीत पाटील हे माढा विधानसभेचे आमदार झाले आणि काल टेंभुर्णी येथे अभिजीत पाटील यांच्या उपस्थितीत चप्पल घालून त्यांनी केलेला निर्धार पूर्ण केला आमदार अभिजित पाटील यांनी आप्पासाहेब राऊत यांचा सत्कार करुन विठ्ठलाची मूर्ती भेट दिली. याप्रसंगी बोलताना अभिजीत पाटील भावुक होऊन म्हणाले, माझ्या जीवाला जीव देणारी माणसं असल्यामुळे माझा विजय सोपा झाला आहे. या कार्यकर्त्यांच्या जीवावरच मी गेली तीस वर्ष माढा विधानसभेवर सत्ता गाजवणाऱ्या प्रस्थापिताच्या विरोधात लढाई यशस्वीपणे जिंकू शकलो माझ्या विजयात माझ्या या सहकाऱ्यांचा शंभर टक्के वाटा आहे आणि मी आमदार नसून माझ्या जीवाभावाचे सहकारी व कार्यकर्ते हेच आमदार आहेत. माढा विधानसभेच्या जनतेने जे प्रेम माझ्यावर केले व मला या मतदारसंघातून विजय करून त्यांची आमदार म्हणून सेवा करण्याची संधी दिली त्या संधीचे सोनं करून मी त्यांची मनापासून सेवा करून माढा विधानसभेचा विकास करेन व जनतेला दिलेला शब्द पुढील काळात पाळणार आहे. हा झालेला माझा विजय मी माझ्या सर्व कार्यकर्ते व सहकाऱ्यांना समर्पित करतो आहे.



# शिवाजी पॉलिटेकनिक कॉलेजमध्ये पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ४ डिसेंबर-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज मधील प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा संपन्न झाला. मेळाव्याची सुरुवात पालक प्रतिनिधी तानाजी पाटील, संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड, महिला पालक प्रतिनिधी सुरेखा बाबर व प्राचार्य डॉ.आर.ए. देशमुख यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली. यावेळी डॉ. देशमुख यांनी कॉलेजच्या प्रगतीचा आढावा सादर करून उन्हाळी परीक्षा २०२४ च्या निकालचे वाचन केले. यावेळी सुरेखा बाबर व तानाजी पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांच्या गुणात्मक विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या दत्तक पालक योजना व रात्र अभ्यासिका या उपक्रमांचे कौतुक केले. तसेच पालकांनी केलेल्या सूचनांची दखल घेऊन बाबुराव गायकवाड यांनी बोलताना सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची ग्वाही देत पालकांनी आपल्या पाल्यांना मोबाईलच्या अतिवापरापासून दूर ठेवण्याचे आवाहन केले. मेळावा यशस्वीतेसाठी प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा.एस. एस.कुलकर्णी यांनी केले. आभार प्रा.पी.सी.चव्हाण यांनी मानले.

# कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी तयारीला लागावे : ॲड. मिनल साठे

## राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ४ डिसेंबर-**



> राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवल्याबद्दल पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या अभिनंदनचा ठराव नगराध्यक्ष ॲड.मिनल साठे यांनी मांडला. व या ठरावाला अनुमोदन आढेगावचे उपसरपंच भाऊ वाघ यांनी दिले.

माढा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार माढा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष ॲड. मिनल साठे यांचा पराभव झाल्यानंतर प्रथमच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या साठे पार्टीच्या कार्यकर्त्यांची चिंतन बैठक माढा येथे घेण्यात आली.

यावेळी माजी आमदार धनाजीराव साठे यांनी बोलताना सांगितले की या विधानसभा निवडणुकीत आपला पराभव झाला असला तरी कार्यकर्त्यांनी खचून न जाता या राज्यात भक्कम अशा बहुमताने महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे आपल्या माढा विधानसभा मतदारसंघासाठी सरकारच्या माध्यमातून लोकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी व मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्याकडून वेळोवेळी मदत मिळणार आहे. त्यामुळे आगामी येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सर्व निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. नगराध्यक्ष ॲड. मिनल साठे यांनी सांगितले, या विधानसभा निवडणुकीत विरोधकांनी आपला अपप्रचार करून व उसाच्या भावाचे राजकारण करून आपल्याला या निवडणुकीत पराभूत केलेले आहे. परंतु या मतदारसंघात मी एक महिला उमेदवार म्हणून पूर्ण ताकदीनिशी लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न या निवडणुकीच्या माध्यमातून केलेला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादांनी माझ्यावरती टाकलेला विश्वास सार्थ ठरवून या मतदारसंघाच्या प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी पाठपुरावा करणार आहे. नुकतेच अजितदादा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेत्यांची ची भेट घेतली असता त्यांनी आम्हाला आश्वासित केले आहे. की आपण पराभवानी खचून न जाता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपण पूर्ण ताकतीनिशी लढवाव्यात. पक्ष म्हणून या मतदारसंघाच्या विकासासाठी आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न करणार आहेत, असे वरिष्ठांनी आश्वासन दिलेले आहे. या बैठकीसाठी ॲड. धनाजीराव साठे, ॲड. मिनल साठे, उपनगराध्यक्ष कल्पना जगदाळे, संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, कारखान्याचे व्हाईस चेअरमन सुधीर पाटील उपस्थित होते.

# जिजामाता प्रसूतीगृहात नवजात बालकाचा मृत्यू

## चौकशीअंती दोषींवर कारवाई : आरोग्य अधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

> जिजामाता प्रसूती प्रसूतीगृहात घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी अन दुःखदायक आहे. सर्व उपस्थित असताना एका बालकाचा मृत्यू होणे हे दुर्दैवी, खेदजनक आहे. चिंताजनक आहे. याबाबत त्या कुटुंबियांचे मी सांत्वन करेन. या प्रकरणाची सर्व माहिती घेतली आहे. एक समिती नेमणार आहोत. डॉक्टर असो सिस्टर असो संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. डॉक्टर नसतील तर ते का आले नाहीत. याचीही चौकशी केली जाईल. डॉक्टर दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल, असे महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले आहे.

सोलापूर : महापालिकेच्या जिजामाता प्रसूतीगृहात एका नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. प्रसूतीवेळी डॉक्टर उपस्थित नसल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. दरम्यान, याप्रकरणी समिती नेमून चौकशी करण्यात येईल. यामध्ये दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या जिजामाता प्रसूतीगृहात आज दुपारी एका महिलेस प्रसूतीसाठी दाखल केले होते. दरम्यान नवजात बालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे या हॉस्पिटलमध्ये नातेवाईकांसह नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

दरम्यान, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष अजित कुलकर्णी यांनी केली आहे. बागवान नामक व्यक्तीने त्यांच्या पत्नीस दुपारी जिजामाता प्रसूती प्रसूतीगृहात ॲडमिट केले होते. नॉर्मल डिलिव्हरी होईल असे येथील डॉक्टरांनी सांगितले होते. दरम्यानच्या काळात महिलेची कंडीशन क्रिटिकल झाली. नवजात बालकाचा मृत्यू झाला. यापूर्वी अशा घटना घडल्या होत्या. डॉक्टर वेळेवर आले नाहीत असा आरोप नातेवाईकांनी केला असल्याचे अजित कुलकर्णी यांनी म्हटले आहे. डॉक्टर वेळेवर आले असते तर ही घटना घडली नसती. त्यानंतर नवजात बालकास सिव्हिल हॉस्पिटलला पाठवण्यात आले. महापालिकेला जाग येत नाही. ही गंभीर बाब आहे. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नये यासाठी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष अजित कुलकर्णी यांनी दिला आहे.



# मुकुंद नगरात सार्वजनिक शौचालयांची दुरावस्था

## अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी केली ऑन द स्पॉट पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

दाट लोक वस्ती असलेल्या भवानी पेठ मुकुंद नगर मराठा वस्ती मधील साठ वर्षांपूर्वी बांधलेल्या सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झाली आहे. दरम्यान, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी प्रत्यक्ष येऊन पाहणी केली.

आर. बी. दयावान संस्थेच्या वतीने दुरावस्था झालेल्या शौचालयासंदर्भात महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे तक्रार केली होती. तातडीने कार्यवाही करून लोकांची सोय करावी, अशी मागणीही या संस्थेने केली होती. दरम्यान, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अतिरिक्त आयुक्त पवार यांची भेट घेऊन आपली समस्या मांडली. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना विनंती करून परिसरामध्ये येण्याची विनंती केली होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### नीलकंठ बँकेच्या वतीने आ.सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

अक्कलकोटचे आमदार मा सचिन कल्याणशेट्टी हे दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने निवडून आल्याबद्दल त्यांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. आपल्या सर्वांची साथ व वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद आहेत त्यामुळे मी दुसऱ्यांदा निवडून आलो अशीच साथ सर्वांची मिळावी असे ते म्हणाले. नीलकंठ बँकेच्या कामकाजबाबत त्यांनी समाधान व्यक्त करून सर्वांचे कौतुक केले. यावेळी बँकेचे माझी अध्यक्ष चंद्रकांत तापडिया, जमनादास भूतडा, बँकेचे व्हा. चेअरमन सी. ए धनराज नोगजा, मुख्य कार्यकारी अधिकारी महावीर जाधव, शाखाधिकारी आनंद बलदवा उपस्थित होते.



### तामलवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांग बांधवांचा सन्मान

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील दिव्यांग बांधवांचा दि. ०३ डिसेंबर रोजी तामलवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. जागतिक दिव्यांग दिन दि.०३ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो. दिव्यांगांना त्यांचे हक्क आणि अधिकाराविषयी माहिती सांगणे व त्याची जाणीव करून देणे हा त्याचा उद्देश आहे. समाजातील सर्व दिव्यांग व्यक्ती चे हक्क आणि कल्याण साधलं जावं या उद्देशाने जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो. त्याच उद्देशाने तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील दिव्यांग बांधवांचा तामलवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने दिव्यांगाना मानाचा फेटा, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सरपंच पती सिकंदर बेगडे, उपसरपंच सुधीर पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुधीर गायकवाड, पत्रकार सर्जेराव गायकवाड, लिपीक श्रीकांत गायकवाड, शिवाजी माळी, विनायक पवार यांच्या हस्ते दिव्यांग बांधवांचा सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. दिव्यांग बांधवांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्याबद्दल प्रहार दिव्यांग संघटनेचे तालुका संघटक सचिन शिंदे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.याप्रसंगी तामलवाडी येथील दिव्यांग बांधव उपस्थित होते.

### दिव्यांग दिनानिमित्त इको नेचर क्लबची दिव्यांगाला मदत

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

सहकाराची भावना ठेवून दिव्यांगास इको नेचर क्लबने मदत केली. वीर ब्रह्मा माशाळकर ही दिव्यांग व्यक्ती लहानपणीच पोलिओ होऊन दोन्ही पायाने अधू झाली. आर्थिक परिस्थितीने बिकट व पायाने अपंग असताना पायावर उभे राहण्याची जिद्द होती. दहावी शिक्षण पूर्ण करून पुण्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणार्थीमध्ये प्रवेश घेतला व शिलाई मशीन हस्तकला त्याच्यामध्ये आपले शिक्षण पारंगत केले गेल्या चार वर्षापासून तो अनेक लोकांचे कपडे अल्टरेशन करून देतो. मुलांच्या शाळेच्या बॅगा, चेन, फाटलेले कपडे शिवून देण्याचे कार्य चालू आहे. इको नेचर क्लबने एक सामाजिक उपक्रम म्हणून त्याला त्याचा




व्यवसाय उभा करण्यास सहकार्य केले. तो विजापूर रोडवरील सैफुल परिसरात परिसरातील अनेक लोकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. इको नेचर क्लबचे मुख्य प्रवर्तक डॉ मनोज देवकर यांनी अशा अनेक दिव्यांग व्यक्तींना सहकार्य केले आहे. त्यांच्या सहकार्यामुळे गेले तीन वर्ष त्यांचा व्यवसाय व्यवस्थितपणे चालू आहे. त्या दिव्यांग बंधूस दुकान चालू करण्यासाठी दुकान व साहित्य तयार करून दिले.

### सिंहगडमध्ये आजपासून विज्ञान प्रदर्शन व सायन्स मेळावा

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

क्रीडा व युवक सेवा, संचालनालय पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन अंतर्गत सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज केगांव, सोलापूर येथे विज्ञान प्रदर्शन व सायन्स मेळाव्याचे आयोजन सकाळी ९ वा. दिनांक ५ ते ६ डिसेंबर या कालावधीत सांयन्स हॉल येथे करण्यात आले आहे. संकल्पना आधारित बाबींमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान




यामधील नवसंकल्पना 'इनोव्हेशन इन सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी' सन २०२४-२५ या वर्षासाठी निश्चित केलेली असून, सोलापूर शहर व जिल्हयातील इंजिनिअरीग कॉलेज, वैदयकीय महाविदयालय, कृषी महाविदयालये, औद्योगिक प्रशिक्षक्षण संस्था, शाळा, महाविदयालये शैक्षणिक संस्था इत्यादी युवा महोत्सवामध्ये जास्तीत जास्त युवक व युवती यांनी सहभाग नोंदवावा तसेच ९९७००९५३१५ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

# दासरींनी डावलले; शिवसेनेचा त्याग करणार

## ठाकरे सेनेचे विष्णु कारमपुरी यांचा गंभीर आरोप, उबाठामधील वाद चव्हाट्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी यांनी वेळोवेळी डावलल्याचा आणि अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप करत शिवसेना उबाठा पक्षाचा आपण त्याग केला आहे. मनपा क्षेत्र प्रमुख पदाचा राजीनामा देऊन यापुढ माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीच्या माध्यमातून कार्यरत राहणार असल्याची घोषणा विष्णू कारमपुरी यांनी पत्रकार परिषदेत केली.

गेल्या अनेक वर्षापासून शिवसेनेचा शहर कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख, उपशहर प्रमुख, प्रसिद्ध प्रमुख यासह विविध पदावर कार्यरत राहिलो. दि. २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत मनपा क्षेत्र प्रमुख म्हणून शिवसेना उबाठा गटाचे काम करीत होतो. मनपा क्षेत्र प्रमुख म्हणून शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनातून निवड जाहीर करण्यात आली.

असे असतानाही जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी यांच्याकडून अधिकृत पद नाही असे म्हणून कोणत्याही बैठकीला कार्यक्रमला निरोप देण्यात आला नाही. दरम्यान, संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांनीही प्रा. दासरी यांना याबाबत सूचना दिली होती. तरीही त्यानी कार्यवाही केली नाही. वेळोवेळी पक्षातील कार्यक्रमांना डावलण्यात आले, असा आरोप यावेळी विष्णू कारमपुरी यांनी केला आहे. दरम्यानच्या काळात मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांची तब्येत ठीक नसल्याने भेट होऊ शकली नाही. प्रा अजय दासरी यांच्या वागण्यात फरक पडला नसल्याने माझ्या स्वाभिमानाला धक्का पोहोचला. त्यामुळे अखेर ३२ वर्षापासून कार्यरत असतानाही मनपा क्षेत्र प्रमुख पदाचा राजीनामा पाठविला आहे. यापुढे मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समिती या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून सेवा करण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही विष्णू कारमपुरी यांनी यावेळी सांगितले.

या पत्रकार परिषदेस विठ्ठल कुऱ्हाडकर, रेखा आडकी, राधिका मिट्टा, प्रसाद जगताप आदी उपस्थित होते.







# राष्ट्रीय आरोग्य अभियान; आज समुपदेशन

## जि.प.आरोग्य विभागात विविध संवर्गातील कंत्राटी २३० पदांची भरती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ४ डिसेंबर-**

शासन निर्णयानुसार आरोग्य विभाग सोलापूर जिल्हा परिषद यांच्या वतीने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध संवर्गातील कंत्राटी सुमारे २३० पदांची नवीन भरती करण्यात आली आहे.

या नवनिर्वाचित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे समुपदेशन प्रक्रिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५ डिसेंबरला सकाळी अकरा वाजता जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्र गुरवणूक चौक येथे संपन्न होणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले यांनी दिली.

दरम्यान, महाराष्ट्र शासनाच्या नव्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील विविध संवर्गातील एकूण रिक्तपदे दर महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी शासनाच्या नियमानुसार भरण्यात येतात. त्यानुसार जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी, विशेषतज्ञ, दंतचिकित्सक, वित्त अधिकारी, फिजिओथेरपीस्ट, कार्यक्रम समन्वयक, आरोग्य अधीक्षक, लेखापाल, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक पुरुष, डाटा एन्ट्री ऑपरेटर, इत्यादी संवर्गातील सुमारे २३० पदांची भरती करण्यात आली आहे. याच नवनिर्वाचित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे समुपदेशन संपन्न होणार आहे. सदरची पदे ही कंत्राटी तत्वावर भरलेली आहेत. यापूर्वी जिल्ह्यात तीन पदे रिक्त होती. सदरची पदे मंगळवारी भरण्यात आली आहेत.

### सर्व रिक्तपदे भरण्यात आली



सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामधील असणारे विविध संवर्गातील असणारी रिक्त पदे पूर्णपणे भरण्यात आली आहेत. शासनाच्या नव्या निर्णयानुसार तात्काळ ही पदे भरण्याचे आदेश आहेत. त्यानुसार दर मंगळवारी कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया राबवली जाते. त्यानुसार नव्या कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करण्यात येणार आहे.

**-डॉ.संतोष नवले, आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद**

# मोठी स्वप्ने पाहून विद्यार्थ्यांनी मोठं यश मिळवावं : सुहासिनी शहा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

विद्यार्थ्यांनी मनोरंजनातून आनंदी शिक्षण घेत आपल्या जवळील कलागुणांना वाव देण्यासाठी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. त्यांनी अभ्यासाबरोबर बालनाट्यमध्ये सहभागी व्हावे. जीवनात कष्ट, प्रामाणिक, उच्च ध्येय व चांगली स्वप्ने पाहून त्याप्रमाणे आपण प्रयत्न केल्यास नक्की यश मिळते असे, प्रतिपादन प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा सुहासिनी शहा यांनी केले.

के.एल.ई. सोसायटी संचलित अण्णप्पा काडादी हायस्कूलमध्ये प्रिसिजन फाउंडेशनच्या व गिल्लो ऑन द गो यांच्या संयुक्त विद्यमाने बालनाट्य कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. याप्रसंगी ''बदका बदका जा व अक्कड बक्कड'' हे बालनाट्य सादर करण्यात आले. या बालनाट्याला विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला. मुख्याध्यापक अनिल पाटील यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन नाट्य विभाग प्रमुख संतोष पाटील यांनी केले. दिग्दर्शक शैली सथ्यु, नियोजक वैशाली बनसोडे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,कलाकार रुपेश सांगवी, हॅरी मीना, वैशाली, प्रियांका, अक्षता यांची प्रमुख उपस्थिती होती.

### काडादी प्रशाला व प्रिसिजनची ''गिल्लो ऑन द गो'' बालनाट्य कार्यशाळा




### जीवनात प्रामाणिकपणे कष्ट करावे : काडादी

यावेळी शालेय नियामक मंडळाच्या अध्यक्षा सिंधुताई काडादी म्हणाले, अभ्यास नाटिकांमध्ये सहभागी व्हावे. ज्याप्रमाणे आज प्रिसिजन कंपनीचे नाव व सोलापूरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर सुहासिनी शहा यांनी कष्टाने पुढे नेले. तसाच त्यांचा आदर्श ठेवून आपणही जीवनात प्रामाणिकपणे कष्ट करून विविध क्षेत्रात यश मिळवावे.

# राज्यात शिवशाही बसची सुविधा सुरूच राहणार

## अफवांवर अखेर एसटी महामंडळाने टाकला पडदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ डिसेंबर**

प्रवाशांच्या सेवेसाठी कायम तत्पर असणाऱ्या एसटी बसेसचाच एक भाग असणाऱ्या शिवशाही बस बंद होणार असल्याची चर्चा सर्वत्र सुरू होती. गेल्या काही दिवसांपासून अपघातांच्या घटना घडत असताना राज्यभरात वेगाने धावणारी शिवशाही बस बंद होणार अशा चर्चा रंगल्या होत्या. दरम्यान, सदर बसेस या बंद करण्याचा एसटी महामंडळाचा कोणताही विचार नाही, असे स्पष्टीकरण एसटी महामंडळाकडून देण्यात आले आहे.

दरम्यान, सातत्याने पसरत असलेल्या अफवांवर अखेर एसटी महामंडळाने पडदा टाकला आहे. एसटी महामंडळाकडे सध्या ७९२ शिवशाही (वातानुकूलित) बसेस सुरू आहेत. त्यामध्ये कोणताही तांत्रिक दोष नाही. त्यापैकी ५०० बस धावत असून उर्वरित ३९२ बस कार्यशाळेत विविध तांत्रिक दुरुस्तीसाठी दाखल आहेत. शिवशाही बस या वातानुकूलित असतात. आता मात्र, त्याचे लालपरीत रुपांतर करण्यासाठी वातानुकूलित यंत्रणा काढण्यात येणार असल्याची चर्चा सुरू होती. शिवशाहीचे रूपांतर साध्या बसमध्ये केले जाणार असल्याचेही बोलले जात होते. मात्र, त्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नसल्याचे सांगण्यात आले.
















# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रिसिजन वाचन अभियानात 'तो कुणी माझ्यातला' पुस्तकाचे प्रकाशन

### अभिनेते डॉ.गिरीश ओक यांची शिरीष देखणे घेणार मुलाखत

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

प्रिसिजन वाचन अभियान कार्यक्रमात येत्या शनिवारी, ७ डिसेंबर रोजी डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात दि. ७ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वा. अभिनेते डॉ गिरीश ओक यांच्या तो कुणी माझ्यातला' या पुस्तकाचे डॉ सुहासिनी शहा यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे.

या प्रकाशन कार्यक्रमास जेष्ठ चित्रकार रविमुकुल, प्रकाशक अनिल कुलकर्णी व शिरीष देखणे उपस्थित राहणार आहेत. तो कुणी माझ्यातला डॉ. गिरीश ओक यांचे हे पुस्तक म्हणजे केवळ एका नटाचे स्म रणरंजन नाही, तर हा एक कॅलिडोस्कोप आहे. तो जसा फिरवला की तशी नक्षी बदलते त्याचप्रमाणे या पुस्तकात वाचकांना कधी नामवंत रंगकर्मींचा परिचय घडतो तर कधी व्यवसायिक नाटक प्रेक्षकांपर्यंत नेताना करावी लागणारी धडपड दिसते, तर कधी पडद्यामागे घडणाऱ्या गमतीजमतीचे दर्शन घडते. हा निव्वळ स्वकर्तृत्वाचा लेखाजोखा नसून मराठी रंगभूमीच्या इतिहासातील काळाच्या एका रसरशीत इंद्रधनुषी अंश आहे. हे पुस्तक म्हणजे एका रंगकर्मीने स्वतःचे तठस्थ दृष्टीने केलेले अवलोकन आहे.



प्रिसिजन वाचन अभियानमध्ये या पुस्तक प्रकाशन सोहळ्यानंतर अभिनेते डॉ गिरीश ओक यांची शिरीष देखणे घेणार प्रकट मुलाखत हे घेणार आहेत.



## ▶▶ क्राईम वृत्त...

### रिक्षाचालकास मारहाण करून स्वत:हातावर ब्लेड मारून घेतले

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

रिक्षाचालकावर मारहाण करून स्वतःच्या हातावर ब्लेड मारून घेणाऱ्या डी के विरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिद्राम फकिरप्पा करली (वय ३१, रा. भवानी पेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर) या रिक्षाचालकाच्या फिर्यादीवरुन डी के उर्फ बंडगर (रा. मड्डी वस्ती, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिद्राम करली हे रिक्षाचालक असून ते शंकर हुलगे यांची एमएच १३ बीव्ही ०३२३ क्रम ांकाची रिक्षा भाडे तत्वावर चालवितो. २ डिसेंबर रोजी सायंकाळी दत्त मंदीरजवळ सिद्राम करली हे रिक्षातून प्लायवूडचा माल उतरवत बसताना डी के हा दुचाकीवरून आला. करली यास तु रिक्षाचे भाडे का मागतो असे म्हणून करली यास दमदाटी करून दगडाने डोक्यात मारली. या मारहाणीत करली यांच्या मानेला व बरगडीला मार लागला असून रिक्षाच्या काचेवर डी के याने दगड मारून नुकसान केले. तसेच डी के ने ब्लेडने स्वतः च्या हातावर मारून घेऊन पळून गेला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाल करण्यात आला आहे. हवालदार दुधाळे पुढील तपास करीत आहेत.



### साठे-पाटील वस्तीत ३८ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

शहरातील साठे-पाटील वस्तीत बंद घर फोडून चोरट्याने ३८ हजारांचा साहित्य चोरून नेले. याबाबत सारिका आप्पासाहेब देवकते (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सारिका देवकते या कुटुंबासह आळेवाडी (ता. सांगोला) येथे ३ डिसेंबर रोजी पहाटे घराला कुलूप लावून गेल्या होत्या. त्या ४ डिसेंबर रोजी परत घरी आल्या. त्यावेळी त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने देवकते यांच्या घराचे कुलूप कशानेतरी तोडून घरात प्रवेश करून किचनमधील पितळी बादली, पितळी पातेले, तांब्याचा हंडा, वेल्डींगचे फॅब्रिकेशनची मशिन, सोन्याची नथ, सोन्याचे गंठण असा ३८ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.



### महामार्गावरील जाळीला धडकल्यानं दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

सोलापूरहून पाकणीकडे निघालेल्या दुचाकीस्वार महामार्गावरील बाजूच्या जाळीला धडकून जखमी झाला. हा प्रकार पाकणीजवळील वासुदेव हॉटेलसमोर बुधवारी सकाळी ८:३० च्या सुमारास घडला. अभिजित किशन कांबळे (वय २५, रा. बुधवार पेठ, सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. यातील तरुण दुचाकीवरुन पाकणीकडे जात होता. त्याचा दुचाकवरील तोल सुटल्याने वासुदेव हॉटेल समोरील रोडच्या बाजूला जाऊन धडकला. यात त्याच्या डाव्या पायास, हाताला जखम झाली. रुग्णवाहिकेद्वारे त्याला सकाळी ९:१५ च्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तो शुद्धीवर असल्याची सिव्हील पोलीस चौकीत नोंद झाली आहे.

### परप्रांतीय पादचारी वाहनाच्या धडकेत जखमी

**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

पायी चालत निघालेल्या १८ वर्षीय परप्रांतीय तरुणाला अज्ञात वाहनाने धडक दिली. यात रोडवर पडून तो जखमी झाला. हा प्रकार पंढरपुरात घडला. अंब्रिश कुमार रामसेवक (वय १८, रा. राजेश्वरी, उत्तर प्रदेश सध्या स्टेशन रोड, पंढरपूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री १० च्या सुमारास पंढरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ ही घटना घडली. पंढरपूर येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन येथील शासकीय रुग्णालयात त्याच्यावर उपचार करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड; सोलापूर भाजपाकडून फटाके फोडून आनंदोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र विधीमंडळ गटनेतेपदी फडणवीस यांच्या निवडीनंतर सोलापूर शहर-जिल्हा भाजप कार्यालयासमोर लाडू वाटून व फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपाचे जेष्ठ नेते तथा सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, रोहिणी तडवळकर, रामचंद्र जन्नू, चंद्रकांत तापडिया, श्रीनिवास दायमा, जय साळुंके, नागेज गंजी, इंदिरा कुडक्याल, मेनका राठोड, बजरंग कुलकर्णी, नागेश सरगम, सुनील टोणपे, सुधाकर नराळ यांच्यासह इतर भाजपा शहर-जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भाजपा पदाधिकाऱ्यांनी लाडू वाटप केले तर महिलावर्गाने फुगड्या खेळत आपला आनंद द्विगुणीत केला.

भाजप विधीमंडळ गटनेता म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली आहे. सर्व आमदारांनी त्यांची निवड केल्याने आता महायुतीमध्ये देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री असणार आहेत. फडणवीसांची गटनेता म्हणून निवड झाल्यावर आपल्या पहिल्या भाषणाम ध्ये त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले. यावेळची विधानसभा निवडणणूक भाजपासाठी अतिशय ऐतिहासिक होती. या निवडणुकीने एक गोष्ट आपल्यासमोर ठेवली आहे ती म्हणजे 'एक है तो सेफ है' आणि 'मोदी है ते मुनकीन है'. जनतेने मोठा जनादेश दिला आहे. आता जबाबदारी वाढली आहे. सगळ्यांनी दिलेल्या जनादेशाचं सन्मान राखण्याचं काम आपल्याला करावं लागणार असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. दरम्यान, सोलापुरातून भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, अनेक कार्यकर्ते-पदाधिकारी मुंबईत गेले असून, उद्या शपथविधीसाठीही ते उपस्थित राहणार असल्याचे समजते.



### महायुतीला मिळालेल्या जनादेशामुळेच जल्लोष

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) यांच्या उमेदवारांना जनतेचा मोठा जनादेश मिळाला आणि आज देवेंद्र फडणवीस यांची एकमताने भाजप विधीमंडळ गटनेता म्हणून निवड झाल्याने आम्ही जल्लोष करीत आहोत. उद्या मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार हे शपथ घेतील आणि भाजपाचे सरकार सोलापूर जिल्ह्यातील भविष्यात सर्व विकासकामे करतील. इतकेच नाहीतर आयटी पार्कचाही आमच्या आमदारांनी जनतेला शब्द दिला आहे...तोही ते पूर्ण करतील.

**- पांडुरंग दिड्डी, सरचिटणीस सोलापूर भाजपा**

### शहरातील विकासकामांना गती येणार

भाजप विधीमंडळ गटनेता म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्यानंतर भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी आपली प्रतिक्रिया नोंदविताना सांगितले की, आजतागायत केंद्र अन् राज्य सरकारद्वारे सोलापूर शहर आणि जिल्ह्यात अनेक विकासकामे झाली आहेत. जी कामे प्रलंबित आहेत; त्याही विकासकामांना आता गती येणार आहे. कारण केंद्राप्रमाणेच राज्याचेही सरकार आता गतीमान होणार आहे.

**- नरेंद्र काळे, भाजपा शहराध्यक्ष**

## प्लॉट विक्रीच्या बहाण्याने ५ लाख रुपयांची फसवणूक

### करणकोट असोसिएटस् डेव्हलपर्स ॲन्ड कंस्ट्रक्शनच्या दोघांविरुध्द दोन वर्षानंतर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

प्लॉट विक्रिच्या बहाण्याने तरूणाची ५ लाख रुपयांची फसवणुक करणाऱ्या करणकोट असोसिएटस् डेव्हलपर्स ॲन्ड कंस्ट्रक्शनच्या दोघांविरुध्द दोन वर्षानंतर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विनोद हेरू राठोड (वय ३५, रा. नितिन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सविता करणकोट व संकेत करणकोट यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनोद राठोड यांना अक्कलकोट रोडवर प्लॉट घ्यायचा होता. त्यामुळे राठोड यांनी जुना विडी घरकुल परिसरातील करणकोट असोसिएटस् डेव्हलपर्स ॲन्ड कंस्ट्रक्शनच्या कार्यालयात जाऊन प्लॉट नं. १७४ च्या खरेदीकरीता ११ ऑक्टोबर २०२२ रोजी सविका करणकोट व संकेत करणकोट यांच्याकडे ५ लाख रुपये जमा केले. त्यावेळी करणकोट यांनी पैसे मि ळाल्यानंतर त्याबाबतची पावती क्र. ३२४ ही राठोड यांना दिली. राठोड यांनी ही रक्कम मित्र, नातेवाईक यांच्याकडून हात उसने घेऊन पैशाची जुळवा जुळव करून करणकोट यांना दिली. राठोड यांनी करणकोट यांच्याकडे रकमेची पावती मागितली असता त्यांनी सदर जागेचा दर कामी असल्याने रक्कम ब्लॅकम ध्ये दाखवावी लागते. त्याची पावती देता येत नाही, परंतु उर्वरीत ८० हजार रुपयांची रक्कम दिल्यानंतर खरेदी करून देतो असे करणकोट यांनी सांगितले. त्यानंतर काही वेळाने राठोड यांनी कंस्ट्रक्न्शन कंपनीच्या कार्यालयात जाऊन पाहिले असता ते कार्यालय बंद होते. त्यानंतर राठोड यांनी करणकोट यांच्याशी वारंवार फोनद्वारे संपर्क साधून पैसे परत देण्याची मागणी केली असता करणकोट यांनी ते देंण्यास टाळाटाळ केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक इंगळे पुढील तपास करीत आहेत.

## श्री सिद्धेश्वर यात्रेची लगबग; नंदीध्वजधारकांकडून कसून सराव

### ● शहरात सर्वत्र घुमतोय एकदा... भक्त लिंग... हर्र बोला हर्र...चा निनाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ डिसेंबर-**


'' बोला... बोला एकदा... भक्त रिंग हर्र बोला हर्र... '' या निनादात ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेची तयारी सुरू झालेली आहे. श्री सिध्दरामेश्वर महाराज यांची यात्रा अवघ्य एका महिन्यावर येऊन ठेपली असल्याने नंदीध्वजधारकांच्या उत्साहाला उधाण आलेले दिसत आहे.

दरम्यान, यात्रेमध्ये असणाऱ्या मानाच्या सातही नंदीध्वजधारकांकडून नंदीध्वज पेलण्याचा कसून सराव करून घेण्यास मास्तर मंडळी व्यस्त झालेली आहेत. गेल्या आठवड्याभरापासून मानाचे नंदी ध्वजपेलण्याचा सराव केला जात आहे. दिवाळी संपल्यानंतर नंदीध्वज पेलण्याचा सराव सुरू केला जातो. त्यासाठी यात्राप्रमुख हिरेहब्बू परिवाराकडून मानाचे नंदीध्वजांचे पूजन मल्लिकार्जुन मंदिरात केले जाते. यापूजेनंतर नंदीध्वज पेलण्याचा सराव सुरू केला जातो.

सोलापूरकरांच्या मनात ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वरांच्या यात्रेबद्दल ओढ लागलेली असते. या यात्रेचे प्रमुख वैशिष्ट्य असलेल्या नंदीध्वज आणि नंदीध्वज धारकांबद्दल विलक्षण आकर्षण असल्याने भक्तांमध्ये सराव नंदीध्वजांची पूजा करण्याची प्रथा आहे. नंदीध्वज पूजा केल्यानंतर नंदीध्वजधारकांना अधिक ऊर्जा मिळावी म्हणून सेवेकऱ्यांना सुकामेवा खिरीचे जेवण देण्याची परंपरा आहे. खिरीसोबत तूप, केळी आणि दुधाला प्राधान्य दिले जाते. यात्रेत सर्व समाजाचे मिळून मानाचे सात नंदीध्वज असून नंदीध्वज पेलण्याचा कसून सराव मास्तरांकडून करुन घेतला जात आहे.होम मैदान, सम्मती कट्टा, बाळीवेस, मल्लिकार्जुन मंदिर, गांधी नाथा मैदान, सम्राट चौक, चाटी गल्ली, विजापूरवेस ते मधला मारुती, तुळजापूर वेस, रुपाभवानी रोड परिसरात नंदीध्वज सराव सुरु आहे. सकाळी, दुपारी आणि रात्री असे तीन वेळा नंदीध्वजधारकांना नंदीध्वज पेलण्याचे कौशल्य शिकविले जात आहे. तेल लावलेले नंदीध्वजाचे वजन पेलण्याचा सराव व्हावा, यासाठी सरावा दरम्यान सराव नंदीध्वजांना लोखंडी साखळी बांधून तयारी करून घेतली जात आहे. भक्ती आणि शक्तीच्या संगमातूनच पात्रेत काठी पेलणे शक्य होते. नंदीध्वज पेलण्यासाठी कौशल्य लागते, कसून सराव करावा लागतो. यात्रेच्या एक महिना आधी आम्ही सरावाला सुरुवात करत असल्याची माहिती तिसऱ्या नदीध्वजाचे मास्तर रेवणसिध्द माळी यांनी दिली.



**सोलापूर : ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त मानाचे नंदीध्वज पेलण्याचा सराव करताना तिसऱ्या नंदीध्वजाचे नंदीध्वजधारक.**





## क्रीडा संकुलातील स्मार्ट रस्ता दुर्लक्षीत

- आंतरराष्ट्रीय खेळाडूंना खड्ड्यांचा त्रास होणार
- चार दिवसावर जागितक लॉन टेनिस स्पर्धा
- तरीही जिल्हा क्रीडा कार्यालयाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर दि. ४ डिसेंबर-**

स्मार्ट सिटीच्या सोलापुरात महिलांची जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलातील आंतरराष्ट्रीय टेनिस कोर्टवर येत्या ८ डिसेंबरपासून सुरु होत आहे. परंतु जिथे स्पर्धा होत आहे, त्या आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस कोर्टपर्यंत जाण्या येण्याचा रस्ता आठ वर्षापासून दुर्लक्षितच आहे.

प्रत्येक वर्षी या स्पर्धा सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना आयोजित करते. जागतिक महिला लॉन टेनिस स्पर्धा भरवण्याचे हे यंदाचे नववे वर्ष आहे. पंचवीस हजार डॉलरच्या या स्पर्धेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे ५६ महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्येक वर्षी रस्ता दुरुस्त करणे संदर्भात जिल्हा लॉन टेनिस संघटना जिल्हा क्रीडा कार्यालयास पत्र देते. परंतु रस्ता मात्र, दुरुस्त केला जात नाही. प्रत्येक वर्षी जिल्हा लॉन टेनिस संघटनेने फॉलोअप घेतल्यानंतर रस्त्याची डागडुजी केली जाते. यंदाही त्यांनी असे पत्र जिल्हा क्रीडा अधिकारी यांना दिले आहे. परंतु चार दिवसावर स्पर्धा आली तरी याची कार्यवाही झाली नाही. जिल्हा क्रीडा संकुलाच्या प्रवेशद्वारापासून ते लॉन टेनिस कोर्टपर्यंत या रस्त्यावर एवढे खड्डे झाले आहेत की पावला पावलावर या स्पर्धेत भाग घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंना जाताना व येताना या खड्ड्यांचा त्रास होणार आहे. जिल्हाधिकारी या संकुल समितीचे अध्यक्ष असतात. त्यांनाही असे पत्र सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने दिले आहे. परंतु अद्याप पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय अथवा जिल्हा क्रीडा कार्यालयाने याची दखल घेतलेली नाही.

### तोपर्यंत खड्ड्याची डागडुजी केली जाईल

जिल्हा क्रीडा कार्यालयात ४०० मीटरचा सिंथेटिकचा धावणमार्ग बरोबरच क्रीडा संकुलातील अंतर्गत पक्का रस्ता करण्यात येणार आहे. याची प्रक्रियाही सुरू आहे. परंतु स्पर्धा जवळ आल्या असल्याने तोपर्यंत खड्ड्याची डागडुजी केली जाईल.

**- नरेंद्र पवार, जिल्हा क्रीडा अधिकारी**

### सोलापूरच्या प्रतिष्ठेची व अभिमानाची बाब

सोलापुरात आंतरराष्ट्रीय खेळाडू येत असल्याने ही सोलापूरच्या दृष्टीने प्रतिष्ठेची व अभिमानाची बाब आहे. सोलापूरचे नाव जगात चांगले जावे या हेतूने आम्ही रस्ता दुरुस्त करणेबाबत, तसेच खांबावर लाईटची व्यवस्था करणेबाबत जिल्हाधिकारी व जिल्हा क्रीडा कार्यालयास पत्र दिले आहे. तसेच स्वच्छतेबाबतही सोलापूर महानगरपालिका विभागीय कार्यालयास पत्र दिले आहे. याची कार्यवाही व्हावी हीच अपेक्षा.

**- राजीव देसाई, सचिव जिल्हा लॉन टेनिस संघटना**

## सिद्धेश्वर यात्रेसाठी प्रथमच होम मैदानाची काढली निविदा

- व्यापाऱ्यांच्या वाढत्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर मंदिर समितीचा निर्णय
- महापालिकेकडून होम मैदान घेतले ताब्यात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ डिसेंबर-**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी जानेवारीमहिन्यातमकरसंक्रातलीला ग्रामदैवत श्री सिद्धश्वरामेश्वरांची गड्डा यात्रा भरविण्यात येते. सदरची यात्रा भरविण्यासाठी यंदा प्रथमच होम मैदानाची निविदा काढली आहे. व्यापाऱ्यांच्या वाढत्या तक्रारी पाहता तक्रारी नकोत, म्हणून प्रथमच निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याची माहिती मंदिर समितीच्यावतीने देण्यात आली आहे.

दरम्यान, जानेवारी महिन्यात होणाऱ्या ग्रामदैवत श्रीशिवयोगी सिद्धरामेश्वरांच्या यात्रेसाठी महापालिका १५ डिसेंबर ते ३१ जानेवारी या दीड महिन्याच्या कालावधीत होम मैदान मंदिर समितीच्या ताब्यात देते. यंदाही हे मैदान ताब्यात देण्यासाठी मंदिर समितीने महापालिकेला पत्र दिले आहे. डिसेंबर महिन्या अखेरपासूनच होम मैदानावर गड्डा यात्रा भरण्यास सुरवात होते. सदरची यात्रा २६ जानेवारीपर्यंत सुरू असते.

होम मैदान देण्यासाठी सिद्धेश्वर देवस्थान समितीने यंदा पहिल्यांदाच निविदा पद्धत अवलंबली आहे. गतवर्षी एका स्थानिक मक्तेदाराने लिलाव अथवा निविदा पद्धतीने मैदान देण्याची मागणी केली होती. ज्या म क्तेदाराला मंदिर समितीने मैदान दिले होते, त्याच्यापेक्षा अधिक रक्कम देण्यास तयार असूनही मैदान मिळत नसल्याचा दावा त्यांनी केला होता. ही तक्रार धर्मादाय उपायुक्तांपर्यंत गेले होते. या तक्रारीनंतर पुण्याच्या सहआयुक्तांनी निविदा पद्धत अवलंबण्याचा आदेश काढला होता. त्या आदेशाची अंमलबजावणी करत मंदिर समितीने यंदा मैदान देण्यासाठी निविदा जाहीर केली असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे.


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९६४

**तुका म्हणे आतां करीं माझे हित ।**
**काढावें जळत आगींतूनि ।।**

प्रत्येक जीवाला आपले हित व्हावे असे वाटत असते. हितासाठीच माणसाची रात्रंदिन धडपड चालू असते. प्रत्येक माणसाची हिताची परीभाषा ही ज्याच्या त्याच्या मानसिकतेवर व विचारावर अवलंबून असते. एखाद्याच्या दृष्टीकोनातून एखादी गोष्ट होणे त्याच्या हितावह नसू शकते. पण असे कांही लोक असतात की जे त्या घटनेला, गोष्टीला त्यांचे हित मानतात किंवा ते इतर सर्वांच्या दृष्टीकोनातूनही हितावह असते. अशा हितांचा विचार करणाऱ्यांची संख्या नगण्य आहे. असे हित समजण्यासाठी माणसाला संसारात राहून संसारापेक्षा वेगळे व्हावे लागते. संसारात राहून संसारापेक्षा वेगळे होण्यासाठी त्याला मी माया, मोह, अहंकार, द्वेष, मत्सर, ईर्षा, काम, क्रोध आदिपासून बाहेर पडावे लागते. या सर्वात अडकून राहणे म्हणजे धगधगत्या आगीत जळत राहणे होय. ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकाराच्या अग्नीकुंडाला मी संसारात अडकल्यामुळे शितलकुंड समजून बसलो होतो. पण आता मला याच्या खऱ्या स्वरुपाची प्रचिती आल्याने मी यातून



बाहेर पडून समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्य आदिपासून खरे हित साधू इच्छित आहे. त्यामुळे मला या अग्निकुंडातून बाहेर निघण्याची ताकद दे, अशी आळवणी करतांना जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज म्हणतात,

**तुका म्हणे आतां करीं माझे हित ।**
**काढावे जळत आगींतूनि।।**

संसारात अडकलेल्या जीवाला मूळात ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, दंभ आदि अग्नीकुंड वाटतच नाहीत. त्यामुळे या जीवाला या अग्नीकुंडातून बाहेर पडावे असे वाटण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सुदैवाने सत्संगामुळे किंवा प्रसंगानुरूप या अग्नीकुंडाची जाणीव झाली तरीही या अग्नीकुंडातून तात्काळ बाहेर पडावे वाटत नाही. म्हणूनच की काय, माणूस म्हणतो, बस्स झाले, याच्यानंतर असे वागायचे नाही. उद्यापासून, सोमवारपासून किंवा एक तारखेपासून किंवा नवीन वर्षापासून एकदम चांगले वागायचे आहे. अर्थात, आतापासून चांगले वागायचे असे माणूस म्हणत नाही. पण संत, महात्म्यांच्या वचनात उद्या किंवा आणखी केव्हातरी असे शब्द नाहीत. त्यांच्या वचनात आता हा शब्द असतो. चांगली गोष्ट ही मुळातच चांगली असल्याने ती कृतीत उतरविण्यासाठी वेगळा चांगला वेळ-काळ शोधण्याची गरज नसते. थोडक्यात, चांगले कृत्य हेच शुभ असल्याने त्याच्या प्रत्यक्ष कृतीसाठी शुभ मुहूर्ताची वाट पाहण्याची गरज नाही, असे आम्हास वाटते. संसारात राहूनही आपण ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, अहंकार आदिपासून वेगळे राहू शकतो. असे वेगळे राहणेच आपल्यासाठी व इतरांसाठी हितावह असणार आहे, यातूनच आनंद मिळणार आहे. ज्ञानोबा-तुकोबाच्या कृपेत राहणाऱ्यांना वेगळे सांगण्याची गरज नसावी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# युवा महोत्सवातून तरुण कलाकारांनी करिअर करावे

### निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांचे आवाहन

### दयानंद महाविद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ४ डिसेंबर-**

शासन स्तरावरून युवकांसाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. करिअरच्या कक्षा दिवसेंदिवस रुंदावत आहेत. करिअरची क्षेत्रे वाढताहेत, तसे मार्ग उपलब्ध होत आहेत. मात्र त्याची निवड करताना आपल्यातील क्षमता ओळखल्या पाहिजेत. विविध सुप्तगुणांनी व्यासपीठ देण्याच्या संधी शासनाच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत. अशा कलाकारांनी युवा महोत्सवातून करिअर करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा, संचालनालय पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन दि. ०१ ते ०२ डिसेंबर २०२४ या कालावधीत निर्मलकुमार फडकुले सभागृह व दयानंद शिक्षण शास्त्र सोलापूर येथे आयोजन करण्यात आले होते. या जिल्हास्तर



युवा महोत्सवाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार, दयानंद शिक्षण शास्त्र महाविदयालय प्राचार्य एस.बी.क्षीरसागर, राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार, क्रीडा अधिकारी नदिम शेख, सुनिल धारुरकर, दशरथ गुरव, प्रमोद चुंगे, खंडू शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विविध स्पर्धा पार पडल्या. यामध्ये महाराष्ट्राच्या विविध भागात उदयास आलेली लोकनृत्य, व लोकगीते, काही तरुणांनी सादर केली. तसेच वकृत्व स्पर्धा, कथा लेखन, कविता लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकला स्पर्धेतील चित्राचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. जिल्हास्तर युवा महोत्सवातील स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तज्ञ प्रशिक्षक पंचाची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये डॉ. पंकज पवार, डॉ. सिध्दार्थ सोरटे, डॉ. मैत्रय केसकर, डॉ. केतकी रानडे, मनोज अंकुश, राजेश पवार, किरण लोंढे, संगमेश्वर बिराजदार, विशाल चव्हाण, रंजन पचवाडकर, सुमित भोसले, यांनी काम पाहिले. विजेत्या स्पर्धक कलाकारांना पारितोषिक, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### गोल्डन बॉय सौरभ वाघमारे, गर्ल श्रेया माशाळ

दयानंद शिक्षण शास्त्र महाविदयालयास सर्वसाधारण विजेतेपद पटकवण्याची कामगिरी केली. सौरभ वाघमारे -गोल्डनबॉय व श्रेया माशाळ-गोल्डन गर्ल मानकरी ठरले तर उत्कृष्ठ संघ व्यवस्थापक श्रीमती. बी. एस. राठोड यांचा सन्मान करण्यात आला. स्पर्धेचा अंतिम निकाल (प्रथम तीन) - चित्रकला : प्रतिक हणमंत तांदळे, सचिन राम घंटे, शुभम अशोक गुळसकर. काव्यलेखन : साक्षी जितेंद्र सुराणा, श्रेया प्रभाकर माशाळ- काव्यलेखन, सौरथ तुळशीराम वाघमारे. कथालेखन : ॲलीस वेणुगोपाल मंदापुरे, सेजल संतोष कवठेकर, आरती गुंडेराव मोहिते. वक्तृत्व : पर्जन्या निल अंजुटगी, सौरभ तुळशीराम वाघमारे, श्रेया प्रभाकर माशाळ. लोकगीत : स्वरा संगीत विद्यालय दमाणी नगर सोलापूर, संगमेश्वर कॉलेज सोलापूर, दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूर. लोकनृत्य : दयानंद मुलींचे वसतीगृह सोलापूर, शिवांश कला अकादमी सांगोला, दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूर. छायाचित्रण : विशाल घंटे, शुभम गुळसकर, अजय इंगळे.



# लोकमंगल महाविद्यालयात कृषी शिक्षण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ डिसेंबर-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात कृषी शिक्षण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. सागर महाजन हे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे विद्यार्थी दर्शना शिंदे, प्रतिक्षा गुंड, प्रतिक्षा कोळी, सोहम बोधले, सायली सोनवणे, आरती खूने, मुजामिल शेख, प्रतिक्षा शिंदे आदींनी आपल्या मनोगतातून डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे कार्य व योगदान याविषयी माहिती सांगितली. महाविद्यालयात कृषी शिक्षण आधुनिक काळाची गरज या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या कार्यक्रमास प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा माने-देशमुख उपस्थित होते.

# आरोग्य तपासणी शिबीरात १०३ कामगारांची तपासणी

### रेल्वे विभाग, महापालिका, ट्रान्सपोर्ट असोसिएशनतर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर -**

माथाडी कामगारांच्या आरोग्यासाठी सोलापूर रेल्वे विभाग, सोलापूर महानगरपालिका व ट्रान्सपोर्ट असोसिएशन याच्या संयुक्त विद्यमानाने मोफत क्षयरोग शिबीर घेण्यात आले. या शिबीरात १०३ माथाडी कामगारांची तपासणी करण्यात आली.

सोलापूर रेल्वे मालधक्का इथे सोलापूर महानगरपालिका आरोग्य विभागच्या व सोलापूर रेल्वे विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्षय रोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत माथाडी कामगारांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शहर क्षय रोग



अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांच्या देखरेखीखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता. रामवाडी मालधक्का येथे या शिबिराचे उद्घाटन सोलापूर रेल्वे विभागचे सिनिअर डि. सि. एम योगेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याच बरोबर या शिबिरास जिल्हा ट्रान्सपोर्ट संघटनेचे अध्यक्ष उदयशंकर चाकोते, सोलापूर जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे सचिव प्रकाश आवळेकर उपस्थित होते. या शिबीरात प्रामुख्याने ड्रायव्हर्स, कॅरियर्स, हेल्पर्स आणि माथाडी कामगार यांचा समावेश होता. या शिबिरात सर्वांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी, निदान आणि औषधांचा वितरण करण्यात आले. शिवाय उपस्थित डॉक्टरांनी माथाडी कामगारांना श्वासोच्छ्वास व्यायामाचे महत्त्व समजावून सांगितले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिप्रा पिंजरकर, डॉ. सागर चुंगी, डॉ. पुत्रा शेळगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनाली बेंद्रे यांनी उपस्थित माथाडी कामगारांना मार्गदर्शन केले. त्याच बरोबर रेल्वे मुख्य माल परिवेक्षक सलीम काझी, दीपक मिश्रा व इतर कर्मचारीगन निखिल टिकोळे, संचित साबळे, योगेश कोनापुरे, शैलेश पुनाळे यांच्या मदतीने हे अरोग्य शिबीर यशस्वी झाले. जवळपास १०३ माथाडी कामगारांनी या शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषधनिर्माता, नर्सिंग स्टाफ, आशा वर्कर्स यांनी परिश्रम घेतले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - |
| दि. ५ डिसेंबर २०२४ | विनायक चतुर्थी |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्थी (१२.४९) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उत्तराषाढा (१७.२६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वृध्दि (१२.२७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (२४.३०) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ :** सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नोकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन:** अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क :** विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल.

**सिंह :** प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या :** व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ :** नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे. आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु :** आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**मकर :** नातेवाईंकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विराधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ :** लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन :** रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे रविवारी वार्षिक अधिवेशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे ४४ वे वार्षिक अधिवेशन रविवार दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता राजश्री शाहू सभागृह, छत्रपती शिवाजी प्रशाला, सरस्वती चौक सोलापूर येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार हे या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. या अधिवेशनाचे उद्घाटन आ. सुभाष देशमुख , आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी महापौर मनोहर सपाटे, अमरावती विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक शालिनी इंगोले, माजी कार्याध्यक्ष मनोज गोगटे , जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाची सद्यस्थिती व त्यावरील उपाय या विषयावर परिसंवाद होईल. यावेळी प्रभाकर घुगे, मनोज गोगटे हे मार्गदर्शन करणार आहेत.

दुपारी दोन वाजता खुले अधिवेशन होणार आहे. यामध्ये अनुदान तिप्पट करावे, दर्जाबदल, अभ्यासिका यासह विविध ठराव मंजूर करण्यात येणार आहेत. या अधिवेशनात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यावेळी उपाध्यक्ष पांडुरंग सुरवसे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत सारिका मोरे, धोंडीबा बंडगर, कुंडलिक मोरे, जयंत आराध्ये आदी उपस्थित होते.

# अभिनेता स्वप्नील जोशीचा यांचा बेधडक डॅशिंग अंदाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ डिसेंबर**

मराठी सिनेसृष्टीतील ग्लॅमरस आणि चॉकलेट हिरो अशी ओळख असणारा अभिनेता स्वप्नील जोशी ह्याचा बेधडक डॅशिंग अंदाज लवकरच पहायला मिळणार आहे. वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन केल्यानंतर स्वप्नील आता आगामी 'जिलबी' या मराठी चित्रपटात विजय करमरकर या डॅशिंग पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे.या चित्रपटाचे दमदार मोशन पोस्टर नुकतेच प्रदर्शित



झाले आहे.आनंद पंडित मोशन पिक्चर्स निर्मित ही खुमासदार 'जिलबी' १७ जानेवारीला आपल्या मनोरंजनासाठी सज्ज झाली आहे.चित्रपटाचे दिग्दर्शन नितीन कांबळे यांनी केले आहे. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना स्वप्नील सांगते की, 'आपला पोलिसी खाक्या दाखवत चोख कामगिरी बजावणारा हा पोलीस अधिकारी आहे.

# आयुष्य कोठडीत काढणे व्यर्थ

**बनशंकरी बहुउद्देशीय संस्थेतर्फे दुभंगून जाता जाता हे नाटक सादर केले गेले. या नाटकाचे लेखक विजय कटके आहे तर दिग्दर्शक रत्नाकर जाधव यांनी केले.**

- **आजचे नाटक : ती रात्र**
- **वेळ व ठिकाण :** सायं.७ वा. हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
- **लेखक : हेमंत एदलाबादकर**
- **दिग्दर्शक : अश्विनी तडवळकर**

### नाट्य समीक्षण
### विद्या काळे

एका अनाथाश्रमातल्या तीन मुलांनी मोठे झाल्यावर काय कमावलं आणि काय गमावलं याची कथा म्हणजे हे नाटक. राजा (रत्नाकर जाधव) प्रचंड मोठा यशस्वी उद्योजक. समीर (राजू गायकवाड)एका कंपनीत काम करणारा. शेखर (ऋतुराज आरसीद) बॅरिस्टर या तिघांची घट्ट मैत्री. ये दोस्ती हम नहीं तोडेंगे वाली. रोज जमणारे हे मित्र. वेगवेगळ्या विषयावर चर्चा रंगतात. शेखरची कित्येक मतं राजाला न पटणारी कारण राजा आणि शेखरच्या जगण्याचे उद्देश वेगळे, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा. चर्चेत विषय सुरू होतो माणुसकी विरुद्ध मैत्री. त्यात बॅरिस्टर माणुसकीला महत्व देतो. समीर आणि शेखर जातात. दारूच्या नशेत तर्र राजा घरात काम करणाऱ्या ललितेच्या अंगाला वासनेने बरबटलेला

स्पर्श करतो, पैशाचे आमिष दाखवतो. पण ती बघत नाही. राजाची लगट बघून ललिताचा नवरा शामराव ललिताला सोडविण्यासाठी मधे पडतो. झटापटीत राजाला मारण्यासाठी घेतलेला चाकू ललिताला लागून तिचा मृत्यू होतो. बातमी कळल्यावर समीर, शेखर दोघे येतात. शेखरच्या मताप्रमाणे राजाने गुन्हा कबूल करावा. पण पैशाच्या आंधळ्या मस्तीत राजाला ते पटत नाही. शेखर आणि समीर शामरावला अनेक गोष्टीं पटवून सांगण्याचा प्रयत्न करतात. पण शामरावला फाशी न होता जन्मठेप झाली तर सुटल्यावर राजाचा खून करून बदला घेणार आहे. पण परत एक खून आणि फाशी हेच होईल हे सांगून त्याचं मन वळवण्याचा प्रयत्न करतात आयुष्य कोठडीत काढणे ठीक पण व्यर्थ. शेवटी शामरावच्या अनाथ मुलांची



शिक्षणाची जबाबदारी घेतात. राजाला भेटतात. सगळी हकीकत कळल्यावर राजाच्या मताप्रमाणे जन्मठेपेच्या नरक यातना भोगण्यापेक्षा फाशी बरी. पण शेखरच्या मतानुसार जन्मठेप योग्य. राजा व शेखरमधे पैज लागते. करारपत्र तयार होते. त्यानुसार १४ वर्ष राजाच्या घरातील एका कोठडी सारख्या खोलीत शेखर राहील सोबत ट्रान्जिस्टर, रोजचे वर्तमानपत्र, पुस्तकं असतील. पैज जिंकली तर राजा शेखरला ७ करोड रुपये देईल. समीर आणि राजा त्याला भेटायला येतील. २ वर्षात मोठ्याने ओरडणे, स्वत्व:चे केस ओढणे पुस्तके पाडणे अशी शेखरची अवस्था पाहून आपण पैज जिंकणार ही राजाला खात्री वाटते. इकडे व्यवसायातील अनेक गैर गोष्टीमुळे राजा गोत्यात येतो दिवाळखोरीत निघतो.१४ वर्ष उद्या संपणार, शेखर सुटणार यांची समीर राजाला जाणीव करून देतो. राजा शेखरला भेटायला खोलीत येतो. शेखर तिथे नाही हे बघून राजाला पैज जिंकल्याचा आनंद होतो. पण शेखरचे पत्र वाचून राजाला कळतं आपण पैज जिंकूनही हरलो आहोत. जीवनाचं जे ज्ञान भणंग होऊन शेखरला मिळालं तिथे आपण सर्वार्थानं हरलो. राजाचं काम करणाऱ्या रत्नाकर जाधव यांनी पैशाची गुर्मी, मस्ती जीवनातील सगळी सुखं पैशाच्या जोरावर मिळवता येतात हे त्यांच्या वागण्यातून हालचालीतून सुरेख दाखवलं.व्यवसायातील हार किंचित पोष्चर बदलून स्पष्ट केली. पण ललिता बरोबर अतिप्रसंग आणखी स्पष्ट होणे आवश्यक होते तिथे जाधव अभिनयात कमी पडले. शेखरची भूमिका करणारे आरसीदची समज छान होती. शामराव फाशी नको जन्मठेप द्या म्हणतो तेव्हाची हतबलता, चलबिचल छान स्पष्ट केली. दुसऱ्या अंकाच्या शेवटी १४ वर्षाच्या कोठडीत आपण काय कमावलं, जीवनाचं तत्त्वज्ञान, खंबीर पणे आयुष्यातील अडचणी, संकटांना सामोरे जाणे स्वार्थी जग आणि निस्वार्थ पणे विचार करणारा बॅरिस्टर व शेवटी निघून जातानाचा आत्मविश्वास शेवटपर्यंत तसेच ठाम राहणे या सर्वांचा तोल साधून भूमिका एका उंचीवर नेली. समीरच्या भूमिकेला फार वाव नव्हता पण समतोल राखण्यासाठी धडपडणारा समीर गायकवाडांनी छान उभा केला. मालकाप्रती लीन भाव पण पत्नीच्या चारित्र्यावर घाला येतो म्हटल्यावर पेटून उठणारा, शेखर समोर फाशी नको, जन्मठेपेची याचना करणारा शामराव यश गजधने यांनी छान उभा केला. प्राजक्ता सुरवसे ललिताची भूमिका समजून केली.

नेपथ्यात - गुरुनाथ ताटे आणि शंतनू देडे यांनी राजाच्या घराचा दिवाणखाना त्यात ऐश्वर्याचं प्रतीक असणारे चौखूर उधळणारे घोडे. दुसऱ्या बाजूला स्वतः कुठून आलो यांची कायम आठवण रहावी म्हणून पायऱ्यांवर असणारा पाळणा त्यातील बाळ, मागची बाल्कनी. तर २ दुसऱ्या अंकात एका बाजूला कोठडीच्या दगडी भिंती, पायऱ्या ही रचना विचार पूर्वक नेपथ्यात जाणीव करून देत होत्या. रंगभूषा आणि वेशभूषा यांचा विचार शांता येळंबकर यांनी केलेला स्पष्ट जाणवत होते. विशेषत: दुसऱ्या अंकातील शेखरची एंट्री त्यांचे तेजस्वी पण किंचित तांबूस, शेंदरी रंगाने आणि भगवे उत्तरीय देऊन त्या भूमिकेला अधिक गहिरे पणा आणला. पार्श्वसंगीतात अगदी हळुवारपणे, संथ छेडला जाणारा तानपुरा. किरण एक धरुनी हाती मी पुढे निघालो सुरेश भटांच्या या कवितेचा वापर आणि शेवटच्या अहिरभैरच्या आलापीने प्रयोगाची रंगत वाढवली.

लेखक - विजय कटके यांचे लिखाण अनेक सुंदर विचार आणि वाक्यांनी जे मांडावयाचे आहे ते स्पष्टपणे मांडले आहे. सुंदर,अर्थपूर्ण,जीवन दर्शन घडवणारी वाक्ये उदा.शेखरच्या तोंडचे दुभंगून जाताजाता मी अभंग झालो. दिग्दर्शक-रत्नाकर जाधव यांनी नाटक परिश्रमपूर्वक उभे करण्याचे घेतलेले कष्ट स्पष्टपणे जाणवत होते. पण दुसऱ्या अंकाच्या कोठडीतील सीन च्या प्रवेशात शेखर अधूनमधून जोरजोरात का ओरडतो, स्वत्व:चे केस ओढतो हे स्पष्ट झाले नाही. दुसऱ्या अंकात 'माणुसकी नकोय' या वाक्यात राजाचे अडखळते स्पष्ट जाणवले. पण सर्वांनी टीमवर्कवर लक्ष दिले तर प्रयोग उंचीवर नेऊ शकतो हे दाखवून दिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### दिव्यांगांना हक्काची जाणीव हीच खरी दिव्यांगत्वावर मात : डॉ. बिराजदार

**अक्कलकोट, दि. ४ डिसेंबर-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार महाराष्ट्र शासनाने दिलेल्या सोयी सुविधांचा लाभ घेऊन दिव्यांगांनी दिव्यांगत्वावर मात करावी असे विचार ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सतीश बिराजदार यांनी जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात व्यक्त केले. सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती संचलित मूकबधिर निवासी शाळा अक्कलकोट या शाळेत तीन डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी डॉक्टर हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना डॉक्टर बिराजदार यांनी महाराष्ट्र सारख्या प्रगत राज्याने दिव्यांगांच्या कल्याणासाठी शिक्षण, आरोग्य, याबाबतीत अनेक योजना कार्यान्वित केलेल्या आहेत. याचा जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी शिक्षण घेऊन स्वावलंबी जीवन जगत असलेल्या दीव्यांग बांधवांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास ग्रामीण रुग्णालय अक्कलकोटचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सतीश बिराजदार, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य कल्याणराव पाटील प्राध्यापक बसवराज खूने यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे स्वागत व सत्कार मुख्याध्यापक बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचा कार्य वृतांत कर्णबधिर विद्यार्थ्यांना सांकेतिक भाषेत शिक्षक हैबती वंजारे व रामदास कुंडगिरे यांनी सांगितला. यावेळी शिक्षक बनसिद्ध कोरे, बसवराज आळंद, बसवराज ममदापुरे, दिलीप नरवाडे, सुषमा वांगे, संगीता शिंदे, गजानन गाडेकर, सागर महावरकर, शरणय्या स्वामी तसेच विद्यार्थी व दिव्यांग बांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन सुरेश भोसले यांनी तर आभार मच्छिंद्र अंगुले यांनी मानले.



### चपळगाव प्रशालेत एनसीसी कॅम्प सुरू

**अक्कलकोट, दि. ४ डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव येथील ग्रामीण विद्या विकास विद्यालय प्रशालेत तब्बल १६ वर्षानंतर ९ महाराष्ट्र बटालियन अंतर्गत एनसीसी कॅम्प सुरू असून या कॅम्पमध्ये जिल्ह्यातील विविध तालुक्यातील विविध शाळेतील एकूण ४०० विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते. कर्नल सतीश रणधीर ,लेफ्टनंट कर्नल शरद बाबर, सुभेदार मेजर सबकोटे, कॅप्टन डॉक्टर गौस शेख, लेफ्टनंट विजया गायकवाड, थर्ड ऑफिसर असिफ मुलाणी, थर्ड ऑफिसर म्हमाणे, सेकंड ऑफिसर रेवंणसिद्ध भंगे सर्व पी.आय स्टाफ व ऑफीसर यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली व मल्लिकार्जुन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रविकांत पाटील, सचिव प्रभाकर हंजगे, कार्याध्यक्ष पंडित पाटील प्रशालेचे मुख्याध्यापक संजय माने, सीईओ नीलकंठेश्वर पाटील, पर्यवेक्षक विश्वनाथ बानेगाव, सेकंड ऑफिसर रेवणसिद्ध भंगे यांच्या विशेष सहकार्याने मागील २६ नोव्हेंबर पासून याठिकाणी एनसीसी कॅम्प सुरू असून दिनांक ५ डिसेंबर रोजी या एनसीसी कॅम्प सांगता होणार आहे. या कॅम्पच्या यशस्वितेसाठी चपळगाव ग्रामपंचायतकडून सरपंच वर्षा भंडारकवठे, उपसरपंच गणेश कोळी सर्व सदस्य,उमेश सोनार रवी कोरे, आरोग्यसेवा देण्यासाठी डॉ,सारंग पाटील, आरोग्यसेवक चटमुटगे ,आशा वर्कर्स यांचेही विशेष योगदान लाभले तब्बल १६ वर्षानंतर चपळगाव प्रशालेत एनसीसी कॅम्पचे आयोजन करण्यात आल्याने एकंदरीत गावात देशभक्तीचे वातावरण पाहण्यास मिळत आहे.

### सांगोल्यात प्रतिबंधित पान मसाला व सुगंधी तंबाखू जप्त

**सांगोला, दि. ४ डिसेंबर-**

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये पोलीस निरीक्षक कुंदन गावडे व पोलीस कर्मचारी तसेच सांगोला पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक सचिन जगताप, उपनिरीक्षक स्नेहल चव्हाण यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे सोमवारी रात्री एखतपूर रोड, मस्के कॉलनी, सांगोला येथील एका खोलीत अचानक छापा टाकून सहा बॉक्स व तीन गोण्यांमध्ये भरलेला प्रतिबंधित पान मसाला व सुगंधी तंबाखू जप्त केली आहे. याबाबत अन्न सुरक्षा अधिकारी उमेश भुसे यांनी सांगोला पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अभिजित मस्के रा.मस्के कॉलनी, सांगोला व निलेश खरात (रा. सांगोला) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पकडलेल्या मालामध्ये आरएमडी पान मसाला एकशे वीस बॉक्स, एम सुगंधी तंबाखू एकशे वीस बॉक्स, विमल पान मसाला दोनशे आठ पाकिटे, सुपर जेम्स पान मसाला दोनशे पाकिटे, एस ९९९ सुगंधी तंबाखू दोनशे पाकिटे असा २ लाख ३१ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

### महापरिनिर्वाणदिनी भीम टायगरच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**बार्शी, दि. ४ डिसेंबर-**

भीम टायगर मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था बार्शीच्यावतीने सालाबादप्रमाणे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याचे भीम टायगर सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शंकर वाघमारे यांनी सांगितले. शुक्रवार दि. ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन असून या दिवशी सकाळी आठ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कोर्टासमोरील पुतळ्यासमोर रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. त्याचबरोबर बार्शीतील सुप्रसिद्ध डेंटिस्ट डॉ. विनोद भालेराव व डॉ. सोनाली भालेराव हे मोफत दंत तपासणी करणार असून रुग्णांना मोफत औषधोपचार देखील केले जाणार आहेत. सदर रक्तदान शिबिरातील रक्ताचे संकलन बार्शीतील भगवंत ब्लड बँकेच्यावतीने करण्यात येणार असून सदर रक्तदान शिबिराचे व दंतरोग आरोग्य तपासणीचे उद्घाटन माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. सदरचे हे शिबिर भीम टायगर सामाजिक व बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने दहावे शिबिर आहे. शिबिरात हजारो लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन भीम टायगर सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकर वाघमारे यांनी केले आहे.

# बाजार समितीत ३०० ट्रक कांद्याची आवक

**● कांद्याची आवक घटली ● दर मात्र ६ हजारावर स्थिर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ डिसेंबर-**

कांद्याच्या उलाढालीसाठी राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी बाजारपेठ म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याची बाजार अवस्था पाहून बळीराजा समाधानी बनलेला दिसत आहे.

दक्षिण भारतातील चक्रीवादळ आणि होत असलेली दरवाढ पाहून शेतकऱ्यांनी आपल्या कांद्याला चांगले दर मिळतील, या आशेने कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आपला कांदा बाजार समितीत विक्रीसाठी आणला असता, बाजार समितीमधील कांदा लिलावात कांद्याला सुमारे २ हजार ते ६ हजार रुपये पर्यंतचा घाऊक दर मिळाला. आवक कमी असल्याने दर वाढेल अशी, आशा बाळगलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी मात्र निराशा



पडली आहे. दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत आज कांद्याची आवक ३०० ट्रक इतकी आली होती.

आवक कमी आहे, त्यामुळे कांद्याला दर वाढून मिळेल या अपेक्षेत शेतकरी होता. मात्र कांद्याला सरासरी भाव २५०० रुपयापर्यंतच मिळाला. बाजारपेठेत आलेल्या गेल्या दोन दिवसांपूर्वी कांद्याला सरासरी भाव २६०० प्रती क्किंटल असाच मिळत आहे. बुधवार, ४ डिसेंबर रोजी कांद्याला चांगला दर मिळेल, अशी आशा होती परंतु ज्या ठिकाणी कांद्याची मागणी होते, त्याच ठिकाणी जोराचा पाऊस असल्याने कांद्याच्या मागणीत घट होऊन दर स्थिर असल्याचे सांगण्यात आले. कांद्याच्या लागवडीसाठी ज्या प्रमाणात खर्च येतो. त्या प्रमाणात उत्पन्न मिळत नसल्याने निराशा पदरात पडत आहे. कांदा लागवडीसाठी एक हेक्टर क्षेत्रात सुमारे ५० ते ६० हजार रुपयापर्यंतचा खर्च येतो. त्यामध्ये बी बियाणे, खते, औषधे, नांगरट, काढणे, गोणे अशा विविध प्रकारचा खर्च येतो. एका हेक्टर मध्ये ४० ते ५० पिशव्या कांदा प्राप्त झाल्यानंतर त्याला दर म्हणावा तसा मिळत नाही त्यामुळे खर्च वजा जाता उत्पन्न तुटपुंजे मिळते. ज्या प्रमाणात उतार पडावा त्या प्रमाणात उतार पडत नसल्याने, शेतकरी चिंताक्रांत बनत आहे.

**खर्च वजा जाता दर वाढणे अपेक्षित**

एक हेक्टर कांद्याचे पीक घेण्यासाठी सुमारे ५० ते ७० हजार रुपयांचा खर्च येतो. त्यामध्ये खते १७०० रुपये ५० किलो पिशवीसाठी मोजावे लागतात. त्याचप्रमाणे युरिया व औषध फवारणी यासाठी चार हजार रुपये खर्च येतो. तसेच बियांची रोपण आणि कांदा काढणीसाठी दिवसाला ५०० रुपये मजुरी द्यावी लागते. अशा स्थितीत खर्च जास्त होऊन उत्पन्न कमी मिळते. सध्या मी भूम येथून कांदा विक्रीसाठी सोलापूर बाजार समितीत आणला आहे. ४० पाकीटांसाठी यापूर्वी ४५ रुपयांचा घाऊक दर मिळाला होता. त्यामध्ये खर्च वजा जाता उत्पन्न कमी प्रमाणात प्राप्त झाले. त्यामध्ये इतर खर्च भागवणे अवघड आहे.

**- दत्तात्रेय निरपळ, कांदा शेतकरी भूम**

**कांद्याचे उत्पादन क्षेत्र घटल्याने दर स्थिर**

राज्यातील तसेच सोलापूर जिल्ह्यातील कांदा उत्पादन क्षेत्र घटले आहे. पूर्वी कांदा उत्पादक शेतकरी १२ महिने कांदा पीक घ्यायचा. परंतु आता हंगामानुसार कांदा उत्पादन घेतले जाते. सध्या कांद्याचे उत्पादन पूर्वीच्या तुलनेत घटलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारा दर समाधानकारक वाटतो आहे. तरीदेखील शेतकऱ्यांना दर वाढीव मिळावा अशी अपेक्षा असते.

**- सचिन साळुंखे, कांदा आडत व्यापारी**





## अक्कलकोटमध्ये एड्स जनजागृती रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट , दि. ४ डिसेंबर-**

जागतिक एड्स जागृती दिनानिमित्त मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय रेड रिबीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीचा प्रारंभ वैद्यकीय अधिकारी डॉ सतीश बिराजदार व संस्थेचे संचालक मल्लिनाथ मसुती यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ राघवेंद्र करजगीकर, समुपदेशक मारुती धर्मसाले, वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक नजीर अहमद दलाल, एनजीओ प्रकल्प प्रमुख मल्लिकार्जुन पाटील, वरिष्ठ मलेरिया पर्यवेक्षक बसवराज याबाजी आदी उपस्थित होते.

रॅली महाविद्यालय ते एसटी स्टँड विजय कामगार चौक कारंजा चौक बाजारपेठ मार्गे काढण्यात आली रॅलीचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा राजेश पवार व प्राध्यापिका शीतल झिंगाडे- भस्मे यांनी केले, रॅलीमध्ये प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा भीम सोनकांबळे, प्रा मनीषा शिंदे प्रा हर्षदा गायकवाड यांच्यासह २१५ स्वयंसेवक उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल स्वयंसेवक व अधिकाऱ्यांचे आ. सचिन कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी यांनी अभिनंदन केले.

## कर्मचारी नियुक्तीत विसंगतीमुळे उपोषण

**● वैराग नगरपंचायतीमधील प्रकार; संपत धेंडे चौथ्यांदा बसले उपोषणास**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ४ डिसेंबर-**

वैराग ग्रामपंचायतचे नगरपंचायतमध्ये रूपांतर झाल्यानंतर नगरपंचायतीमध्ये कर्मचारी नियुक्तीमध्ये विसंगती आढळत असल्याच्या संदर्भात माजी पंचायत समिती सदस्य संपतराव धेंडे चौथ्यांदा वैराग नगरपंचायतीसमोर उपोषणास बसले आहेत .

मागील उपोषणाच्या अनुषंगाने मुख्याधिकारी यांनी दिलेली लेखी माहिती अपुरी असून समाधानकारक नसल्याने ३ डिसेंबर २०२४ मंगळवारी पुन्हा एकदा चौथ्यांदा धेंडे उपोषणाला बसले आहेत . वैराग ग्रामपंचायतीचे १८ मे २०२१ रोजी नगरपंचायती मध्ये रूपांतर झाले. ग्रामपंचायतीचे कर्मचारी नगरपंचायतीमध्ये वर्ग करताना सहा वेळा कर्मचाऱ्यांच्या याद्या बदलण्यात आल्याचा संपत धेंडे यांनी आरोप केला आहे. याबाबतचा खुलासा त्यांना प्रशासनाला निवेदनाद्वारे मागितला आहे. ग्रामपंचायत काळात नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची मूळ कागदपत्रे, त्यांचे नियुक्ती आदेश, सेवा पुस्तके, शैक्षणिक पात्रता यासह इतर कागदपत्रे मिळावीत. नियुक्त कर्मचाऱ्यांच्या याद्या कशा तयार करण्यात आल्या? गटविकास अधिकारी यांच्यापासून मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त यांना याद्या पारित करताना दीड ते दोन महिन्यांचा कालावधी असावा, असे असताना १७ महिने कसे लागले? याचा खुलासा करावा अशी मागणी त्यांनी यापूर्वीच्या उपोषणादरम्यान केली.१८ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे पहिले उपोषण केले. नंतर १५ जानेवारी व ३० सप्टेंबर रोजी नगरपंचायतीसमोर उपोषण केले. वैराग नगरपंचायतीचे प्रभारी मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी उपोषणकर्त्यांना ५ ऑक्टोबर रोजी लेखी आश्वासनाचे पत्र दिल्याने उपोषण स्थगित करण्यात आले होते.

जोपर्यंत मागितलेली कागद पत्रांची माहिती मिळत नाहीत तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, असे संपत धेंडे यांनी यावेळी सांगितले. वैराग नगरपंचायतीसमोर २४ जानेवारी २०२४ मध्ये दहा दिवसांचे आमरण उपोषण केले. त्यावेळेस त्यांच्यावर ३५३ चा गुन्हा दाखल झाल्याने आंदोलन मोडीत निघाले होते. मात्र त्यानंतरही दहा दिवस जेलमध्ये त्यांनी उपोषण सुरूच ठेवले. तेव्हा कोर्टाने उपोषण मागे घेण्यास लावले होते.

## अक्कलकोटमधील श्वानांच्या मृत्युप्रकरणी कारवाई कधी होणार?

**प्रशासनाकडून चालढकल** **पाल संघटनेचे पदाधिकारी कॅण्डल मोर्चा काढणार**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ डिसेंबर-**

अक्कलकोट शहरात श्वानांना विष घालून मारण्यात आल्याच्या घटनेचे गंभीर पडसाद सर्वत्र उमटले आहेत अनेकांनी याबाबत पोलिसात तक्रार दाखल केली आहे. येत्या दोन दिवसात प्राणी मित्र संघटनेचे पथक अक्कलकोटमध्ये

दाखल होणार आहे.कारवाई करण्याबाबत प्रशासनाने केलेल्या चालढकल भूमिकेबाबत प्राणी मित्र संघटनेने संताप व्यक्त केला आहे. याबाबत संघर्ष समितीचे तालुकाध्यक्ष दिलीप सिद्धे यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. चावणे हा कुत्र्याचा गुणधर्म आहे परंतु एखाद्या दुसऱ्या घटना शहरामध्ये घडल्या असतील परंतु सर्वच कुत्र्यांना अशा पद्धतीने विष घालून मारणे अत्यंत क्रूरपणाचे कृत्य आहे.खरे तर श्वान हे खंडोबा देवाचे वाहन आहे. सध्या चंपाषष्ठी सुरू आहे आणि अशा उत्सव काळामध्ये अशा पद्धतीने मारणे हा गंभीर गुन्हा आहे. बऱ्याच वेळा पोलीस तपासात कुत्र्यांचा वापर केला जातो त्यामुळे अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत पण ह्या घटनेत. दोषींवर निलंबनाची तर कारवाई झालीच पाहिजे आणि गुन्हा देखील दाखल झाला पाहिजे, अशी माझी भूमिका आहे. येत्या दोन दिवसात जर कारवाई नाही झाली तर आम्ही देखील प्राणी मित्र संघटनेसोबत आंदोलन करू,असेही ते म्हणाले.पाल निमल वेल्फेअर फाउंडेशनने दोषींवर कारवाई करण्याबाबत अक्कलकोट नगरपरिषद व पोलीस ठाण्याला लेखी पत्र दिले. तरीही कारवाई झालेली नाही.ही घटना घडून चार दिवस उलटले तरी अद्याप प्रशासनाकडून ठोस कार्यवाही न झाल्याने या प्रकरणाचा गोंधळ आणखीन वाढला आहे.याबाबत राज्यातील वेगवेगळ्या प्राणी मित्र संघटनाही आक्रमक झाल्या असून त्यांनी अक्कलकोटच्या या प्रकरणाची गंभीर दखल घेतल्याचे दिसून येत आहे.

याबाबत मुख्याधिकारी डाके यांनी सांगितले की,आम्ही देखील या मृत्यू पावलेल्या श्वानांबद्दल पोलीस ठाण्याकडे तक्रार दिली आहे. कोणी तरी अज्ञात व्यक्ती या प्रकरणांमध्ये विष किंवा अन्य प्रकाराने श्वानांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी, असे पत्र पोलीस स्टेशनला दिले आहे.याचा तपास लवकरच होईल, असे सांगितले.पशुसंवर्धन विभागाकडे विचारणा केली असता प्राणी मित्रांनी तक्रार केल्यानंतर आम्हाला कळाले.याबाबत आम्हाला सुद्धा कल्पना नव्हती.परंतु एका श्वानाचा पोस्टमार्टम झालेला आहे त्याचा अहवाल आल्यानंतरच एवढे श्वान नेमके कशामुळे मृत्यू पावले याचा तपास लागू शकेल,असे पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. रविवारी पाल निमल वेल्फेअर फाउंडेशनने नगर परिषदेला माहिती मागवली आहे.परंतु अद्याप त्यांनाही नगरपरिषदेकडून योग्य ते उत्तर मिळाले नाही,असे त्यांचे म्हणणे आहे.त्यामुळे ते देखील आक्रमक झाले असून लवकरच या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी एक पथक अक्कलकोट येथे दाखल होणार असल्याचे समजते.

## उमा महाविद्यालयाचे बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ डिसेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत छत्रपती शिवाजी नाइट कॉलेज, सोलापूर येथे आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत येथील उमा महाविद्यालयाच्या मुलांमध्ये किरण धनाजी गोडसे (६७ ते ७१ किलो वजनी गट) व रोहन सुनील काळे (९२ + वजनी गट) यांनी प्रथम क्रमांक मिळविला. तर अभिषेक भोसले (४६ ते ४८ वजनी गट), युवराज वाघमारे (६० ते ६३ वजनी गट), दत्तात्रय चव्हाण (५७ ते ६० गट), महावीर गंगथडे (८६ ते ९२ वजनी गट) यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

दरम्यान सर्व विजेत्या खेळाडूंचे संथेचे अध्यक्ष तथा माजी आमदार प्रशांत परिचारक, उपाध्यक्ष मुकुंद परिचारक, खजिनदार रमेश लाड, सचिव राजगोपाल भट्टड, विश्वस्त प्रणव परिचारक व इतर संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे कार्यवाहक तथा माजी प्राचार्य डॉ.मिलिंद परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड आदींनी खेळाडूंचे अभिनंदन केले. सर्व विजेत्या खेळाडूंना प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद ढवण, तसेच कार्यालयीन अधीक्षक एस. डी. पारखे, व पी.एस शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

# रयतेचा राजा शिवछत्रपती नाट्यातून उलगडला शूरवीरांचा इतिहास

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ४ डिसेंबर-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दिनांक २ व ३ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या रयतेचा राजा-राजा शिवछत्रपती या महानाट्यातून छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पराक्रमांचा ज्वलंत इतिहास उलगडला. हजारो रसिकांनी याला भरभरून दाद दिली.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती अकलूज, शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना कामगार वर्ग यांचे वतीने विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल, अकलूज येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

यावेळी सरकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सुलक्षणादेवी मोहिते-पाटील, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी कांचनमालादेवी मोहिते-पाटील या बंधूंच्या अमृतमहोत्सवी वाटचाली निमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्यांना चांदीची तलवार व संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळाच्या वतीने चांदीचा लेझीम भेट देण्यात आला. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, नंदिनीदेवी मोहिते-पाटील प्रमुख उपस्थित





**अकलूज : रयतेचा राजा शिवछत्रपती या महानाट्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळामध्ये सहभागी झालेले ९०० कलाका.**

होते. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, ऋतुजादेवी मोहिते-पाटील, सुमित्रादेवी खानविलकर, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, व्हा.चेअरमन शंकरराव माने-देशमुख, सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, कार्य.संचालक राजेंद्र चौगुले उपस्थित होते. महानाट्यासाठी क्रीडा संकुलवर उभारलेल्या १२५ फूट लांब व ७० फूट रुंद अशा भव्य रंगमंचावर शिवाजी महाराजांच्या भूमिकेत चित्रपट कलावंत शंतनू मोघे, जिजाऊंच्या भूमिकेत अभिनेत्री पल्लवी वैद्य, बाजीप्रभूंच्या भूमिकेत अभिनेते रवींद्र कुलकर्णी आणि अफजल खानाच्या भूमिकेत अभिनेते विश्वजित फडते यांच्यासह स्थानिक ९००हून अधिक कलाकारांनी सहभाग घेतला. याचे लेखक युवराज पाटील, दिग्दर्शक अभिनेते अजय तपकिरे,सूत्रधार डॉ. विश्वनाथ आवड होते. शिवजन्म पूर्व कालापासून ते शिवराज्याभिषेकापर्यंतचे महत्त्वाचे प्रसंग या महानाट्यातून साकारले. यात अल्लाउद्दीन खिलजीची स्वारी, स्वराज्यसंकल्पक शहाजीराजे व जिजाऊ माँसाहेब यांनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न, शिवजन्म-बारसे, बालशिवाजीचे शिक्षण, स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, रांजाच्या पाटलाला सुनावलेली शिक्षा, प्रतापगडावरील पराक्रम, पन्हाळ्याहून सुटका, शिवा काशिदचे व बाजीप्रभूचे आत्मबलिदान,बहलोल खानाचा प्रसंग व सेनापती प्रतापराव गुजर यांची आत्माहुती, गड आला पण सिंह गेला व शेवटी शिवराज्याभिषेक इत्यादी प्रसंग हुबेहूब साकारले. यामधील पायदळ व घोडदळाचा प्रत्यक्ष सहभाग यामुळे या महानाट्याने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बॉक्सिंग स्पर्धेत महेक मुलाणी राज्यात द्वितीय

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.४ डिसेंबर-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथील इयत्ता बारावी मधील विद्यार्थिनी महेक इरफान मुलाणी हिने क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य,पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय,अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला या ठिकाणी झालेल्या राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविला व दरवर्षी प्रमाणे बॉक्सिंग स्पर्धेत वर्चस्व प्रस्थापित केले.



यशस्वी खेळाडूला क्रीडा शिक्षक प्रा.सचिन चव्हाण,सुनील भोरे,प्रा.डी.के.पाटील, नरेंद्र होनराव, सुभाष निंबाळकर, प्रा. संतोष लवटे, स्नेहल देशमुख यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशस्वी खेळाडूचा संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले यांनी अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त...




### कृतीशील मुख्याध्यापक पुरस्काराने व्ही.वाय.पाटील सन्मानित

**पंढरपूर, दि. ४ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समिति तर्फे दिल्या जाणाऱ्या यावर्षीचा कृतिशील मुख्याध्यापक पुरस्कार कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे प्रदेश सचिव तथा माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. येथील कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक व्ही.वाय. पाटील हे हाडाचे शिक्षक व मुख्याध्यापक त्याचबरोबर विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून देखील प्रशालेत ओळखले जातात. नाविन्यपूर्ण प्रयोगशीलतेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हेच ध्येय सातत्याने प्रशासनात ठेवून पालक,शिक्षक व शालेय प्रशासनात उत्तम गतिमानता कायम ठेवल्याने त्यांना हा पुरस्कार दिला गेल्याचे शिक्षक व पालक वर्गातून भावना व्यक्त होत आहेत. मुख्याध्यापक पाटील यांना कृतिशील पुरस्काराने सन्मानीत करण्यात आल्यामुळे पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव सु.र. पटवर्धन यांनी त्यांचे अभिनंदन करून मुख्याध्यापक पाटील यांचा कवठेकर प्रशालेच्या प्रगतीत सिंहाचा वाटा असल्याचे मत त्यांचा सत्कार करताना व्यक्त केले. यावेळी पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन नानामालक कवठेकर, सदस्य एस.पी.कुलकर्णी यांनीही पाटील यांचे अभिनंदन केले.



### वळसंगच्या शंकरलिंग प्रशालेत आनंदी बाजार भरला

**वळसंग, दि. ४ डिसेंबर -**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्रीशंकरलिंग प्रशालेत दप्तर विना शाळा या उपक्रमांतर्गत आनंदी बाजार भरण्यात आले होते. या बाजारात पाचवी ते आठवी वर्गातील बहुतांश विद्यार्थ्यांनी सहभागी नोंदविला होता. बाजारात भरलं जाणारे भाजीपाला कोथिंबीर, शेपू, कांदा, बटाटे, पडवळ, फळ फळावळे इत्यादी भाजीपाला खाद्यपदार्थ मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी मांडले होते. भाजीपाला खरेदीसाठी बहुतांश पालक वर्ग उपस्थित होते. शिक्षक व वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतच बाजार भरल्या कारणाने उत्साहाने भाजीपाला फळे खरेदी केले. या उपक्रमा मुळे सर्वच विद्यार्थी उत्साहित दिसून येत होते. या आनंदी बाजाराचे नियोजन प्रशालेचे शिक्षक निलप्पा कवटगी, सिद्धाराम भैराम डगी, बसवराज दूधगी आदींनी नियोजन केले होते. मुख्याध्यापक वीरेश थळंगे पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे त्यांचे अभिनंदन केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांची व्यवहारिक दृष्ट्या व प्रत्यक्षात बाजार मध्ये घडणाऱ्या गोष्टी लक्षात येतात. भविष्यामध्ये सुधारित शेतकरी विद्यार्थी बनू शकेल तसेच आधुनिक शेतीचा व शिक्षणाचा संगम हे नक्कीच विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल, असे मुख्याध्यापक वीरेश थळंगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सिद्धारूढ हिरेमठ, संजय कुमार धनशेट्टी, विरेश थळंगे बाळकृष्ण गुंड, संतोष कस्तुरे, अजय मानकोजी, गंगाधर बिराजदार, शैला निंबाळ कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी आदींनी परिश्रम घेतले.

### मंद्रुप ग्रामपंचायत अधिकाऱ्यांकडून माहीती देण्यास टाळाटाळ

**मंद्रुप, दि. ४ डिसेंबर-**

मंद्रुप ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मंद्रुपमधील आर्थिक व्यवहार व विकासकामांची माहीती मागितल्यानंतर टाळाटाळ करण्यात येत आहे. अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणीत माहीती देण्याचे आदेश दिल्यानंतरही ग्रामपंचायत अधिकारी सोमण्णा पुजारी माहीती देत नसल्याने माहीती अधिकाराचे उल्लंघन होत आहे. अर्जदारांनी मंद्रुप ग्रामपंचायत अधिकारी सोमण्णा पुजारी यांना या कालावधीत खर्च करण्यात आलेले रक्कम , विविध निधीमधून करण्यात आलेली विकासकामे व विविध करातून जमा झालेले रक्कम खर्च करण्यात आलेल्या कारणांची माहीती मागितली. दोन महिने कालावधीत अर्जदारांनी ग्रामपंचायत अधिकारी पुजारी यांच्याकडे माहीती मागितली. मात्र पुजारी यांनी माहीती अधिकार अर्जाला केराची टोपली दाखवून माहीती देण्याचे टाळले. अर्जदारांनी अपिलीय अधिकाऱ्यांकडे अपिल केल्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी पुजारी सुनावणीला गैरहजर राहीले. यावेळी अपिलीय अधिकारी यांनी ग्रामपंचायत अधिकारी पुजारी यांना माहीती देण्याचे आदेश दिले. मात्र अद्याप अर्जदाराला माहीती मिळत नसल्याने ग्रामपंचायत आर्थिक कारभाराविषयी संशय उपस्थित करण्यात येत आहे. अपिलीय अधिकारी यांनी माहीती देण्याचे आदेश देऊनही पुजारी माहीती देत नसल्याने माहीती अधिकाराचे उल्लंघन होत आहे. अर्जदारावर दबाव आणून माहीती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. म्हणून ग्रामपंचायत अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# चंद्रभागा वाळवंटातील अनेक पुरातन घाटांची दुरवस्था

**● नमामी चंद्रभागा योजना कागदावरच ● वारकरी सांप्रदायातून मंदिराचे तरी संवर्धन करावे अशी मागणी**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर,दि.४ डिसेंबर -**

येथील चंद्रभागा वाळवंटातील अनेक पुरातन घाटांची सध्या दूरवस्था झालेली आहे. चंद्रभागा नदी आणि वाळवंट परिसर विकसीत करण्यासाठी शासनाकडून नमामी चंद्रभागा योजना आखली गेली. या योजनेअंतर्गत भीमा नदीच्या उगमापासून ती भीमा नदीच्या शेवटपर्यंतच्या नदीचा विकास करण्यात येणार होता. मात्र ही योजना केवळ कागदावरच दिसून गेली. त्यामुळे उगमापासून ते शेवटपर्यंत जावूद्यात निदान शासनाने येथील वाळवंटात असलेल्या प्राचिन घाटांचा तसेच पुरातन मंदिराचे तरी संवर्धन करावे, अशी मागणी वारकरी सांप्रदायातून केली जात आहे.

येथील चंद्रभागा नदीच्या पात्रात जुन्या दगडी पुलापासून ते विष्णूपदा पर्यंत एकुण दहा ते बारा घाट तयार करण्यात आले आहेत. नागरिकांना शहरातून नदीपात्रात जाण्यासाठी पूर्वी हे घाट तयार करण्यात आलेले होते. या मध्ये सर्वात प्रथम १७७५ मध्ये कुंभार घाटाचे बांधकाम करण्यात आले होते. या घाटाची आजमितीला कमालीची दूरवस्था झाली आहे. या घाटावर पालिकेकडून सुलभ शौचालय, ड्रेनजचे पाणी साठविण्यासाठी सिमेंटच्या चेंबरचे बांधकाम करण्यात आले आहे. भिकाऱ्यांनी देखील या घाटावर कमालीचे अतिक्रमण केलेले आहे. या घाटावर असणारी प्राचिन कुंभारघाटाचीवेस देखील सध्या मोडकळीस आलेली दिसत आहे.

या बरोबरच नदी पात्रात असणारा विप्रदत्त घाट जो १८२० ते २२ मध्ये तयार करण्यात आला आहे. या घाटांची देखील बऱ्याच वर्षापासून दूरवस्था झाली आहे. या घाटाच्या खालच्या बाजूस म्हणजेच वाळवंटालगत असणाऱ्या पायऱ्याच घाटापासून वेगळ्या झाल्याच्या दिसत आहे. त्यामुळे या घाटावरुन येजा करताना विशेषत: वृध्द माणसे, महिला तसेच लहान मुलांचे कमालीचे हाल होत आहेत. या प्रमाणेच नगरपालिकेच्या जुन्या इमारती जवळ असणाऱ्या खिस्ते घाटाची देखील काहीशी पडझड झालेली आहे. त्यामुळे शासनाकडून किंवा प्रशासनाकडून चंद्रभागा वाळवंटाच्या सौंदर्यात भर टाकताना वाळवंटातील प्राचिन मंदिरांचे तसेच घाटांचे ही संवर्धन होण्याची गरज आहे.





**पंढरपूर - येथील चंद्रभागा नदीच्या पात्रात असणाऱ्या विविध पुरातन घाटां बरोबरच चंद्रभागेच्या पात्रात असलेल्या चौफाळ्याच्या दगडी कट्यांची देखील मोठी दूरवस्था झालेली दिसत आहे.**

### वाळवंटातील घाटांचा प्राचिन इतिहास

पंढरपूरात सध्या अस्तित्वात असलेले प्राचिन घाट व त्या घाटांची निर्मिती करणाऱ्यांची नावे कंसात दिलेली आहेत. कुंभारघाट (१७७५ मध्ये सरदार लिमये ), महाव्दार घाट (चिंतु नागेश बडवे ) दत्तघाट ( जनाई आप्पा हरिसाद), कासारघाट ( जांभेकर नाईक ), चंद्रभागा घाट (१८१८ गोविंद महाराज चोपडकर),विप्रदत्त घाट ( चिंतामणराव पटवर्धन ), खिस्ते घाट (खिस्तेबुवा महाराज) अशा प्रकारे प्राचिन असे अकरा ते बारा घाट सध्या चंद्रभागा नदीच्या तिरावर अस्तित्वात आहेत अशी माहिती येथील प्राचिन गोष्टींचे अभ्यासक आणि अधिवक्ता असलेले धनंजय रानडे यांनी दिली.

चंद्रभागा नदीचे तसेच वाळवंटाचे पावित्र्य सर्वांनी जपले पाहिजे. नमामी योजना कागदावरच आहे. त्यामुळे शासनाने वाळवंटातील प्राचिन घाट, पुरातन मंदिरांकडे देखील लक्ष दिले पाहिजे. मध्यंतरी चंद्रभागा घाट तसेच या घाटावरील माता चंद्रभागेच्या मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम महाराज मंडळींनी हाती घेतलेले आहे.

**- रामकृष्ण महाराज वीर,**
**राष्ट्रीय प्रवक्ता, वारकरी सांप्रदाय पाईक संघ**

## ढगाळ वातावरणाचा ज्वारी पिकास फायदा

**बार्शी तालुक्यात ज्वारीचे क्षेत्र वाढले**

**गहू, हरभरा, मक्याच्या क्षेत्रात झाली घट**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.४ डिसेंबर-**

यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्यामुळे खरीपा पाठोपाठ येणाऱ्या रब्बी हंगामातील ज्वारी, मका, गव्हू या अन्नधान्य पिकांचे सरासरी ५९५२८ हेक्टर क्षेत्र असताना यावर्षी ६४८९९ हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच १०९ टक्के तालुक्यात पेरणी झाली आहे. हरभरा व इतर कडधान्यासाठी सरासरी ६३२३ हेक्टर असताना प्रत्यक्षात मात्र ५९५३ हेक्टर क्षेत्रावर कडधान्याची पेरणी झाली आहे. तसेच तीळ, जवस, सुर्यफूल, करडई इतर गळीतधान्यासाठी सरासरी ८ हेक्टर क्षेत्र असताना येथे मात्र २ हेक्टरची २५ टक्के पेरणी झाली आहे. सध्या फेंगल चक्रीवादळाच्या ढगाळ वातावरणाचा फायदा ज्वारी पिकास होत असून जोमदार ज्वारी दिमाखदार दिसू लागली आहे.

बार्शी तालुक्यात सरासरी ४७ हजार ७२८ हेक्टर क्षेत्रावरती ज्वारीची पेरणी केली जाते. यावर्षी मात्र ५६ हजार १५६ हेक्टर क्षेत्रावरती पेरणी झाली असून ११८ टक्के पेरणीची नोंद कृषी विभागाकडे करण्यात आली आहे. ज्वारी पाठोपाठ हरभरा या पिकाचे सरासरी ७०८८ हेक्टर क्षेत्र असून ५९५३ हेक्टर क्षेत्रावरती पेरणी करण्यात आली आहे.ज्याचे प्रमाण ८४ % इतके आहे. यंदा पर्जन्यमान चांगले असून देखील गव्हाचे सरासरी क्षेत्र घटलेले दिसून येत आहे एकूण सरासरी ३२७७ हेक्टर क्षेत्र असताना २५३४ हेक्टर क्षेत्रावर ती पेरणी झाल्याचे दिसून येत आहे . शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय पर्याय असून तालुक्यात दुग्ध व्यवसाय वेग घेत असून यासाठी आवश्यक असणारे मका पीक खरीप रब्बी अशा दोन्ही हंगामात घेतली जाते. मात्र यावर्षी रब्बी हंगामातील मका क्षेत्राची पेरणी घटली आहे मका पिकाचे सरासरी क्षेत्र ६१५ हेक्टर असताना केवळ २४२ हेक्टर क्षेत्रावरतीच पेरणी झाली आहे. साधारणपणे ७२ टक्के क्षेत्रांवरील पेरणी घटली आहे.बार्शी तालुक्यात रब्बी हंगामाचे सरासरी पेरणी क्षेत्र ५९, ५३६ हेक्टर इतके असताना ६४ हजार ९०१ हेक्टर क्षेत्रावर ती म्हणजेच १०९ टक्के क्षेत्रावर ती पेरणी झाली आहे. एकेकाळी बार्शी तालुक्यात सूर्यफूल आणि करडईचे उत्पादन शेतकरी मोठ्या प्रमाणात घेत होते. मात्र गेल्या काही वर्षांपासून सूर्यफूल, करडई, तीळ आणि जवस या तेलबियांची पेरणी हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. केवळ करडई दोन टक्के क्षेत्रावर तीच पेरणी झालेली आहे. बार्शी तालुक्यात यंदा मृग नक्षत्रा पासूनच पाऊस सुरू झाल्यामुळे तालुक्यातील सर्वच मध्यम प्रकल्प लहान प्रकल्प पाझर तलाव कोल्हापूर पद्धतीचे बंधारे साठवण तलाव भरभरून वाहिले परिणामी सततच्या पावसामुळे जमिनीतील ओलावा देखील खोलवर गेला याचा फायदा रब्बी हंगामातील ज्वारी पिकास होत असल्याचे दिसून येत आहे यंदा ज्वारीची पेरणी उशिराने झाली असली तरी जमिनीतील योग्य ओलाव्यामुळे उगवण चांगली झाली आहे.



## जंगी कुस्त्यांच्या आखाड्याने अणदूरच्या खंडोबा यात्रेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ४ डिसेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील ग्रामदैवत श्री. खंडोबा यात्रेचा समारोप जवाहर महाविद्यालयाच्या मैदानावर जंगी कुस्त्यांचा आखाडा आयोजित करून करण्यात आला.

यामध्ये अनेक नामवंत मल्लांनी सहभाग नोंदविला लहान मोठ्या कुस्ती धरून २०० कुस्त्याचे सामाने लावण्यात आले. यंदा पारंपारिक पद्धती ऐवजी नोंदणी पद्धतीने कुस्त्यांचा फड रंगला आखाडात अनेक चित्तथरारक दंगली पाहण्यास मिळाल्या. अणदूरच्या मातीतील जय हनुमान तालीम संघातील पैलवानानी मैदान गाजविले. पहिली गटातून आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्यातर्फे १ लाख ५१ हजार रूपाची कुस्ती पै.संदीप मोठे विरुद्ध शुभम सिध्दलाने यांच्यातील लढतीत पै. शुभम सिध्दलाने यांनी मारली बाजी तर दुसरी कुस्ती कै.देवराव चव्हाण स्मरणार्थ मा. बाबुराव चव्हाण यांच्यातर्फे पै. रामा शेळके विरूद्ध पै. धीरज बारस्कर यांच्या लढतीतील १ लाख १ हजार रुपयेची कुस्ती बरोबरीत सुटली आहे. यावेळी पै. विकास धोत्रे, पै.आकाश बनसोडे, पै. कन्हैया रेवणे, पै. राहुल मुळे, पै. महादेव घोडके या मल्लांची आखाड्यातील लक्षवेधी झुंज पाहावयास मिळाली. कार्यक्रमाचे उदघाटन शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमदार मधुकरराव चव्हाण, माजी मंत्री महाराष्ट्र राज्य, माजी जि.प. सदस्य महादेवप्पा आलूरे, गजेंद्र सरोदे सहाय्यक पोलीस निरिक्षक नळदुर्ग, महाराष्ट्र राज्य टायगर ग्रुपचे संस्थापक पै. तानाजी जाधव, जितेंद्र कानडे उपस्थित होते. यावेळी मारुती खोबरे गुरुजी, महादेव मुळे, काशिनाथ शेटे, पै. आप्पास मुळे, प्रवीण घोडके, भीमाशंकर मुडके, विनोद घुगे, सर्जेराव जवळगे, सोमनाथ शेटे, कल्याणी मुळे, सायस घुगे, म्हाळाप्पा गळाकाटे, गुरुनाथ मिटकरे, गुरुनाथ गायकवाड, मार्तंड मोकाशे, लक्ष्मण घुगे, शामराव गायकवाड, बाळू घोडके आदी गावकऱ्यांनी परिश्रम घेतले. उपमहाराष्ट्र केसरी पैलवान भरत मेकाले, राष्ट्रीय कुस्तीपटू पैलवान वामन गाते व धनराज भुजबळ हे पंच राहाणार आहेत तर प्रसिद्ध कुस्ती सामने समालोचक पैलवान पैलवान राजाभाऊ देवकते, गोविंद घारगे हे समालोचन करणार आहेत. या आखाडासाठी पंच म्हणून डॉ. प्रमोद घुगे, गोविंद पवार, नवनाथ जगताप, सुंदर जवळगे, अस्लम काझी, विठ्ठल बंडगर, मौला शेख, मारुती वडार, जीवन बिराजदार, ज्ञानेश्वर गोचडे, बबलू धनके, सचिन घोगरे, रामेश्वर कार्ले, अरुण हावळे, आकाश भोसले, अरुण काळे उपस्थित होते.



# आयुष्मान कार्ड गतीमान करण्यासाठी ११० गावांची निवड


**येत्या १५-२० दिवसांत राशन दुकानदार काम करणार पूर्ण**

**जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांचा विश्वास**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ४ डिसेंबर-**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला आरोग्य उपचार मोफत मिळावेत यासाठी केंद्र शासनाकडून 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' राबविली जात आहे. ती योजना लोकसभा-निवडणुकांमुळे मध्यंतरी रखडली होती. आता त्या योजनेला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी एक बैठक घेवून सर्व अधिकाऱ्यांना सुचना दिल्या आहेत. तर राशन दुकानदारांना प्रतिकार्ड ८ रूपये कमिशन देवून त्यांच्याकडून ही योजना गतीने कार्यान्वित करण्यासाठीही जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिल्याने आयुष्मान कार्ड काढण्यासाठी प्रत्येक तालुक्यात प्रातिनिधीक स्वरूपात १० गावांची निवड केल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. ४) दिली. दरम्यान, या गावांचे काम येत्या १५ दिवसांत पूर्ण करून उर्वरित गावातही ही योजना राबविणार असल्याचे सरडे यांनी सांगितले.

देशातील कोट्यवधी लोक या योजनेत सहभागी झाले आहेत. या योजनेतून लाभार्थ्याला ५ लाखापर्यंतचे मोफत उपचार दिले जातात. केंद्राने २०१८ पासून या योजनेला सुरूवात झाली. ही योजना गतीमान करण्यासाठी उत्तर सोलापूर तालुक्यातून भोगाव, शिवणी, समशापूर, भागाईवाडी, पाथरी, साखरेवाडी, वांगी, कौठाळी, तेलगाव आणि नरोटेवाडी या गावांचा समावेश केला आहे. तर दक्षिण सोलापूर: गंगेवाडी, वरळेगाव, पिंजारवाडी, तोगराळी, गुर्देहळ्ळी, हणमगाव, मद्रे, हिपळे आणि राजूर गावाचा समावेश आहे. बार्शी: भानसाळे,बेलगाव, जहानपूर, पिंपळगाव पा, कपाळवाडी, भांडेगाव, तावरवाडी, वाघाचीवाडी, बोरगाव आणि आंबेगाव. अक्कलकोट: कोन्हाळी, भुरीकवठे, बनजगोळ, कडबगाव, जेऊरवाडी, सातनदुधनी, गळूर्गी, गुरववाडी, मराठवाडी आणि बोरगाव दे. पंढरपूर: आजोती, पेहे, पु. टाकळी, चिचुंबे, लोणारवाडी, सांगवी, सुपली, तरटगाव, टप्पा, शंकरगाव. मोहोळ: दाईंगडेवाडी, दादपूर, गलंदवाडी, अर्धनारी, वडाचीवाडी, अरबळी, वरकुटे, सिध्देवाडी, नांदगाव, रामहिंगणी. मढा: पालवण, वेताळवाडी, रणदिवेवाडी, गवळेवाडी, कुंभेज, फूटजवळगाव, महादेववाडी, जाधववाडी(मा), विठ्ठलवाडी, लोंढेवाडी. करमाळा: गोयेगाव, तरटगाव, हिवरवाडी, निलज, रोशीवाडी, जेऊरवाडी, वडाचीवाडी, दिवेगाव, कात्रज. माळशिरस: झंजेवाडी, साळमुखवाडी, हनुमानवाडी, डोंबाळवाडी खु., कोंडारपट्टा, चौडेश्वरवाडी, देशमुखवाडी, कदमवाडी, सदाशिवनगर, मारकडवाडी. मंगळवेढा: मल्लेवाडी, माळेवाडी, कागष्ठ, चोखामेळानगर, ढवळस, पोट, देगाव, रहाटेवाडी, तांडोर, सिध्देनकेरी. सांगोला: नलवडेवाडी, मिसाळवाडी, मेथवडे, बंडगरवाडी, माळेवाडी, मेटकरवाडी, राजापूर, देवळे, डहाळेवाडी, कारंडेवाडी. अशा जिल्ह्यातील ११० गावांची निवड करण्यात आली आहे.




### गाव पूर्ण करण्यासाठी १५ दिवसांची दिली मुदत

जिल्ह्यातील ११० गावातील राशन दुकानदारांनी आपापल्या गावातील आधारलिंक असलेल्या कार्डधारकांना आयुष्मान कार्ड गतीने काढून द्यायचे आहे. या बदल्यात त्या दुकानदारांना प्रति कार्ड ८ रूपये मोबदला मिळणार आहे. गाव पूर्ण करण्यासाठी १५ दिवसांची राशन कार्डधारकांना मुदत दिल्याचेही जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांनी सांगितले.

### दुकानदारांचे लॉगीन पूर्ण होताच काम सुरू

सोलापूर शहरातील नागरिकांनाही आयुष्मान योजनेत समाविष्ठ करून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य त्या सुचना दिल्या आहेत. सध्या शहरातील दुकानदारांना लॉगीन देण्याचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण होताच येत्या १५ दिवसात आयुष्मान भारत योजनेचे काम करण्यासाठी शहरातील आमचे दुकानदार तयार होतील.

**- ओंकार पडोळे, अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर**

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आ. पाटील यांना मंत्रीपद मिळावे; संत भवानसिंग महाराजांना साकडे

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.४ डिसेंबर -**

विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा विजयी झालेले आ. राणाजगजितसिंह पाटील यांना राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्रीपद मिळावे यासाठी तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील ग्राम दैवत श्री संत भवानसिंग महाराज मंदिरात महाआरती करून भगवंताना भाजपा कार्यकर्त्यांनी साकडे घालण्यात आले.

राष्ट्रीय काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून महायुतीकडून निवडणूक लढवून भाजपचे पाटील यांनी सलग दुसऱ्यांदा विजय संपादन करून जिल्ह्यातील राजकीय इतिहासात आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. धाराशिव जिल्ह्यातील एकूण चार विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी दोन जागा महायुतीला तर दोन जागा महाविकास आघाडीला मिळाल्याने जिल्ह्यातील राजकीय बलाबल समान राहीले आहे. त्यात आ. पाटील यांचे कार्य केवळ तुळजापूर विधानसभा मतदारसंघ मर्यादित नाही तर जिल्ह्यातील सर्व घटकांपर्यंत पोहोचलेले आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून तर धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून संधी दिल्यास जिल्ह्याचा विकास कामांना गती येणार आहे. आ. पाटील यांना मंत्रीपद मिळावे.

यासाठी भाजपचे किशोर सुरवसे व मदन पाटील यांनी येथील श्री संत भवानसिंग महाराज मंदिरात महाआरती केली.



### ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### विधीमंडळ गटनेतेपदी फडणवीस; भाजपाच्या वतीने आनंदोत्सव साजरा

**परंडा, दि.४ डिसेंबर -**

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र विधीमंडळ गटनेते पदी कणखर नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टी परंडाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाके फोडून पेढे वाटून आनंदोस्तव साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा नेते बार कौन्सिलचे ॲड. मिलींद पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. झहीर चौधरी, सुजित परदेशी, रामकृष्ण घोडके, अरविंद रगडे, उमाकांत गोरे, अविनाश विधाते, बाबासाहेब जाधव, धनाजी गायकवाड, साहेबराव पाडुळे, तुकाराम हजारे, मिलींद शिंदे, धनंजय काळे, गौरव पाटील, सुरज काळे, आदर्श ठाकूर, अमर ठाकूर, सिध्दीक हन्नूरे, अजिम हन्नूरे, जयंत भातलवंडे, जयंत सायकर, जोतीराम गिरवले तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### जागतिक एड्स दिनानिमीत्त मुरूम येथे रॅली संपन्न

**मुरूम, दि.४ डिसेंबर -**

जागतिक एड्स दिन निमित्ताने बुधवार दि.४ रोजी मुरूम शहरात ग्रामीण रुग्णालय तसेच मातोश्री डीएमएलटी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने रॅलीचे आयोजन करून जनजागृती करण्यात आली. मुरूम ग्रामीण रुग्णालय मुरूमचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश आरदाळे यांच्या मार्गदर्शनानुसार रॅलीचे आयोजन करण्यात आली. यावेळी मुरूम पोलीस ठाणेचे बिट अमलदार साकळे, पोलिस कर्मचारी राठोड यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून एड्स जनजागृती रॅलीला सुरुवात करण्यात आले. शहरातील बसस्थानक ते बसवेश्वर चौक त्यानंतर ग्रामिण रुग्णालयपर्यंत रॅली काढण्यात आली. यावेळी आयसीटीसीचे समुपदेशक संतोष थोरात, विजयकुमार भोसले, सुजित जाधव, प्राचार्य आकाश गवई, विद्यार्थी तसेच रुग्णालयातील कर्मचारी रॅलीत सहभागी होते.



### पाटील यांना मंत्रिपद मिळण्यासाठी केदारलिंगेश्वर मंदिरात महाआरती

**जळकोट, दि.४ डिसेंबर -**

तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून ३६ हजार ७८९ एवढ्या मतांच्या आघाडीने दुसऱ्यांदा भाजपाचा झेंडा फडकवलेले आमदार जगजीतसिंह पाटील यांची महायुती सरकारमध्ये मंत्रीपदावर वर्णी लागण्यासाठी तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामदैवत श्री केदारलिंगेश्वर मंदिरात महाआरती करुन श्री केदारलिंगेश्वराला साकडे घालण्यात आले. जळकोट येथील श्री केदारलिंगेश्वराची सोमवारी सायंकाळी ७ वाजता महाआरती करुन आ. पाटील यांना मंत्रीपद मिळण्यासाठी भाजपाच्या कार्यकर्त्यानी साकडे घातले. या महाआरतीमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती चेअरमन आशिष सोनटक्के, तमन्नाप्पा माळगे, बाळासाहेब पाटील, इरण्णा स्वन्ने, नागनाथ किलजे, अनिल बेडगे, सचिन कदम, हनुमंत अंगुले, शिवा कुंभार, बसवराज स्वामी, पिंटू हासुरे, सुदीप चौधरी, प्रकाश कदम, लक्ष्मण कांबळे, ज्ञानेश्वर पात्रे, तम्मा कुंभार, शिवाजी पालमपल्ले, सुभाष सुतार, सचिन काळे, राम शिरसागर, बालाजी पांचाळ आदि सहभागी झाले होते.

### बंकटराव कदम यांचे निधन

**जळकोट, दि.४ डिसेंबर -**



गावचा दूरदृष्टी ठेवून विकास केलेले तुळजापूर तालुक्यातील जळकोट गावचे माजी सरपंच, तुळजाभवानी शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक माजी संचालक, कुलस्वामिनी सहकारी सूतगिरणीचे संस्थापक माजी संचालक, पार्वती कन्या प्रशालेचे अध्यक्ष, महाराष्ट्र वाचनालयाचे अध्यक्ष बंकटराव विठोबा कदम (वय ८६) यांचे प्रदीर्घ आजाराने राहत्या घरी मंगळवार (दि.३) रोजी निधन झाले. त्यांच्या पत्नी, पश्चात १ भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, पाच मुली, भावजया, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवार (दि.४) रोजी दु.१२.३० वाजण्याच्या सुमारास जळकोट येथील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारवेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# ॲग्रीस्टॅक योजना : शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ घेणे होणार सुलभ

**शेतकऱ्यांना मिळणार विशिष्ट ओळख क्रमांक... १६ डिसेंबरपासून होणार मोहिमेला सुरुवात...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

कृषि क्षेत्रात व डिजीटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने परिणामकारकरित्या लाभ देणे सुलभ व्हावे यासाठी राज्यात ॲग्रीस्टॅक योजना राबविण्यात येत आहे.या योजनेअंतर्गत प्रत्येक गावात सर्व शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक ( फार्मर आयडी ) तयार करण्यात येत आहे.

जिल्ह्यात १६ डिसेंबरपासून यासाठी मोहिम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ मैनक घोष यांनी दिली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या मोहिमेच्या दिवशी उपस्थित राहून आपला शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करून घ्यावा.असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. मैनक घोष यांनी केले आहे. शेतकरी ओळख क्रमांकामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित फायदा होणार आहे. पीएम किसान योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करून लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येणार आहे. यामुळे सर्व पात्र लाभार्थी समाविष्ट करून घेण्यास सहाय्य मिळेल. पिकासाठी कर्ज मिळण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषि इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करून घेण्यात सुलभता राहील. पिक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापनाअंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी सर्वेक्षण करण्यात सुलभता येईल. किमान आधारभूत किंमतीवर खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकेल. शेतकऱ्यासाठी कृषि कर्ज वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणाऱ्या यंत्रणाना कृषि सेवा सहजपणे उपलब्ध करून देता येईल. विविध सरकारी योजनांचा लाभ, कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संचच्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे योजनांचा लाभ वितरीत करण्यामध्ये सुलभता येणार आहे. तसेच लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरणाची आवश्यकता राहणार नाही. शेतकऱ्यांना वेळेवर कृषिविषयक सल्ले, विविध संस्थाकडून संपर्क करण्याच्या संधीमध्ये वाढीसह नाविण्यपूर्ण कार्यक्रमांच्या सफलता प्राप्त होणार आहे.

शेतकऱ्यांनी शासकीय योजनांचे लाभ प्राप्त करुन घेण्यासाठी आपल्या गावात मोहिमेच्या दिवशी शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

#### विविध शासकीय योजनेचा मिळणार लाभ

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच यापुढे प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, नमो योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र काढणे आवश्यक आहे.शेतकरी ओळखपत्रावरील असलेल्या विशिष्ट क्रमांकानुसार शेतकऱ्यांना विविध योजनेचा लाभ मिळणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन ॲग्रीस्टॅक या ॲंपवर अर्ज करता येणार आहे.

## किसान क्रेडिट कार्ड मत्स्य व्यवसाय धारकांसाठी संजीवनी ठरणार : पटेल




> मत्स्यमार व व्यवसाय करणाऱ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. सध्या किसान क्रेडिट कार्ड नोंदणी करीता जनसमर्थ पोर्टल मध्ये नोंदणी करण्यात येत आहे. याचा भविष्यात मत्स्यमार करणाऱ्यांना फायदा होणार आहे.
> **- अजिक्य देवकते,** (सहायक मत्स्यव्यवसाय अधिकारी)

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ डिसेंबर -**

किसान क्रेडिट कार्ड हे मत्स्यमारांस मत्स्यव्यवसाय करणाऱ्यासाठी संजिवणी ठरणार आहे. असे प्रतिपादन जलील पटेल सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय अधिकारी यांनी केले आहे.

कळंब शहरातील पत्रकार भवन येथे सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय धाराशिव व जिल्हा अग्रणी बँक एसबीआय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने देश व्यापी किसान क्रेडिट कार्ड मेळावा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय अधिकारी जलील पटेल, सहायक मत्स्यव्यवसाय अधिकारी अजिंक्य देवकते, लक्ष्मण उमाप, शितलकुमार घोंगडे, शिवाजी सीरसट (आरपीआय तालुकाध्यक्ष) आदी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय अधिकारी जलील पटेल म्हणाले की, मत्स्य व्यवसायाला सामाजिक व आर्थिक विकासात महत्त्वाचे स्थान आहे. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती आणि उत्पन्नांसोबतच प्रथिनयुक्त व पोषक अन्न पुरवठा होतो.

मासळी निर्यातीद्वारे परकीय चलनात वाढ होते. हे सारे खरे असले, तरी पारंपरिक मच्छीमार समुदाय आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटात असून, त्यांच्यामध्ये आर्थिक व सामाजिक सुधारणांसाठी शासकीय पातळीवर विविध योजना केंद्र व राज्य सरकारच्या वतीने राबविल्या जात आहेत.

बँका या मत्स्य व्यवसाय करणाऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करतात.

त्यामुळे सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय धाराशिव व जिल्हा अग्रणी बँक एसबीआय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने देशव्यापी किसान क्रेडिट कार्ड मेळावे घेण्यात येत आहे.

या मध्ये मत्स्यमार व व्यवसाय करणाऱ्यांची नोंदणी करुण प्रमाणपत्र देण्यात येत आहे, असे प्रतिपादन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय अधिकारी जलील पटेल यांनी केले आहे.

या वेळी तालुक्यातील मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेचे सभासद मासे विकी करणारे मत्स्यव्यवसायीक उपस्थीत होते.

## घरकुलाच्या हप्त्यासाठी लाच मागणारा अभियंता जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

लोहारा तालुक्यात घरकुलाचा हप्ता देण्यासाठी ३ हजारांची लाच घेताना सोमवारी दुपारी लोहारा पंचायत समितीतील गृहनिर्माण अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून अटक केली.

लोहारा तालुक्यातील लाभार्थीने घरकुलाचे बांधकाम सुरू केले. मात्र यासाठी टप्प्याने अनुदान देण्यात येत असते. पहिल्या हप्त्याचे अनुदान मिळाल्यानंतर लाभार्थीने दुसरा ४५ हजारांचा हप्ता मिळवण्यासाठी प्रस्ताव सादर केला.

यावेळी पंचायत समितीचा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता निखिल लिंबराज मस्के (२८, भीमनगर, मुरूम, ता. उमरगा) याने मंजूर घरकुलाचे दुसऱ्या हप्त्याचे बिल ४५ हजार मंजूर होण्याकरिता बांधकामाचे फोटो व त्याबाबत ऑनलाइन रिपोर्ट पंचायत समितीत जमा केल्याचा मोबदला म्हणून ५ हजारांची लाच मागितली.

तडजोडीनंतर हजारांची लाच ३ रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. लाच रक्कम पंचासमक्ष स्वतः स्विकारली. त्याला रंगेहाथ पकडले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक विकास राठोड यांच्या पथकाने ही कारवाई केली. पोलिस उपाधीक्षक सिद्धाराम म्हेत्रे यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

पोलिस अंमलदार मधुकर जाधव, विशाल डोके, जाकीर काझी, चालक दत्तात्रय करडे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## खडी केंद्र, हॉट मिक्सिंगमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ डिसेंबर -**

नळदुर्ग शहरालगत सुरु असलेल्या खडी केंद्र व हॉट मिक्सिंग प्लांटमुळे या भागातील शेतीसह नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असुन जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ हे खडी केंद्र आणि हॉट मिक्सिंग प्लांट बंद करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहे.

येथील कांही शेतकऱ्यांनी शहरालगत सुरु असलेल्या खडी केंद्र व हॉट मिक्सिंग प्रकरणी शासनाच्या गौणखणिज, महसुल व इतर विभागाकडे एक महिन्यापुर्वी तक्रार अर्ज दिला आहे. मात्र आजपर्यंत प्रशासनाने यासंदर्भात कुठलीच कारवाई केली नाही.

याठिकाणी वारंवार होत असलेल्या ब्लास्टिंगमुळे या परीसरातील नागरीकांना याचा कमालीचा त्रास होत आहे. त्याचबरोबर खडी केंद्राशेजारील शेतातील पिकामध्ये धुलिकन जाऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे रात्री अपरात्री याठिकाणी ब्लास्टिंग करण्यात येत असल्यामुळे या परीसरात राहणाऱ्या नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

महसुल विभागाकडे याबाबत तक्रार केल्यानंतरही महसुल विभाग यासंदर्भात कारवाई करण्यास टाळाटाळ का करीत आहे.

## लातूर-मुंबई सुपरफास्ट, बिदर- सीएसटी एक्स्प्रेस रेल्वेच्या बोगींमध्ये वाढ

**सततच्या पाठपुराव्यास यश; खासदार ओम राजेनिंबाळकर यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**



धाराशिव, लातूर, उदगीर परीसरातील नागरीकांची मागील अनेक वर्षापासूनची प्रलंबीत मागणी अखेर रेल्वे मंत्रालयाकडून मान्य करण्यात आली आहे. धाराशिव येथील रेल्वे प्रवाश्यांना तिकीट काढून ही साधारणतः १० ते १५ दिवस प्रतीक्षा यादीमध्ये थांबावे लागत होते. यामुळे प्रवाश्यांची गैरसोय दूर करण्यासाठी लातूर ते मुंबई सूपरफास्ट व बिदर ते छत्रपती शिवाजी महाराज सूपर फास्ट रेल्वेगाडीच्या डब्यांच्या संख्येत वाढ करण्यात आली आहे. यासाठी मागील अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्यास यामुळे यश आले असल्याची माहिती खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिली आहे.

लातूर ते मुंबई व बिदर ते मुंबई या दोन रेल्वेगाड्यांना प्रवाशांची असलेली गर्दी पाहता त्या तुलनेत रेल्वेचे डबे कमी पडत असल्याने वेटींगची यादी दहा ते पंधरा दिवसांवर जात होती. त्यामुळे या रेल्वेगाड्यांच्या डब्यांची संख्या वाढवावी अशी मागणी प्रवाशांतून होत होती. या पार्श्वभूमीवर खा. ओमराजे हे आपल्या मागील टर्मपासून तब्बल पाच वर्षापासून पाठपुरावा करत होते.




यासाठी त्यांनी पुणे येथे झालेल्या चार ते पाच बैठकांमध्ये ही हा मुद्दा सातत्याने उपस्थित करून प्रवाशांची गैरसोय दूर करण्याची मागणी केली होती. तसेच सातत्याने या विषयाचा पाठपुरावा केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केला होता. अखेर या पाठपुराव्यास यश आले असून वरील दोन्ही रेल्वे गाड्यांना अतिरिक्त डब्बे जोडले जाणार असल्याचे पत्र रेल्वे विभागाकडून प्रकाशित करण्यात आले आहे. यामध्ये वरील दोन्ही डब्यांना अतिरिक्त डब्बे जोडण्यात येत असल्याचे पत्र रेल्वे विभागाकडून काढण्यात आले आहे. या निर्णयामुळे धाराशिव व लातूर जिल्ह्यातील रेल्वे प्रवाश्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## जिल्ह्याचा कायापालट करण्याची क्षमता असलेले प्रकल्प देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे वेगाने मार्गी लागणार

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांचा विश्वास...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प आणि योजनांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मोठी गती मिळालेली आहे. त्यांच्यामुळेच कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी तुळजाभवानी देवीच्या पावन नगरीत दाखल होण्याचा मार्ग प्रशस्त झाला. पुन्हा एकदा राज्याच्या नेतृत्वाची धुरा देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आल्यामुळे जिल्ह्याचा कायापालट करण्याची क्षमता असलेले सर्व विषय आता आणखी वेगाने मार्गी लागतील असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ गटनेतेपदी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाली. त्यामुळे त्यांच्या मुख्यमंत्री पदावर शिक्कामोर्तब झाले. त्यानंतर आमदार पाटील यांनी जिल्ह्याशी निगडीत असलेल्या अनेक महत्वपूर्ण प्रकल्प आणि योजनांसाठी आपल्याला अधिक बळ मिळणार असल्याचे स्पष्ट केले.



२३ वर्षांपूर्वी डॉ. पद्मसिंह पाटील साहेबांनी आपले राजकीय वर्चस्व पणाला लावून कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाला मंत्रिमंडळाची मंजुरी मिळवून घेतली होती. महायुती सरकारने त्यासाठी ११ हजार ७०० कोटी रुपयांची सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली. आपल्या जिल्ह्यातील आठही तालुक्यातील सिंचन क्षेत्रात त्यामुळे भर पडणार आहे. डॉ.पद्मसिंह पाटील साहेबांनी सुरु केलेल्या या कामाच्या पूर्णत्वाची जबाबदारी आपली आहे. त्याला देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदामुळे मोठी ताकद मिळणार आहे. नळदुर्ग येथील राज्यातील पहिली भव्यदिव्य बसवसृष्टी, हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांचे स्मारक, तुळजापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे भव्य स्मारक अशा अनेक कामांना आता गती मिळणार आहे.

महाजनादेश यात्रेदरम्यान २०१९ साली मुख्यमंत्री पदावर असताना देवेंद्र फडणवीस यांनी कौडगाव एमआयडीसीत देशातील पहिला स्वतंत्र टेक्निकल टेक्स्टाईल पार्क जाहीर केला होता. महायुती सरकारच्या काळात एमआयडीसीमार्फत तो साकारण्याचा निर्णयही झाला आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यासाठी महत्वाकांक्षी असलेल्या या प्रकल्पाचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे. तामलवाडी येथील औद्योगिक वसाहतीचा निर्णयही लवकरच अमलात येईल. देशात ७५ नवीन वैद्यकीय महाविद्यालये उभारण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला होता त्यात धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा समावेश देवेंद्रजीमुळे झाला होता. या महाविद्यालयाच्या जागेचा प्रश्न व जिल्ह्यातील महत्वाचे प्रकल्प फडणवीस यांच्यासह एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या सहकार्याने मार्गी लागले आहेत. या ठिकाणी एक अद्ययावत वैद्यकीय संकुल निर्माण करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच शब्द दिलेला आहे. आता धाराशिवकरांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयाचे स्वप्न देखील लवकरच पूर्णत्वास येणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

#### तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून रोजगार निर्मिती

तिरुपती देवस्थानच्या धर्तीवर तुळजापूर शहरातही धार्मिक पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीच्या दृष्टीने सुरु केलेल्या प्रयत्नांना आता बळ मिळाले आहे. रेल्वेमुळे अर्थकारणाला गती मिळणार आहे.पुढील २२ महिन्यात तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर येणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीत १३२८ कोटी रुपयांच्या तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास यापूर्वीच मंजुरी देण्यात आलेली आहे. अंतिम विकास आराखडा उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यात आला आहे. फडणवीस यांच्या नेतृत्त्वामुळे लवकरच त्याला मान्यता मिळेल असा विश्वासही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

▶▶ क्राईम वृत्त...



## बावी आश्रम शाळेत जागतिक दिव्यांग दिन साजरा

**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

वसंत प्राथमिक जवाहर माध्यमिक व जवाहर कनिष्ठ महाविद्यालय विद्यानगर बावी येथे जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य दयानंद मनोहर राठोड पर्यवेक्षक साकळे बी.एस. देशमुख ए.आर. यांच्या हस्ते दिव्यांग विद्यार्थ्यांना रजिस्टर पेन व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कांबळे के.डी. यांनी जागतिक दिव्यांग दिनाचे महत्त्व सांगताना दिव्यांग शरीराने असले तरी बुद्धीने नाही त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचा मानसन्मान करा असे संबोधन करत सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले शेवटी प्रा. विनोद राठोड यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



## महाराजा यशवंतराव होळकर यांची जयंती साजरी

**तेर, दि.४ डिसेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील ग्रामपंचायत कार्यालयात महाराजा यशवंतराव होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रविण बंडे, केशव सलगर, अशपाक शेख, विठ्ठल कोकरे, अविनाश खांडेकर, वैभव डीगे, बाळासाहेब रसाळ, विजय कानडे, अप्पा काळे,बापू नाईकवाडी, नामदेव कांबळे, अमोल कसबे, तानाजी पिंपळे, सचिन देवकते आदी उपस्थित होते.



## राणाजगजीतसिंह पाटील मंत्री व्हावेत म्हणुन ढोणेश्वर बाबांना साकडे

**शिराढोण, दि.४ डिसेंबर -**

राणाजगजीतसिंह पाटील मंत्री व्हावेत म्हणून कळंब तालुक्यातील शिराढोणचे ग्रामदैवत ढोणेश्वर बाबांना साकडे घालण्यात आले या वेळी गावकऱ्यांच्या वतीने मंदिरात म हाआरतीच्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी किरण पाटील, पवन म्हेत्रे, सुरेश महाजन, विकास कोंडेकर अतुल माळी, चंद्रकांत सुडके, झेलम शिंपले, अनिल पांनढवळे, विश्वासराव पाटील, सतीश संगवे, दीपक पाटील बिट्टू पांचाळ, तुषार सहाने, किशोर सहाने, अनिल गायसमुद्रे, जनार्दन महाजन, राजाभाऊ पाटील सरपंच नायगाव, महेश काळे सौदानांबा, सर्जेराव पाटील, परमेश्वर पाटील, दिलीप ठाकूर व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# विहिरीत पडलेल्या ‘सायाळ’ला प्राणी प्रेमींकडून जीवनदान

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ डिसेंबर -**

दोन दिवसापासून कळंब शहराजवळील शेतातील विहिरीत पडलेल्या सायाळ (साळींदर) या वन्यजीव प्राण्याला कळंब येथील पक्षप्रेमी नागरिक यांनी वनविभाग कर्मचाऱ्यांशी संपर्क केला व दि.३ नोव्हेंबर रोजी सतत दोन तास प्रयत्न करून वन विभाग कर्मचारी व व त्यांचे सहाय्यक यांनी सायाळला विहिरीच्या वरती काढण्यात यश आले.

याबाबत माहिती अशी, कळंब-हावरगाव. रस्त्यावरील व कळंब शहराच्या लगत ओढ्या काठी संदिपान करंजकर यांची शेती आहे करंजकर आपल्या शेतातील विहिरीवरील मोटार चालू करण्यासाठी २ नोव्हेंबर रोजी गेले असता त्यांना विहिरीत पडलेला सायाळ पक्षी आढळून आला. विहीर पन्नास फूट खोल असून विहिरीत उतरण्यासाठी पायऱ्या नाहीत. यामुळे या पक्षाला वरती कसे काढायचे हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्यांनी या विषयाची माहिती कळंब येथील प्राणीप्रेमी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ व सामाजिक कार्यकर्ते माधवसिंग राजपूत यांना दिली. आडसूळ यांनी सायाळला वाचविण्यासाठी काय करता येईल याविषयी माहिती घेतली व भूम येथील वनविभाग कार्यालयाशी संपर्क केला.दि.३ नोव्हेंबर रोजी या कार्यालयाचे वन क्षेत्रपाल दत्तात्रेय फरताडे यांच्याशी संपर्क झाला व या कामासाठी वनमजूर कालिदास जाधव व त्यांचे सहाय्यक सुरेश चव्हाण व प्रकाश चव्हाण पोहोचले.



कमरेला दोर बांधून विहिरीत उतरून सतत दोन तास प्रयत्न केल्यानंतर ३६ तास विहिरीत अडकून पडलेल्या या प्राण्याला विहिरीच्या बाहेर काढण्यात यश आले. यानंतर येडशी येथील अभयारण्यात सोडण्यासाचा निर्णय घेण्यात आला.



## चारित्र्यावर संशय; महिलेची आत्महत्या : पतीविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

एक वर्षापासून दिल्या जाणाऱ्या जाचास कंटाळून विवाहितेने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. आत्म हत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी येरमाळा पोलिस ठाण्यात १ डिसेंबर रोजी पतीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

भूम तालुक्यातील राळेसांगवी येथील अर्चना ऊर्फ सोनाली दिलीप जाधव (२५ वर्षे) यांनी ३० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ ते रात्री १० वाजेच्या सुमारास राळे सांगवी येथील शिवाजी हनुमंत जाधव यांच्या शेतातील विहिरीमध्ये उडी मारून पाण्यात बडून आत्महत्या केली. आरोपी पती दिलीप सोमनाथ जाधव (रा. राळे सांगवी) यांनी अर्चना हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन मागील एक वर्षापासून जाच केला जात होता.

पतीच्या जाचास व मानसिक त्रासास कंटाळून अर्चना यांनी आत्म हत्या केली आहे. याप्रकरणी करम ाळा (जि. सोलापूर) तालुक्यातील फिसरे येथील मयताची आई फुलाबाई अभिमान पवार यांनी १ डिसेंबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम- १०८, ८५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## आरोग्यवर्धिनी केंद्राच्या वेळेत बदल; दुपारी १२ ते रात्री ८ वाजतापर्यंत सुरू राहणार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

पंधराव्या वित्त आयोगाअंतर्गत जिल्हयात मंजूर असलेल्या २२ शहरी आरोग्यवर्धिनी केंद्र आणि ५ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांचे रुग्णालयीन कामकाजाच्या वेळेम ध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.




शहरी आरोग्यविर्धीनी केंद्राची पुर्वीची वेळ ही दुपारी २ ते रात्री १० वाजतापर्यंत होती. आता सुधारित वेळ ही दुपारी १२ ते रात्री ८ वाजतापर्यंत असणार आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाची पुर्वीची वेळ ही दुपारी २ ते रात्री १० वाजतापर्यंत होती. आता सुधारित वेळ ही दुपारी १२ ते रात्री ८ वाजतापर्यंत असणार आहे.

वरील सुधारीत वेळापत्रक ९ डिसेंबर २०२४ पासुन लागू करण्यात येणार आहे.

धाराशिव जिल्हयातील नागरिकांनी व रुग्णांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटीचे सदस्य सचिव डॉ. सतीश हरिदास यांनी केले आहे.

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या डिजिटल मीडिया विंगचा पदग्रहण सोहळा

**धाराशिव :** जगभरातील ४७ देशात पत्रकारांचे संघटन करून पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर आवाज उठणाऱ्या व्हॉईस ऑफ मीडियाच्या डिजिटल विंगच्या जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा पदग्रहन सोहळा शासकीय विश्राम गृहात नुकताच पार पडला.

यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षद लोहार, राज्य खजिनदार प्रवीण पावले, धाराशिव व्हॉईस ऑफ मीडियाचे प्रमुख जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, प्रसिद्धी प्रमुख सलीम पठाण, जिल्हा कार्यवाहक कुंदन शिंदे, डिजिटल विंगचे जिल्हाध्यक्ष जुबेर शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

## धाराशिव शहरात श्री दत्तगुरू जन्मोत्सव सप्ताह सोहळ्याचे आयोजन

### गुरूचरित्र पारायण, भजन, कीर्तन, पालखी सोहळ्यासह भरगच्च कार्यक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

त्रिलोक्याचे स्वामी भगवान श्री दत्तगुरूंच्या जन्मोत्सवानिमित्त धाराशिव येथे श्री दत्तगुरू जन्मोत्सव गुरूचरित्र पारायण- भजन-कीर्तन श्री दत्तनाम सप्ताह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताह सोहळ्यानिमित्त ९ ते १५ डिसेंबर या कालावधीत विविध भरगच्च कार्यक्रम होणार आहेत.

पिताश्री श्रीमंतराव रणदिवे प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी देखील श्री दत्तगुरू निवास, शांतिनिकेतन कॉलनी, धाराशिव येथे सप्ताह सोहळा घेण्यात येत असून सप्ताह सोहळ्याचे हे १० वे वर्ष आहे. श्री तुळजाभवानी देविजींचे महंत प.पू. तुकोजी बुवा, हभप आप्पाबाबा महाराज रुईकर, हभप नवनाथ महाराज चिखलीकर यांच्या हस्ते सोमवार दि.९ डिसेंबर रोजी श्री दत्तगुरूंच्या प्रतिमेचे पूजन करून या सप्ताह सोहळ्याचा शुभारंभ होणार आहे. सोमवारी (दि.९) सायंकाळी संगीत विशारद समाधान निचळ, श्रीकांत शिंदे, मंगळवारी (दि.१०) भजनसम्राट शिवकुमार मोहेकर तर बुधवारी (दि.११) सायं. ६.३० वा. तानसम्राट अजित कडकडे यांचा भजनसंध्याचा कार्यक्रम होणार आहे. गुरूवारी (दि.१३) सायं. ७ वा. गायनाचार्य योगेश इंगळे तर शुक्रवारी (दि.१७) साय. ६.३० वा. गायक दिलीप सावंत यांची सेवा होणार आहे. सप्ताह सोहळ्यात दररोज दुपारी महिला भजनी मंडळाची भजनसेवा होणार आहे. सोमवारी (दि.९) म ुक्ताई मंडळ गांधीनगर, मंगळवारी (दि.१०) सखी भजनी मंडळ यशवंत नगर, बुधवारी (दि.११) संत जनाबाई मंडळ शांतिनिकेतन कॉलनी, गुरूवारी (दि.१२) रुक्मिणी भजनी मंडळ बँक कॉलनी, शुक्रवारी (दि.१३) गजानन भजनी मंडळ गणेशनगर तर शहरातील जिजाऊनगर येथील जिजाऊ भजनी मंडळाची भजन सेवा शनिवारी (दि.१४) दुपारी होणार आहे. श्री दत्तगुरूंच्या जन्मोत्सवदिनी रविवारी (दि.१५) स. ८ वा. पालखी दिंडी सोहळा, स. १०.३० वा. हभप महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे काल्याचे कीर्तन, दु. १२ वा. श्रींचा जन्मोत्सव सोहळा व दु. १.३० वा. महाप्रसाद वाटप करून सप्ताह सोहळ्याची सांगता होणार आहे.



## छत्रपती शिवाजी हायस्कूलचे प्राचार्य पाटील यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य पी. एन. पाटील यांचा नियत वयोम ानानुसार सेवानिवृत्त झाल्याने संस्था व प्रशालेचे वतीने त्यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षा शशिकलाताई घोगरे या होत्या.

संस्थेचे कार्याध्यक्ष एम.डी. देशमुख, उपाध्यक्ष ॲड. अविनाशराव देशमुख, सचिव भाई धनंजय पाटील, सत्कारमूर्ती प्राचार्य पी.एन. पाटील त्यांच्या पत्नी वैशाली पाटील, माजी प्राचार्य पी.एन. चव्हाण, माजी प्राचार्य भास्करराव देशमुख, माजी उपप्राचार्य एन.बी. ताटे, माजी पर्यवेक्षक एस.के. मुंडे, माजी उपमुख्याध्यापक एन.एम. देटे, नूतन प्राचार्य बाळासाहेब मुंडे, उपप्राचार्य व्ही.के. देशमुख, पर्यवेक्षक प्रा.ए.के. दीक्षित, मुख्याध्यापक के.बी. घोडके आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रसंगी सुमारे ३२ वर्ष सेवत अध्यापन, पर्यवेक्षक, उपप्राचार्य, प्राचार्य अशी सेवा शिक्षण क्षेत्रात पूर्ण केल्यामुळे सेवानिवृत्ती निमित्त पूर्ण पेहराव, शाल बुके, सन्म ानपत्र, सन्मानचिन्ह व भेट वस्तू देऊन पी.एन. पाटील यांचा सपत्नीक सत्कार संस्था पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षा शशिकलाताई घोगरे, एम.डी. देशमुख, ॲड. अविनाशराव देशमुख, भास्करराव देशमुख, दिलीपराव पाटील, धनंजय पाटील, पी.एन. चव्हान, व्ही.के. देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## विश्वनाथ तोडकर यांचा ६१ वा जन्मदिवस विविध उपक्रमाने साजरा



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.४ डिसेंबर -**

समाजसेवेची नवी दिशा दाखवणारे ज्येष्ठ समाजसेवक आणि पर्याय संस्थेचे संस्थापक सचिव विश्वनाथअण्णा तोडकर यांचा ६१वा वाढदिवस पर्याय संस्था हसेगाव के. (ता. कळंब) येथे दि.१ डिसेंबर रोजी विविध सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात आणि सामुदायिक भावनेने साजरा करण्यात आला, ३०० एकल महिलांना साडी वाटप करून याठिकाणी भाऊबीज साजरी करून त्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच जमा झालेल्या सामाजिक कार्यकर्त्यांनी रक्तदान केले.

समारंभाची सुरुवात आरोग्य शिबिराने सकाळी पर्याय प्रशिक्षण केंद्रात एकल महिलांसाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.

महिलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याचा आढावा घेण्यासाठी विविध तपासण्या व सल्ला सत्रे घेतली गेली. यामध्ये हृदयविकार, मधुमेह, रक्तदाब, आणि अन्य आजारांसाठी तपासणी करण्यात आली. डॉ. हर्षदा पटकुरे (तोडकर) यांनी या शिबिराचे नेतृत्व केले.

महिलांसाठी आरोग्याची काळजी घेण्यासाठी अशा प्रकारचे शिबिर आयोजित केल्याबद्दल त्यांनी अण्णांचे मनापासून आभार मानले.

आरोग्य शिबिरानंतर एकल महिलांसाठी साडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रत्येक महिला सन्मानास पात्र आहे, या विचारातून अण्णांनी या उपक्रमाची सुरुवात केली. साडी वाटप सोहळ्यात शेकडो महिलांनी सहभाग घेतला.

यावेळी महिलांनी आपला सन्मान आणि आदर प्रकट करत अण्णांच्या सामाजिक बांधिलकीबद्दल कौतुक केले. धाराशिव-कळंब मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील यांनी अण्णांच्या कार्याची स्तुती करताना सांगितले, की विश्वनाथअण्णांचे योगदान केवळ एकल म हिलांसाठीच मर्यादित नाही, तर त्यांनी समाजातील प्रत्येक उपेक्षित घटकासाठी आधारस्तंभाची भूमिका निभावली आहे. त्यांचे नेतृत्व समाजसेवेत क्रांतिकारक ठरले आहे.

सायंकाळी मुख्य समारंभ संपन्न झाला. महाराष्ट्रातील विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मान्यवर आणि अण्णांचे कुटुंबीय या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## अनधिकृत पवनचक्कीविरुद्ध पायबंद करा : रोचकरी



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.४ डिसेंबर -**

पवनचक्की रिन्युव्ह कंपनी यांनी तुळजापूर तालुक्यातील गावात अनधिकृत पवनचक्की बसवत असून, शेतकऱ्यास दमदाटी करून मावेजा न देता चुकीचा पद्धतीने गुंड लोकांकडून दमदाटी करून जमीन बळकावत आहेत. अशा लोकांचा पायबंद करावा. अन्यथा उपोषण करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते विशाल रोचकरी यांनी एका लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

धाराशिवचे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या लेखी निवेदनात विशाल रोचकरी यांनी म्हटले आहे की, ठिकाणचा राहणार असून तुळजापूर येथे दि.२९ नोव्हेंबर रोजी मला मेसाई जवळगा येथील जमीन धारकांचा शेतात रिन्युव्ह कंपनी पवनचक्कीधारक हे अनधिकृत शेतात येऊन त्रास देऊन, त्यांना जीवे मारण्याची धमकी देत आहेत.

याबाबत योग्य चौकशी होऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा. त्या लोकांविरुद्ध अनधिकृत शेतात घुसून व दमदाटी करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या विरुद्ध योग्य ती कारवाई करून त्यांना पायबंद करावे. अन्यथा उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## परंडा तालुक्यातील बिबट्याचा बंदोबस्त करा : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ डिसेंबर -**

परंडा तालुक्यातील मागील १५ ते २० दिवसापासून बिबटयाचा वावर असून आतापर्यंत अनेक जनावरांना ठार केले आहे. बिबटयाच्या वावरामुळे पशुपालक व शेतकऱ्यांम ध्ये भितीचे वातावरण आहे. तसेच सध्या शेतकरी रब्बी हंगाम ातील पिकांना पाणी देण्यासाठी रात्री अपरात्री शेताकडे जात असल्याने त्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे.

शेतकरी, शेतमजुर व पशुपालक यांची मोठी आर्थीक हानी बिबटयाच्या हल्ल्यामुळे होत असल्याने खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी जिल्हाधिकारी यांना अन्य वन कर्मचारी उपलब्ध करुन सदर बिबटयाचा तात्काळ बिबटयाचा बंदोबस्त करणेबाबत जिल्हाधिकारी यांना पत्राव्दारे सुचना देण्यात आली आहे.

## राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम आरोग्य संस्थांची तपासणी पूर्व कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ डिसेंबर -**

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाअंतर्गत जिल्हयातील एकुण १० प्राथमिक आरोग्य केंद्राची केंद्र शासनाने नेमलेल्या पथकाकडून तपासणी करण्यात आली व त्यांना राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट आरोग्य संस्था म्हणुन प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाअंतर्गत रुग्णांना देत असलेल्या आरोग्य सेवा या शासनाने वेळोवेळी दिलेल्या म ार्गदर्शक सुचनांचा अवलंब करुन देण्यात याव्यात तसेच त्याचे सर्व कामकाजाचे अहवाल अदयावत ठेवण्यात यावेत.रुग्णालयीन अंतर्गत व परिसर स्वच्छता ठेवण्यात यावी. यासह इतरही बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

सर्व प्रथम संस्थास्तरावर संबंधित संस्था प्रमुख आपल्या आरोग्य संस्थेची चेक लिस्टनुसार तपासणी करतात.

त्यामध्ये काही त्रुटी असल्यास संस्था प्रमुख त्रुटीची पुर्तता करण्यासाठी तालुकास्तर आणि जिल्हास्तरावरुन अधिकाऱ्यांची म दत घेऊन त्याची पुर्तता करतात. ही गुणवत्ता टिकून राहण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष यांचे मोलाचे सहकार्य संबंधित संस्थांना मिळत आहे.

त्यानंतर राज्यस्तरावरुन नेमण्यात आलेल्या पथकामार्फत तपासणी करण्यात येते. त्यामध्ये आरोग्य संस्थांचे कामकाज उत्कृष्ट असल्यास त्यांची शिफारस केंद्र शासनाने नेमणुक केलेल्या पथकामार्फत तपासणी करण्यासाठी केली जाते.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये उर्वरीत एकुण १३ प्राथमिक आरोग्य केंद्र, ६१ आरोग्य उपकेंद्र व १ स्त्री रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय ४, ग्रामीण रुग्णालय ७ या निवड करण्यात आलेल्या संस्थांची तपासणी पुर्व कार्यशाळा टाटा सामाजिक संस्था तुळजापुर येथे जिल्हा परिषदेचे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, छत्रपती संभाजीनगर येथील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र प्राचार्य डॉ. संतोष कडले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर व टाटा सामाजिक संस्था तुळजापूरचे संचालक डॉ. बाळकृष्ण राक्षसे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

या कार्यशाळेसाठी जिल्हास्तरीय अधिकारी डॉ. कुलदिप मिटकरी जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी, डॉ. शिवाजी फुलारी निवासी वैद्यकिय अधिकारी (बाह्य संपर्क), डॉ. दिपक मेंढेकर, वैद्यकिय अधिकारी, जिल्हा प्रशिक्षण संघ धाराशिव, डॉ. रफिक अन्सारी, किशोर गवळी, किरण बारकुल, शरद हिंगमिरे, किशोर तांदळे व जिल्हयातील वैद्यकिय अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी समुदाय आरोग्य अधिकारी, औषध निर्माण अधिकारी तसेच आरोग्य सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## कन्नड घाट परिसरात दरवळतोय मोगऱ्याचा मंद सुगंध





तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि .४. डिसेंबर- कन्नड तालुका डोंगराळ भाग म्हणून प्रसिद्ध असुन वनसंपदेने नटलेला असल्याने सध्या डोंगरदऱ्या मधून रानमोगरा मोठ्या प्रमाणात फूलून आला आहे.घाटातुन येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना नैसर्गिकरीत्या दोन्ही बाजूंनी फुललेल्या पांढऱ्या शुभ्र फुलांच्या हिरव्यागार जाळ्या सर्वांचे स्वागत करत आहे असा च भास होतो, सुंगधाची मोठी उधळण करत रानमोगरा मोहीत केल्याशिवाय राहत नाही.

मनुष्य कितीही धावपळीचे जीवन जगत असला तरी निरोगी जीवनासाठी,मनःशांती साठी निसर्गासारखा कोणीही मित्र नाही. ऋतुनुसार बदललेला निसर्ग बदल हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. उन्हाळ्यातील रखरखीत उष्ण वातावरणातही स्थितीप्रज्ञा प्रमाणे उन्हाची काहीली सोशल्यानंतर पावसाळ्यात नव्याने निसर्ग उमेदीने फुलून येतो,बहरून येतो आणि मनाला अक्षरशः वेडावून टाकतो. निसर्गाच्या या अवीट सौन्दर्यांची प्रचिती कन्नडच्या डोंगर रांगांमधून जागोजागी येते.सध्या परिसरातून आणि डोंगरदऱ्या मधून रानमोगरा मोठ्या प्रमाणावर फुलून आला असून कन्नडकडे जातांना हस्ता मेहगाव कोळसवाडी घाटात रस्त्याच्या दोन्ही बाजुने रान मोगरा चांगलाच फुलला असून घाट सुरूवात ते संपेपर्यंत तीन ते चार किलोमीटर पर्यंत मोठ्या प्रमाणात सुगंध दरवळत येणाऱ्या जाणांऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. कन्नड तालुका डोंगराळ भाग म्हणून प्रसिद्ध आहे.

विस्तीर्ण गौताळा अभयारण्याचा मोठा भाग कन्नड तालुक्यात असून विविध जैवसंपत्ती आणि वृक्षराजीने हा भूभाग संपन्न आहे. वृक्षराजी सोबत सध्या गौताळा अभयारण्यासह सर्वत्र रानमोगरा मोठ्या प्रमाणावर फुलल्याचे दिसून येत आहे.खरे तर हा मोगरा काही वर्षांपूर्वी पर्यंत शेतांच्या बंधाऱ्यावर झाडाझुडपांवर सर्वत्र वाढलेला दिसत असे.परंतु तननाशकाचा अतिवापर सुरू झाल्याने थेट बंधाऱ्यावर दिसणारा हा रानमोगरा आता डोंगरदर्यापर्यंत सिमीत झाला असल्याचं जाणवते आहे.नाचनवेलहून कन्नड जाताना गौताळा अभयारण्याचा परिसर सुरू होताच सकाळ संध्याकाळ इतका सुंदर सुगंध असतो की अनेक जण गाड्या थांबून या दृश्याचा आनंद आपल्या कॅमेरा मधे बंद करत असतात.या परिसरातून प्रवास करत असताना नैसर्गिकरित्या दोन्ही बाजूंनी फुललेल्या मोगऱ्याच्या जाळ्या सर्वांचे जणू स्वागत करत आहेत असा भास होतो आहे.

## राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रम; बालकांची होणार आरोग्य तपासणी




छत्रपती संभाजीनगर,दि.४ (जिमाका)- अंगणवाडी व शाळास्तरावर ० ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत असून तपासणीअंती गंभीर आजार आढळल्यास तात्काळ संदर्भित करण्याचे निर्देश असून याबाबत आज आरोग्य यंत्रणेचा आढावा घेण्यात आला.

देवगिरी महाविद्यालयातील गुरुदेव रविंद्रनाथ टागोर सभागृहात आज हा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बढे व सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच शिक्षणविभागांतर्गत सर्व केंद्र प्रमुख व शिक्षक वर्ग तसेच जिल्हा रुग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडीतील ० ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांची व शालेय विद्यार्थ्यातील १८ वर्ष पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी करुन काही गंभीर आजार असल्यास त्यांना संदर्भित करावे,असे निर्देश देण्यात आले.


## दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात ; गायीच्या दुधाला २६ ते २७ रुपये भाव



तभा वृत्तसेवा

नाचनवेल :दि.४. डिसेंबर- कन्नड गेल्या दीड दोन वर्षापासून गाईच्या दुधाच्या किमतीमध्ये सातत्याने घट होत आहे. तर एकीकडे गायीच्या पशुखाद्याच्या किमतीत सातत्याने वाढ होत आहे. त्यात शासनाकडून मिळणारे अनुदानही वेळेवर मिळत नाही. शेतकऱ्यांचा दैनंदिन चालणारा खर्च दूध उत्पादनावर अवलंबून असतो त्यामुळे दुधाच्या भावात घट झाल्याने शेतकरी हवालदिल झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे. जनावरांसाठी चारे देखील मोठ्या प्रमाणावर विकत घ्यावा लागतो . लाख रुपये किमतीच्या घेतलेल्या गायची किंमत आज बाजारामध्ये पन्नास ते साठ हजार रुपये झाली आहे त्याचे कारण म्हणजे दुधाचे घटत चाललेले भाव. कोरोना काळात देखील दुधाला तीस रुपये पर्यंत भाव होता मात्र आजची परिस्थिती त्यापेक्षाही वाईट असल्याचे मत दूध उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. अनेक शेतकऱ्यांचे जीवन हे दूध उत्पादनावरच अवलंबून आहे. त्यात आमच्या शेतकऱ्यांच्या कोणत्याही मालाला अपेक्षित हमीभाव भाव नसल्याने आमच्या नशिबी नेहमी निराशाच असते त्यातून आमचे बांधव टोकाचे पाऊल उचलतात याला जबाबदार कोण असा देखील प्रश्न दूध उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. आम्ही पेरायचे ,उगवायचे, पिकवायचे आणि त्याचे भाव मात्र निश्चित करण्याचा अधिकार आम्हाला नाही मात्र शेतकऱ्याच्या मालाव्यतिरिक्त सर्वांचे भाव ठरलेले असतात मात्र आम्हा शेतकऱ्यांच्या मालाचा भाव आम्हालाच ठरवता येत नाही हेच या देशातील शेतकऱ्याचे दुर्दैव आहे. आमच्या दुधाला किमान ४० रुपये प्रति लिटर भाव द्यावा अशी मागणी समस्त शेतकरी वर्ग करीत आहे.

## धुळे - सोलापूर महामार्गावर बर्निंग कारचा थरार




वाळूज महानगर : धुळे-सोलापूर महामार्गावर भरधाव जाणाऱ्या एका कारने (क्र. एम एच ४६ झेड ४८८९) करोडी टोलनाक्यालगत अचानक पेट घेतल्याची घटना आज दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास घडली. कार काही वेळातच जळून खाक झाली. सुदैवाने कारमधील चालक आणि अन्य एक प्रवासी वेळीच बाहेर पडल्याने पुढील अनर्थ टळला.

आज दुपारी धुळे-सोलापूर महामार्गावरुन एक कार भरधाव वेगात छत्रपती संभाजीनगरकडे जात होती. करोडी टोलनाक्याच्या पुढे उड्डाणपुलाजवळ कारच्या पुढील भागातून अचानक धुर निघू लागला. धूर दिसताच गाडी बाजूला थांबवत चालक आणि अन्य एक प्रवासी खाली उतरले. त्यानंतर धूर वाढत जात कारने पेट घेतला.

दरम्यान, एमआयडीसी अग्नीशमन विभागाला फोनद्वारे आगीची माहिती देण्यात आली. काही वेळातच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. परंतू तोपर्यंत कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. सदरील घटनेची नोंद अग्निशमन विभागाकडे करण्यात आल्याची माहिती अग्निशमन अधिकारी सारंग वासनिक यांनी दिली.

## शासकीय नियमांची ऐसी तैसी..! वन विभागाचे एकच लक्ष पैसे मोजा, झाडे कापा आणि विका



वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : शासनाने एक कोटी वृक्ष लागवड व वन संवर्धनासाठी मिशन चालवले असतानाही छत्रपती संभाजीनगर वन विभाग मात्र आपल्याच विभागाला सुरुंग लावण्याचे काम करीत आहेत. कोणत्याही जातीचे झाड असो, कितीही असो, पैसे द्या आम्ही परवानगी देतो, कापा, तोडा आणि विका हा एकमेव धंदा सुरू केला आहे. याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील काय? असा प्रश्न वृक्षप्रेमींसह नागरिकांना पडला आहे.

फक्त वाळूज परिसरात गेल्या सहा महिन्यात छत्रपती संभाजीनगर वन विभागाच्या कृपेने जवळपास १००० झाडांची कत्तल करण्यात आलेली आहे. ही संख्या वृक्षप्रेमींमध्ये कमालीची अस्वस्थता निर्माण करीत असली तरी वन विभागाला मात्र त्याचे कोणतेही सोयर सुतक नाही. आमच्याकडे एक लिस्ट आहे, त्यानुसार कागदपत्रे जमा करा, पैसे भरा आणि कोणत्याही जातीचे झाड असो, कितीही मोठे असो खुशाल तोडा असा अलिखित नियमच वन विभागाने करून ठेवला आहे.

५० हजारांचा दंड कागदावरच

नुकताच वन विभागाने एक झाड तोडल्यास किंवा छाटल्यास ५० हजारांचा दंड जाहीर केला होता, या निर्णयाचे स्वागत सामान्य जनतेपासून ते वृक्षप्रेमींनी मोठ्या जल्लोषात स्वागत केले होते, परंतु हा निर्णय लागू झाल्यानंतर वन विभागाच्या कृपेने वाळूज महानगर परिसरात जवळपास ५०० झाडांची कत्तल करण्यात आली.

बजाजगेटजवळील पंपाला झाडाचा अडथळ

बजाज मटेरिअल गेटजवळ विक्रांत कारखान्यासमोरच एका बड्या उद्योगपतींचा नवीन एचपीचा पेट्रोल पंप सुरू होत आहे, त्या पंपाचा मुख्य फलक एका झाडाच्या जागेवर येत असल्याने ते झाड गुपचूप तोडण्याचा सल्ला खुलताबाद वन विभागाचे सुधीर धवन यांनी दिल्याचे पंपावर कार्यरत एका कर्मचार्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

एकाच ठिकाणी ४० झाडांची कत्तल

तीसगाव ते एनआरबी या मार्गावर एक मोठ्या बिल्डरला प्लॉटिंग टाकण्यासाठी तब्बल ४० झाडे तोडण्याचा परवाना याच खुलताबाद वन विभागाने दिला आहे. या झाडांमुळे संपूर्ण परिसर वनराईने हिरवागार दिसत होता; परंतु आता त्याठिकाणी असलेले लिंब, चिंच व इतर जातीचे ४० झाडांची कत्तल करण्याची परवानगी दिल्याने हा परिसर बोडखा करण्यात आला आहे. बिल्डर लॉबीला प्लॉटिंग टाकण्यासाठी अडसर ठरणार्या या ४० झाडांच्या कत्तलीची परवानगी देणार्या कर्मचारी व अधिकार्यांवर वन विभागाच्या वतीने कठोर कारवाई करून बडतर्फ करावे अशी मागणी वन्यप्रेमींकडून होत आहे.

## निवृत्ती वेतन धारकांचे हयात प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी शेवटचे दहा दिवस शिल्लक; सहाशे दहा हयात प्रमाणपत्रे दाखल

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.०४ डिसेंबर - सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना वर्षाच्याकाठी हयात प्रमाणपत्र सादर करावे लागते यंदाच्या वर्षीसुद्धा हयात प्रमाणपत्र नोव्हेंबर पासून दाखल करणे सुरू झाले

जिल्हा परिषद कडून आलेल्या यादीनुसार तालुक्यात आठशे सत्तेचाळीस सेवा निवृत्त कर्मचारी असून त्यांना निवृत्त वेतन सुरू आहे,दि.३० ऑक्टोबर रोजी प्राप्त पत्रानुसार हयात प्रमाणपत्र दाखल करणेसाठी गटविकास अधिकारी कार्यालयात सुरुवात झाली होती पण विधानसभेच्या निवडणुकीमुळे संथ गतीने नोंदणी झाली पण निवडणूक संपताच हयात प्रमाणपत्र नोंदणीस गती मिळाली आहे

आतापर्यंत तब्बल सहाशे दहा निवृत्ती वेतन धारकांना हयात प्रमाणपत्र सादर केली आहे,दवैद्यकीय दृष्ट्या कार्यालयात न येऊ शकणाऱ्या निवृत्त वेतन धारकांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यामार्फत नोंदणी करून घेण्याची सुविधा करण्यात आली आहे, दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी कार्यालयच्या बाहेर जाऊन नोंदणी करण्यात येत असून गटविकास अधिकारी कार्यालयात आत प्रवेश करताच त्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे

त्याठिकाणी ग्रामसेवक आर.आर. गात,ग्रामसेविका एस.बी.बनके,ग्रामसेविका आर.आर.जाधव हे तीन ग्रामसेवक असून ते स्वतः जातीने चौकशी करून नोंदणी करून घेत आहेत

हयात प्रमाणपत्र नोंदणी करून घेण्याची अंतिम तारीख १० डिसेंबर असून राहिलेल्या निवृत्तीवेतन धारकांनी हयात प्रमाणपत्राची नोंद करून घ्यावे असे आवाहन गटविकास अधिकारी कार्यालयातुन करण्यात आले आहे.

## भाजपचे विधिमंडळ गटनेतेपदी फडणवीस यांची निवड; कार्यकर्त्यांकडून जल्लोष



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.४ डिसेंबर : भाजपच्या विधिमंडळ गटनेते पदी देवेंद्र फडणवीस यांची नियुक्ती झाल्याबद्दल व तसेच मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल गंगापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भाजपा व महायुतीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी जल्लोष करून आनंद उत्सव साजरा केला यावेळी भाजपा नेते किशोर धनायत, सभापती भाऊसाहेब पदार, मारुती खैरे, प्रदीप पाटील, भारत पाटील, रामेश्वर गवळी,ज्ञानेश्वर सवई,विजय वरकड, प्रशांत मुळे, राजेंद्र राठोड, अशोक मंत्री, राजू मोरे, संदीप बोजवारे, योगेश चव्हाण, सुमित मुंदडा, जाफर पटेल, उमेश बाराहते, संदीप आळंजकर, नंदू साजगुरे,कृष्णकांत व्यवहारे, अतुल रासकर, दिनेश राऊत, दीपक भालेकर, अमोल शिंदे,ज्ञानेश्वर पवार, भगवान लंगोटे, शिवाचरण राजपूत, युवराज कसबे, भिवचंद कटुळे, गणेश चव्हाण, राहुल सटाले, दीपक साळवे आदी सह भाजपा महायुतीचे सर्व पदाधिकारी, व कार्यकर्ते उपस्थित होते

## जागतिक एड्स दिनानिमित्त पोस्टरद्वारे जनजागृती !




तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.०४ डिसेंबर - जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधत शहरातील बस स्थानकामध्ये पोस्टरद्वारे नागरिकाना जनजागृती अभियान दि.०४ रोजी राबविण्यात आले

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दयानंद मोतीपावळे, वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रवीण पवार,आगारप्रमुख बाळासाहेब राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेरणा सामाजिक संस्था व कन्नड ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानाने पोस्टरद्वारे जनजागृती करण्यात आली,बस स्थानकात प्रवासी,नागरिकांची जनजागृती करण्यासाठी पोस्टर, पॉम्प्लेट देण्यात आले,सकाळी साडे दहा वाजेच्या सुमारास लाल फिती कापून पोस्टर जनजागृती कार्यक्रमची सुरुवात झाली,या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ.सिकंदर कुरेशी,वाहतूक निरीक्षक श्रीराम पवार, हे होते यावेळी समन्वयक संजय सोनवणे,प्रयोगशाळा तंत्रज्ञ शशिकांत गांगुर्डे,प्रेरणा सामाजिक संस्था वैजापूर प्रकल्प समन्वयक साईनाथ बारगळ, बापूराव वाळके, ,मयूर ठोबरे,संजय हिंदोळे,संगीता त्रिभुवन,ग्रामीण रुग्णालयातील नारायण बोहरा,संतोष अकोलकर,विशाल उंडे, शशिकांत गांगुर्डे, संजय सोनवणे, संध्या गवळी, गायत्री गिरी आरिफ शेख, विशाल भोसले, विद्यासागर काशीद, आदींची उपस्थिती होती सूत्रसंचालन सचिन शिंदे यांनी केले तर आभार समन्वयक संजय सोनवणे यांनी मानले

## दीर्घकालीन विकासासाठी शिक्षणातील गुंतवणूक आवश्यक : डॉ.अजित रानडे






छत्रपती संभाजीनगर, दि. ३ (प्रतिनिधी)- देशाच्या दीर्घकालीन विकासासाठी शिक्षणातील गुंतवणूक आवश्यक असल्याचे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांनी केले.

स. भु. शिक्षण संस्थेच्या वतीने मध्यवर्ती कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित दोनदिवसीय आ. कृ. वाघमारे स्मृती व्याख्यानमालेच्या दुसर्या दिवशी 'मानवी संसाधन विकास : शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने' या विषयावर ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, मानवी संसाधन जर कुशल आणि क्षमताधिष्ठित असेल तर विषमतेचे उच्चाटन होऊ शकते. मनुष्यबळ हे ही एक परिणामकारक भांडवल असून त्याच्या उच्च कार्यक्षमतेने जीडीपी वाढू शकतो. देशाने १९९१ साली स्वीकारलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या धोरणातून आजही शिक्षण आणि कृषी क्षेत्र वंचितच आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत २५ टक्के मनुष्यबळ तर ७५ टक्के भौतिक भांडवल असे आहे तर याउलट प्रगत देशात परिस्थिती आहे. यामुळे देशाच्या शाश्वत विकासासाठी मानवी भांडवलाला प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. मानवी भांडवल निर्मितीचा रस्ता हा शिक्षण क्षेत्राच्या विकासातूनच जातो. विवेकानंदांच्या उपदेशाची आठवण करून देत त्यांनी कोणत्याही क्षेत्राच्या विकासासाठी केवळ शिक्षण हाच एक उपाय आहे हे त्यांचे शैक्षणिक विचार आजही प्रासंगिक असल्याचे नमूद केले. दुसर्या भागात शिक्षण क्षेत्रासमोरील आव्हानांचा आाढावा घेताना डॉ. रानडे यांनी उत्तम शिक्षणाची आवश्यकता, पालकांचा सहभाग, अध्यापकांची सेवा व शिक्षण संस्थांची स्वायतत्ता आदी मुद्यांवर प्रकाश टाकला. शिक्षण व्यवस्था हा राजकारणाचा विषय का होत नाही? अशी खंतही व्यक्त केली.

यावेळी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ.रानडे यांनी समर्पक उत्तरे दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. किशोर शिरसाट यांनी केले तर स.भु. विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल शंकरवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास स.भु. चे उपाध्यक्ष डॉ. बी.वाय क्षीरसागर, कोषाध्यक्ष मिलिंद रानडे, सहचिटणीस डॉ. रश्मी बोरीकर, स.भु सदस्य ज्ञानप्रकाश मोदाणी व डॉ.प्रा. साधना शाह तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

### देशपातळीवर स्वायत्त शिक्षण आयोग असावा

**अध्यक्षीय समारोपात कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा स.भु चे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी शिक्षण हा खर्च नसून ती गुंतवणूक आहे हे पालकांनी लक्षात घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. मात्र पोटाची भ्रांत असणारे कुटुंब शिक्षणाचा विचार कसा करेल हे भयंकर वास्तवही त्यांनी अधोरेखित केले. शिक्षणासमोरील आव्हानांना तोंड देण्यासाठी देशपातळीवर एक स्वायत्त शिक्षण आयोग असावा अशी अभिनव संकल्पना त्यांनी मांडली. मात्र हा आयोग राजकारण्यांच्या प्रभावापासून दूर असावा. अथवा असे झाले तरच शिक्षणक्षेत्राचा विकास होऊ शकेल असे ते म्हणाले.**

## श्रीनाथ कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे क्षेत्रीय स्तरावरील आविष्कार स्पर्धेत यश



वाळूज महानगर (प्रतिनिधी) पी.इ.एस इंजीनीरिंग महाविद्यालय येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या क्षेत्रीय स्तरावरील आविष्कार स्पर्धेत श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी मोठे यश प्राप्त केले. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम आणि संशोधन उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणे हा होता. या स्पर्धे त विविध विषयांतील सहभागी एकत्र आले, ज्यांनी त्यांच्या प्रतिभा, समर्पण आणि नवोपक्रमशील कल्पनांचे प्रदर्शन केले.

कृषी आणि पशुपालन विषयात गौरी बुटले, इंजिनिअरिंग आणि तंत्रज्ञान श्रेणीत स्वराली करंजीकर यांना पदवी विभागातून यश मिळाले. तसेच औषधशास्त्र आणि फार्मसी पदवीत्तर श्रेणीमध्ये ऐश्वर्या हरिदास शिंदे व कोमल गाडे यांना यश मिळाले.

या स्पर्धेतील विजेते श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्रतिनिधित्व विद्यापीठाच्या स्तरावरील आविष्कार स्पर्धेत करणार आहेत, ज्यामुळे महाविद्यालयाच्या संशोधन आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्याचा उद्देश सध्या होणार आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सचिव श्री. एकनाथ

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विभागीय क्रिडा स्पर्धेत बिडवे अभियांत्रिकीचा विजयी षटकार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४ डिसेंबर -**

नुकत्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या विभागीय क्रिडा स्पर्धेचे आयोजन पंढरपूर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत येथील एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाने ६ विविध क्रिडा प्रकारात १३ पारितोषिके पटकावली.

थाळी फेक स्पर्धत श्रध्दा करके हिने सर्व प्रथम स्थान मिळवत सुवर्ण पदक पटकावले. गोळा फेक स्पर्धत तनुजा माने हिला द्वितीय पारितोषिक मिळाले.

उंच उडी या क्रिडा प्रकारात महाविद्यालयाच्या सुधाकर सोनकांबळे आणि वैभव वानखेडे यांना त्रतिय पारितोषिक विभागून देण्यात आले.

मुलांच्या ४०० मीटर अडथळ्यांची धावणे स्पर्धत अरविंद मरे, सुधाकर सोनकांबळे, आदित्य चव्हाण आणि रितेश ढोरमारे यांनी द्वितीय स्थान पटकाविले तसेच ४०० मिटर अडथळ्यांची मुलींच्या धावण्याच्या स्पर्धेतही श्रुष्टी लोहारे, अश्विनी शिंदे, अदिती पंचाक्षरी व तनुजा माने या चमूने त्रतिय पारितोषिक प्राप्त केले.

किरण इप्पर याने ८०० मिटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय पारितोषिक पटकावण्याचा मान मिळवला.

## ऑपरेशन मुस्कान : अपहरण झालेल्या दोन मुली हैद्राबाद येथून ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४ डिसेंबर -**

अपिरेशान मुस्कान राबवून अपहरणाच्या गुन्ह्यातील २ अल्पवयीन पीडित मुलीचा हैदराबाद येथून शोध घेण्यात अनैतिक मानची वाहतूक प्रतिबंधक कक्षाला (एचटीयू) यश आले आहे. यापुर्वी या पथकाने अपहरण झालेल्या अथवा निघून गेलेल्या मुलींचा शोध लावून त्यांना पालकांकडे सुपूर्द केले आहे.

१७ वर्षीय २ अल्पवयीन मुलींना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळून नेले बाबत उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन व देवणी पोलीस स्टेशन येथे २ तक्रारी दाखल होत्या. मागील दीड वर्षपिक्षा जास्त कालावधीत पोलीस स्टेशनकडून संबंधित पीडित मुलींचा शोध सुरू होता. परंतु त्या मिळून येत नव्हत्या. पोलीस अधीक्षक अधीक्षक सोमय मुंडे यांचे आदेश व सूबनेवरून अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात वरील पोलीस स्टेशनला दाखल तक्रारी संबंधित पोलीस स्टेशनकडून समांतर तपास करण्यात येत होता. दरम्यान एचटीयूला मिळालेल्या गुप्त व तांत्रिक माहिती संकलन व विश्लेषणाचे आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षच्या टीमने अल्पवयीन मुलींचा हैदराबाद येथे शोध घेण्यात यश आले. एचटीयूच्या टीमने २ दिवस हैदराबाद शहरात मुक्काम करून २ अल्पवयीन पीडित मुली व त्यांचे सोबत २ आरोपीना ताब्यात घेतले. मिळून आलेल्या पीडित मुली व आरोपींना संबंधित पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले आहे. सध्या लातूर जिल्हा पोलीस दल व एचटीयूचे पथक ऑपरेशन मुस्कान शोध मोहीम राबवत असुन त्या दरम्यान लातूर जिल्ह्यातील अपहरणाच्या गुन्ह्यातील अल्पवयीन मुलींचा व बेपत्ता मुलींचा शोध घेण्याची महत्त्वाची कामगिरी पार पाडली जात आहे.



सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, लातूर यांचे मार्गदर्शनाखाली एचटीयूच्या पोलीस निरीक्षक बबिता वाकडकर, पोलीस उपनिरीक्षक, श्रयामल देशमुख, सुभाष सूर्यवंशी, पोलीस अमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव, महिला अंमलदार सुधामती यादव, लता गिरी, चालक निहाल मणियार या एचटीयूच्या पथकाने पार पाडली आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### फिजिओथेरपी शिबीरास सुरुवात

**औसा, दि.४ डिसेंबर -**

जागतिक दिव्यांगदिनानिमित्त दिव्यांग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर, समाज कल्याण विभाग, जि.प., लातूर व सुआश्रय निवासी अपंग विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांचे दोन दिवसीय भौतिक उपचार पद्धती (फिजिओथेरपी) शिबीरास सुआश्रय निवासी अपंग विद्यालय लातूर येथे बुधवार दि.४ रोजी सुरूवात करण्यात आली. या शिबीराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ता राजू गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात सुआश्रय निवासी अपंग विद्यालय लातूर शाळेतील ४२ दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. यासाठी लातूर फिजिओथेरपी महाविद्यालयाने पुढाकार घेतला असून दिव्यांगासाठी दोन दिवशीय शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ. पल्लवी तायडे, डॉ. अखिलेश, बस्वराज पैके, तुकाराम यलमट्टे, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

### अध्यक्षपदी सुनिल सुतार यांची निवड

**उदगीर, दि.४ डिसेंबर -**

लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेच्या उदगीर तालुकाध्यक्षपदी सुनिल पांडुरंग सुतार यांची राष्ट्रीय अध्यक्ष



दिनकर आमकर यांनी नुकतीच निवड केली. लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्था ही संस्था भारतभर ग्राहक संरक्षणाचे काम करीत आहे. त्यामध्ये उपभोक्ता संरक्षण कल्याण अधिकाराच्या माध्यमातून उदगीर तालुका कार्यक्षेत्रामध्ये काम करण्यासाठी सुनिल सुतार यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ग्राहक संरक्षण कायदा याविषयी त्यांनी प्रबोधन आणि जानजागृती करावी म्हणून त्यांना भारतीय अन्न महामंडळाचे सदस्य, लोक कल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दिपक तांबे व जिल्हाध्यक्ष संग्राम वाघमारे यांच्या शिफारशीनूसार राष्ट्रीय अध्यक्ष दिनकर आमकर यांनी मुंबई येथे नियुक्ती पत्र देऊन त्यांची निवड केली. यावेळी राष्ट्रीय कार्याध्यक्ष महिला आघाडी सुप्रिया सुवे, राष्ट्रीय उपाध्यक्ष दिपक तांबे, राज्य महिला आघाडी उपाध्यक्ष कांचन वाघमारे, संग्राम वाघमारे, पांडुरंग साळुंके आदिजण उपस्थित होते.



### सीताफळ महोत्सवाला प्रतिसाद

**लातूर, दि.४ डिसेंबर -**

जिल्हा कृषि विभागाच्यावतीने जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित सीताफळ महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील दहाही तालुक्यातील सीताफळ उत्पादक शेतकरी या महोत्सवात सहभागी झाले होते. रोहयो उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, उपविभागीय कृषि अधिकारी महेश क्षीरसागर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. सीताफळ महोत्सवात विविध प्रजातीची सिताफळे शेतकऱ्यांमार्फत विक्रीसाठी ठेवण्यात आली होती. सीताफळ उत्पादक शेतकरी व ग्राहकांनी या महोत्सवाला उपस्थिती लावली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फळबाग लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याचा कृषि विभागाचा प्रयत्न आहे. पुढील वर्षीही अधिक व्यापक स्वरुपात सीताफळ महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी जाधव यांनी सांगितले. नागरिकांनी या स्टॉलला भेटी देत फळांची खरेदी केली.



### डॉ. रमेश मुलगे पुरस्काराने सन्मानित

**उदगीर, दि.४ डिसेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील कन्नड विभाग प्रमुख प्रा.डॉ. रमेश मुलगे यांना सीमावर्ती विकास प्राधिकरण, कर्नाटक शासन तथा मराठवाडा कन्नड सांस्कृतिक संघ, संभाजीनगर यांच्यातर्फे हेम्मया स्वाभिमानी कन्नडिगरु हा पुरस्कार देऊन गौरविले. कर्नाटक सरकारच्या कन्नड भाषा आणि सांस्कृतिक विभागाच्या सहकार्याने आयोजित हा कार्यक्रम छत्रपती संभाजी नगर येथे दि.१ डिसेंबर रोजी पार पडला. डॉ. मुलगे यांनी कन्नड साहित्य, भाषा आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी केलेल्या कार्याचा गौरव यानिमित्ताने करण्यात आला. यावेळी अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, ॲड.एस.टी. पाटील, डॉ. रामप्रसाद लखोटिया, भालचंद्र चाकूरकर, प्रा.डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी.पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## गटनेतेपदी व मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्याबद्दल शिवाजीराव पाटील-कव्हेकरांकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४ डिसेंबर -**

भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ गटनेतेपदी व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली. त्याबद्दल भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांची मुंबई येथे भेट घेऊन त्यांचे स्वागत केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर भाजपा



युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस सागर घोडके, जिल्हा उपाध्यक्ष संतोष तिवारी उपस्थित होते.

## जागतिक एड्स दिन महाराष्ट्र फार्मसीत विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ डिसेंबर -**

महाराष्ट्र तंत्रनिकेतन (डी फार्मसी) इन्स्टिट्यूट, निलंगा आणि उपजिल्हा रुग्णालय, निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ, प्राचार्य सिद्धेश्वर पाटील, जिल्हा रुग्णालय समन्वयक डॉ. दिनकर पाटील, अमजद पठाण, दगडूराव श्रीसागर, संध्या लोंढे, मनीषा कुडके, रेड रिबीन क्लब चे समन्व्यक डॉ. अमोल घोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

स्पर्धेत शिंदे अपेक्षा (डी फार्मसी, द्वितीय वर्ष) हिने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक लता कोकरे, शिंदे भाग्यश्री, आणि ऐश्वर्या काळे यांनी मिळवला. तृतीय क्रमांक श्रुती माने, नीटूरे निमिता, बिराजदार नंदिनी, भोयने ऋतुजा, आणि मोगरगे हर्षाली यांच्या संघाने पटकावला.



**लातूर :** दिल्ली येथे केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांची भाजपच्या ज्येष्ठ नेत्या डॉ. अर्चना पाटील-चाकूरकर यांनी भेट घेत लातूरमधील औद्योगिक विकासासंबंधी चर्चा केली व उद्योग व्यवसायासाठी चालना मिळावी यासाठी सहकार्याची भावना व्यक्त केली.

## विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवून मेहनत घेतल्यास यश तुमचेच : डॉ. दीपक बच्चेवार




**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४ डिसेंबर -**

विद्यार्थ्यांनी कोणतेही ध्येय निश्चित करून ते प्राप्त करून घेण्यासाठी योग्य नियोजन करावे, ध्येयाचा पाठलाग करण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली तर कोणतेही यश तुमच्या मागे धावत येईल, असा आशावाद नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. दीपक बच्चेवार यांनी व्यक्त केला.

येथील कॉक्सिट महाविद्यालयाचे १२ विद्यार्थी २०२३-२४ मध्ये झालेल्या परीक्षेत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत. त्यांचा व पालकांचा सत्कार कॉक्सिटमध्ये करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात बच्चेवार बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम.आर. पाटील होते.

यावेळी प्रा.डॉ. विनायक जाधव, डॉ.एन.एस. झुल्पे, डॉ.व्ही.व्ही. भोसले, डॉ.डी.आर. सोमवंशी, प्रा. कैलास जाधव, डॉ.डी.एच. महामुनी, प्रा. सुषमा मुंडे, डॉ. नितीन वाघमारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.डी.आर. सोमवंशी यांनी केले. प्रा. विनायक जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## सिटी प्रेस क्लब चाकूरच्यावतीने पत्रकारिता क्षेत्रातील पुरस्कार जाहीर!

## मंगेश डोंग्रजकर, शशिकांत पाटील, नरसिंह घोणे, संजीव पाटील पुरस्काराचे मानकरी

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.४ डिसेंबर -**

चाकूर येथील सिटी प्रेस क्लब चाकूरच्यावतीने पत्रकारिता क्षेत्रासाठी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा नुकतीच जाहीर करण्यात आली असून विभागीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मंगेश डोंग्रजकर यांना तर जिल्हास्तरीय पुरस्कार शशिकांत घोणसे पाटील व नरसिंह घोणे यांना तर तालुकास्तरीय पुरस्कार संजीव पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्कारांचे वितरण १२ जानेवारी २०२५ रोजी एका भव्य कार्यक्रमात अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाच्या सभागृहात पुरस्काराचे वितरण केले जाणार असल्याची माहिती सिटी प्रेस क्लब चाकूरचे अध्यक्ष प्रा.अ. ना. शिंदे व सचिव मधुकर कांबळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. सिटी प्रेस क्लब चाकूरच्यावतीने या वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या पत्रकारांना पुरस्कार दिले जाणार आहेत. यासाठी स्व.नागोराव संभाजी शिंदे यांच्या स्मरणार्थ पत्रकार अ.ना. शिंदे यांच्यावतीने 'मराठवाडा स्तरीय



उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' मंगेश डोंग्रजकर यांना दिला जाणार आहे. जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी कालवश मालनबाई सोपानराव कांबळे व कालवश सोपान काशीराम कांबळे यांच्या स्मरणार्थ पत्रकार मधुकर कांबळे यांच्या वतीने 'मायदादा वृत्तरत्न पुरस्कार' शशिकांत घोणसे पाटील व स्व.काशीबाई बळीराम सोनटक्के यांच्या स्मरणार्थ जेष्ठ स्वातंत्र सैनिक बळीरामजी सोनटक्के व पत्रकार संगमेश्वर जनगावे यांच्या वतीने 'पत्रकार भूषण पुरस्कार' नरसिंह घोणे यांना देण्यात येणार आहे. तसेच तालुकास्तरीय पुरस्कारासाठी स्व. पत्रकार प्रा.सी.बी.सय्यद यांच्या स्मरणार्थ पत्रकार सलीम तांबोळी यांच्यावतीने 'चाकूर भूषण पत्रकारिता पुरस्कार' संजीव पाटील यांना दिला जाणार आहे.

## ढगाळ वातावरणाने शेतकऱ्यांची चिंता वाढली; हरभरा, तुर पीक धोक्यात



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.४ डिसेंबर -**

सोयाबीन पाठोपाट फुलोऱ्यातील तुर व उशीरा पेरणी झालेल्या हरभरा पिकाला पुन्हा निसर्गाने गाठले आहे. गेल्या तीन दिवसापासून सुरु असलेल्या ढगाळ वातावरणामुळे फुलांनी बहारलेले तूर पीक धोक्यात आले आहे. तर तयार झालेल्या पावसाळी वातावरणाने जमिनीबाहेर आलेले हरभरा पिकास धोका होणार असल्याच्या भितीने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. त्यामुळे वर्षाचे आर्थिक गणित बिघडणार असून शेतकरी चिंताक्रांत दिसून येत आहे.

या वर्षीच्या खरिप हंगामात निसर्गाला आली लहर अख्या हंगामात केला कहर या ग्रामिण भागातील म्हणीला यंदा निसर्गही तंतोतंत खरा ठरला आहे. पेरणीनंतर संततधार पाऊस आणि काढणीच्या मोसमात अवकाळीसह चांगला पाऊस झाला.

ओलीतच काढलेल्या सोयाबीनची हवा महिनाभरानंतर आजही कमी होत नाही. आणि बाजारात ओल्या व डागिल सोयाबीनला चार हजार रुपयांचाही भाव मिळत नाही. चांगले पिकून हातातोंडाशी आलेला घास मजुरांच्या दीडपट दरवाढीमुळे व अवकाळी पावसामुळे हिरावला गेला. परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.

औसा तालुक्यात सध्या तुरीचे पिक जोमदार आहे. सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडल्याने लवणाची रानं ओंबाळली आहेत. पण उर्वरीत पिक चांगले असून आज तीन टप्यात आहे. शेंगा भरत आहेत. शेंगा सुटल्या आहेत. आणि फुलोरा अर्ध्याहून अधिक प्रमाणात असून या ढगाळ वातावरणाने फुलोऱ्यातील तुरीवर आळीचा प्रादुर्भाव वाढला आहे. मोसमी फवारणीनंतर या वातावरणाचा फटका बसत असल्याने खर्चात दुपटीने वाढ होत आहे.

पाऊस पडला तर हरभरा पिकाला मर रोगाचा अधिक धोका बसणार आहे. याचबरोबर मर आणि हंगामातील अधिकच्या पावसाच्या ओलीमुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणार आहे. यामुळे सोयाबीन पाठोपाठ तुर, हरभरा पिके संकटात सापडल्याने शेतकऱ्यांचे या वर्षाचे आर्थिक गणित बिघणार असून एकंदरीत तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

## अनुराधा टेकाळे हीची राज्याच्या शालेय हॉकी संघात निवड

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.४ डिसेंबर -**

जिल्ह्यातील बिंदगीहाळ येथील हनुमान विद्यालयात ८ वी वर्गात शिक्षण घेत



असलेली उदयोन्मुख खेळाडू अनुराधा नवनाथ टेकाळे हीची १४ वर्ष वयोगटातील महाराष्ट्र राज्याच्या हॉकी संघात निवड झाली आहे. इस्लामपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत अनुराधा टेकाळेची निवड करण्यात आली.

बिंदगीहाळ येथील हनुमान विद्यालयाच्या हॉकी संघाने नेहमीच आपला दबदबा राखला आहे. आतापर्यंत २ खेळाडूंनी राष्ट्रीय तर २०० च्यावर खेळाडूंनी राज्यस्तरावर लातूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले आहे. अनुराधा ही ८ वी वर्गात शिक्षण घेत आहे.

### अशोक पाटील-निलंगेकर यांचेकडून अभय साळुंके विरोधात ५० कोटीचा दावा...

## माझी उमेदवारी काँग्रेस श्रेष्ठींनी नाही तर जिल्ह्यातून कापली : अशोक निलंगेकर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ डिसेंबर -**

निलंगेकर घराणं हे काँग्रेसशी, गांधी घराण्याशी प्रामाणीक असलेले घराणे आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत माझी उमेदवारी काँग्रेसच्या श्रेष्ठींनी कापली नाही तर जिल्ह्यातून कापली गेली असा आरोप अशोकराव पाटील-निलंगेकर यांनी केला असून निवडणूक प्रचारादरम्यान काँग्रेस उमेदवार अभय साळुंके यांनी जाहीर भाषणात माझे कुटुंब, माझे चारित्र्यहनन होईल असे वक्तव्य केल्याने आपण ५० कोटी रूपये नुकसान भरपाईची नोटीस पाठविल्याची माहिती अशोकराव पाटील निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुढे बोलताना ते म्हणाले की, जिल्ह्यातील काँग्रेसने माझ्या संदर्भात



चुकीचा अहवाल देऊन माझी उमेदवारी कापली व अनेक पक्ष फिरून आलेल्या अभय साळुंके यांना दिली.

तरीही आपण उमेदवारी माघार घेऊन मतदार संघातील प्रत्येक तालुक्यात जाऊन सभा घेतल्या. काँग्रेस उमेदवारास मतदान करण्याचे आवाहन केले. १८ नोव्हेंबरच्या माझ्या अनुपस्थितीत झालेल्या एका जाहीर सभेत स्वतः अभय साळुंके यांनी माझे व माझ्या कुटुंबाच्या विरोधात निलंगेकर घराण्याचे, माझे चारित्र्यहनन होईल असे वक्तव्य केले. ही क्लीप मतदार संघभर फिरली. निलंगेकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या मतदारापर्यंत गेली. ज्याचा परिणाम काँग्रेस उमेदवाराचा पराभव असा झाला, असे विधान करून निलंगा मतदार संघातून सहज निवडून येणारी जागा कप्रिसने गमावली, अभय साळुंके यांनी स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतला असा आरोप अशोकराव पाटील निलंगेकर यांनी या पत्रकार परिषदेत केला.

पक्षविरोधी काम केले म्हणून निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी तालुका काँग्रेसने माझी पक्षातून हकालपट्टी करावी असा ठराव केला आहे असे कळते; पण पक्षाकडून अद्याप मला कसलीही विचारणा झाली नाही कि नोटीसही नाही असा खुलासा अशोक पाटील निलंगेकर यांनी केला आहे.

माझे चारित्र्यहनन केल्या प्रकरण काँग्रेसचे पराभूत उमेदवार अभय साळुंके यांच्या विरोधात ५० कोटी रूपये अब्रुनुकसानीचा दावा करणारी नोटीस वकिलामार्फत पाठविली असल्याचे अशोकराव पाटील-निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.